सालअखेर ... १८
किरकोळ अंकास .............. ०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.... ०।०६
दुसरे खेपेस ........ ०।

Single copy.......................... 4 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Advertisement
Below 10 lines... 2 Rs
per line over 10... 4 as
Repetition per line 3 as

VOL XXIX AKOLA MONDAY 7 JANUARY 1895 NO. 1

वर्ष २९ आकोला सोमवार तारिख ७ माहे जानेवारी सन १८९५ इ० अंक १

वऱ्हाडसमाचार

मिती पौष शुद्ध १२ शके १८१६

हिंदुस्थान सरकारच्या कायदे कौंसिलांत जकातीच्या कायद्याचा मसुदा विचारासाठीं येऊन पास झाला. विलायतेच्या सुतावर व कपड्यावर जकात नव्हती आणि इतर सर्व आयात मालावर गेल्या मार्चांत जकात बसविण्यांत आली होती. म्यांचेस्टरवाल्या लोकांचें प्राबल्य व वजन विशेष पडल्या कारणानें विलायतचें कापड व सूत यासंबंधानें मोठा पक्षपात करण्यांत आला होता. सर्व देशभर ओरड झाली तेव्हा सरकारला आपली चुक फार काळ दाबून ठेवितां येईना. द्वीपान्तराहून येणाऱ्या इतर चीजवस्तूवर पूर्वीच जकात बसविण्यांत आली आणि ताच शेकडा ५ हा जकातीचा धारा विलायतच्या सुतावर व कापडावर आकारला जाण्याविषयीं सूचना होती. परंतु मांचेस्टरच्या कपड्यावर जकात बसविल्यामुळें तो देशी कपड्यापेक्षां महाग पडेल या भितीनें स्वदेशी मालावर जकात बसविण्यासाठीं जोड गोळीनें दुसरी सूचना केली होती. ही शेवटील सूचना अप्रतिबंध व्यापाराच्या तत्वावर आहे असें प्रतिपादन करण्यांत येतें.

सन १८८२ साली सर्व आयात मालावरील जकात उठविण्यांत आली तेव्हांपासून आणि त्या काळाच्या अगोदर हिंदुस्थानच्या गिरण्यांची व विलायतच्या गिरण्यांची एक झपाट्यानें सारखी भरभराटच होत आहे असें दाखवून एक निराळाच सिद्धान्त स्टेट सेक्रेटरी यांनीं स्थापण्याचा घाट घातला आहे. ते ह्मणतात कीं गेल्या दहा वर्षांत जकात नसल्यामुळें विलायती कापडाचा व्यापार पूर्वी पेक्षां पुष्कळ वाढला आहे आणि हिंदुस्थानच्या गिरण्यांची अभिवृद्धी जकात कायम असतांना जितकी होती त्या पेक्षां अधिक प्रमाणानें जकात नसतांना होत आहे. सारांश सरकारच्या ह्मणण्याचा भावार्थ असा कीं आयात मालावर जकात न बसविल्यानें हिंदुस्थानच्या सुताच्या व कापडाच्या गिरण्या विशेष भरभराटीनें चालतील. वास्तविक प्रकार अगदीं निराळा आहे. मूळ या देशांत गिरण्या वगैरे फारशा नव्हत्या त्या काली बाहेरून येणाऱ्या मालावर जकात असल्यानें किंवा नसल्यानें देशी मालास कांहीं उत्तेजन मिळत नव्हतें. या देशांत नवीन गिरण्या व उद्योगधंदे चालूं झाले अशावेळीं आयात जकात बसविली तरच त्याचा कांहीं फायदा देशी गिरण्यांच्या उन्नतीस कारणीभूत होईल आणि ती वेळ सांप्रत आली असून सध्या अप्रतिबंध व्यापाराचें तत्वाचें घोडें पुढें ढकलून देशी गिरणीच्या उद्योगवृद्धीवर निराळें संकट आणिलें आहे. अप्रतिबंध व्यापाराचें तत्व इंग्लंडनें जेव्हां संस्थापित केलें त्या समयीं सर्व समुद्रावर इंग्लंडचें वर्चस्व होतें, इंग्लंडचें सार्वभौमत्व सर्व पृथ्वीवर पसरत चाललें होतें. आणि सर्व व्यापाराचीं सूत्रें इंग्लंडच्या हस्तगत होतीं. अप्रतिबंध व्यापाराचें तत्व अर्थशास्त्र दृष्ट्या चांगलें खरें परंतु तें ज्या स्थितिमानाला अनुरूप आहे त्या स्थितीतलीं समसमानता बुद्धिपूर्वक विचारांतून वगळून टाकावयाची हें अन्यायाचें नव्हे काय? असो.

नेटीव लोकांचें ह्मणणें बाजूस ठेऊन तारीख २७ रोजीं हें बिल पास करण्यांत आलें हिंदुस्थानांतील वीस नंबरी सूतावरील सूतावर जकात घ्यावी असा ह्या बिलाचा उद्देश आहे. निदान चोविस नंबरावरील सुतावर जकात घेण्याबद्दल उपसूचना आली होती तिला नऊ मतें अनुकूळ होती अकरा प्रतिकूल होती ह्मणून ती सूचना नापसंत झाली. वीस नंबरा खालील सुती कापडावर व हातांनीं काढलेल्या कापडावर जर आह्मी आपल्या गरजा भागविल्या तर फार बहार होणार आहे

## राष्ट्रीय सभा

नामदार मि. पी. रंगय्या नायडू स्वागत-मंडळीचे अध्यक्ष यांचें संभाषण मागील अंकावरून पुढें सांप्रतच्या आणिबाणीच्या वेळेविषयीं येणे प्रमाणें झालें:—

सध्याची कसोटीची वेळ आहे. आपण जीव लाऊन झटलें पाहिजे. आपल्या देशाला संकटवेळा आली आहे, आणि या क्रांती मधून इंडियाचा निर्भाव लागे पर्यंत व जगांतील राष्ट्रा मध्यें या देशाची योग्य गणना होई पर्यंत ही संकटें [illegible] कमजास्त मानानें कायमच राहील. नुसती [illegible]राज्यपद्धति नव्हे तर व्यापाराची व उद्यो[illegible] सरणी, देशाच्या संरक्षणाच्या यो[illegible]गा[illegible]जना व[illegible] प्रजेवरील कराचा बोजा [illegible] देशाच्या गरजा व सामर्थ्य [illegible] ऊन युरोपांतील राजकीय [illegible] असतात. आणि या विपर्य[illegible] खा[illegible] सहन करण्यास हा देश [illegible] शाची संपत्ती अगदीं [illegible] या [illegible] लक्षपांत वे तल्या [illegible] स्थिती राखण्यासाठीं फार [illegible] वितानें [illegible] ताच्या संपत्तीचा [illegible] रून तिचें [illegible] वृद्धि केली पाहि[illegible] तून पार [illegible] लें पाहिजे असें [illegible] निःसंशय [illegible] न येईल. रा[illegible] असल्यामुळें [illegible] देशाच्या ख[illegible] लूट चालली [illegible] आहे, अशा ढ[illegible] नें सर्व देशाच्या [illegible] ऐन बसुलाच्या ⅓ उत्पन्नाचा फन्ना होतो, आमचे जुने उद्योग धंदे अनियंत्रित व्यापाराच्या तत्वानें ठार बुडविले, लोकसंख्या अन्नाच्या पुरवठ्याच्या मानानें अतिशय वाढली आहे आणि दारिद्र्य वर्षानुवर्ष वाढतच चाललें आहे. एवढ्यानें गोष्ट संपली नाहीं. राज्यकर्ते अधिकाधिक नाखुषी दाखवितात आणि वरील संकटामुळें जे कठीण प्रश्न उद्भवतात त्यांची नेहमीं टाळाटाळ केली जाते, नेटीव लोकांच्या हिताशी राज्यकर्त्यांच्या हिताचा विरोध पडतो तेव्हां नेटीवांस योग्य न्यायही मिळत नाहीं आणि लोकमताचें ग्रहण कळकळपानें व विश्वासानें होत नाहीं.

या शिवाय निराळेंच संकट आपणापुढें दत्त ह्मणून उभें आहे त्याच्या बद्दल आपण इलाज केला पाहिजे. हें संकट ह्मणजे आंग्लो—इंडियनांचा आपल्या विषयीं वाईट ग्रह हा होय. या गैर समजुतीचें स्तोम फार वाढलें आहे मग उत्तरोत्तर जबाबदारीनें वागणाऱ्या अधिकाऱ्यांचा वर्ग अशा दुष्ट अभिप्रायाला संमती देत नाहीं. आंग्लो-इंडियनांच्या स्वार्थ—साधुपणा, मनांतील वाईट कल्पना व मनोधर्म हीं आपल्या विषयींच्या वाईट ग्रहानें निदर्शनास येतात. हे आंग्लो—इंडियन या देशांत निव्वळ उदरनिर्वाहासाठीं येत असतात, या देशांत कायमच्या नफानुकसानीचें त्यांचें कांहीं नाहीं, व यांचीं मतें ज्या प्रकारें बनतात त्या वरून स्पष्ट दिसतें कीं सुशिक्षण, उन्नत देशाभिमान व गत किंवा भावी पुण्य प्रताप हीं त्या मताला कारणीभूत नसतात. आंग्लो—इंडियनांच्या मतामधली ही विकृति अलिकडील असून मोठ्या अडचणीची आहे. व या मताचें प्राबल्य सरकारावरही झालें नाहीं असें कांहीं ह्मणवत नाहीं. ह्मणून परिणाम असा होत आहे कीं लोकांमध्यें असंतुष्टता, मनउद्वेग, व एका प्रकारची अस्वस्थता हीं उत्पन्न झालीं आहेत आणि राजा व प्रजा यांच्या मधील प्रेमभाव असावा तितका गोडीचा नाहीं. हल्लींच्या संकटमय अवस्थेंतील कांहीं गोष्टी आपल्या दृष्टीस आल्या आणि मला उमेद आहे कीं आपण या विघ्नांचा योग्य विचार कराल आणि त्यांच्या परिहारार्थ योग्य व अंमलांत आणण्या सारख्या उपायांची योजना कराल.

### आमची निराशा

खरोखर, आमच्या आशा बहुत प्रकारें निष्फल झाल्या आहेत. सिव्हील सरव्हिस परीक्षे विषयीं चा स्टेट सेक्रेटरीचा ठराव व त्या ठरावाचीं कारणें यांनीं हल्लींच्या सत्ताधारी लिबरल मंत्रिमंडळावरील आमचा विश्वास उडाला. पातशाही चालवूं इच्छिणाऱ्या अधिकाऱ्यांनीं कामन्स सभेच्या ठरावाला हेळनेनें झुगारून द्यावें ही गोष्ट आमच्या मनास अत्यंत विषादकारक वाटली. माव्हीनशिअल सिव्हील सरव्हीसची योजना अशी लटकिली आहे कीं तिजमध्यें एकही बाब समाधान कारक वाटत नाहीं. कायदे कौंसिलांत सुधारणा झाल्या तथापि त्यामध्यें लोकमताचें योग्य प्रकाशन होईल इतके लोकांचा कौंसिलांत प्रवेशच होऊं दिला नाहीं. फौजदारी खात्याची न्यायपद्धति सुधारली नाहीं ती नाहीं. आमच्या देशाच्या कारभाराची योग्य चौकशी व्हावी ह्मणून पार्लमेंटाकडून १८९४ त कमिशन बसणार होतें परंतु त्या चौकशीचें जरूरीच नाहीं. असें ह्मणतात लष्करी खात्याचा व राज्यकारकाचा बेताल खर्च कमी करण्यांत आला नाहीं. आणि शेवटीं युरोपियन अधिकाऱ्यांच्या पगारांत अप्रत्यक्ष बढती मिळून एक कोटीवर खर्च वाढला तो न वाढविण्या विषयीं सर्व इंडियाचें लोकमत होतें परंतु त्याला विचारतो कोण!

### आमच्या आशा

पण आमच्या जशा निराशा झाल्या आहेत तशा कांहीं आशाही आह्मास आल्या आहेत. विलायतेंत लोकमत आपणास अनुकूल असें बनत चाललें आहे आणि सरकारही आमच्यावर कांहीं बाबतींत दया करूं लागलें आहे. आमच्या मनोरथाचें प्रोत्साहन करणारे असे पार्लमेंटचे सभासद आह्मांस लाभले आहेत. व त्यांचा एक निराळा पक्ष बनला आहे. कधीं काळीं आमच्या कांहीं विशिष्ट मागण्या त्यांस पसंत पडल्या नाहींत तर त्यांत नवल नाहीं. राष्ट्रीय सभेच्या ब्रिटिश कमिटीस नवीन लोक मिळाले आहेत आणि तिचीं कामें विशेष चांगलीं व फायद्याचीं झालीं आहेत. सर डेव्हीड बारबार व मि. साम्युएल लेंग हे तर राहूंच द्या पण सर आकलंड काल्व्हीन सारखा पातशाहींतला अधिकारी कबूल करितो कीं हिंदुस्थानच्या खजिन्यांत भयंकर तूट पडण्यास कारण हुंडणावळीचा भाव किंवा अंसेच एखादें क्षणिक कारण नसून आपली राज्यकारभाराची रीत हें होय. या क्षणिक कारणावरच मोठमोठ्या व बिकट प्रश्नांचा कसा तरी हवाला देऊन खरें कारण अंधारांत ठेविलें जातें. राष्ट्रीय सभेला दहा वर्षें सतत ओरड करावी लागल्यानंतर हिंदुस्थानच्या फडणिसांनीं हें खरें कारण कबूल करण्याचें धैर्य कां दाखविलें याचा खुलासा वरील लपवालपवी वरून ध्यानांत येईल; नाहीं तर खरें कारण अगदीं उघड कोणाही निःपक्षपाती सुज्ञास कळलें असतें. आमच्या ह्मणण्याचा तिरस्कार ज्यांना करावयाचा असेल त्यांनीं सुखेनैव तसें करावें पण सर आकलंड काल्व्हीन व डेव्हिड बारबर सारखे विरुद्ध पक्षांतले लोक आमच्या पक्षाला मिळाले हें सांगितलें ह्मणजे आमच्या ह्मणण्याची यथार्थता कळून येईल. आपल्यास दुसरा एक जय मिळाला आहे तो हा कीं लार्ड क्रास व किंबरले यांच्या सारख्या मुत्सद्यांनीं मुलकी काम व न्यायखात्याचें काम हीं स्वतंत्र अधिकाऱ्याकडे वेगवेगळीं नसल्या मुळें मोठा घोटाळा

होता असें कबूल केलें आहे. तुर्त वरील कामांच्या पृथक्करणाला फंडाची मोठी उणीव आहे. जंगल खात्यासंबंधानें शेतकऱ्यांच्या सोयीचे हुकूम नवीन निघाले आहेत आहेत फक्त त्यांची बजावणी नीटपणें होण्यासाठीं वर्तमानपत्रें, सार्वजनिक संस्था, व स्थानिक सरकार यांनीं योग्य खबरदारी घेतली पाहिजे. पोलीस खात्यांतील नेटीव इनस्पेक्टरांस उच्च पदवीच्या जागा देण्याची परवानगी मिळाल्यानें युरोपियन लोकांचाच जो हक्क होता तो आतां उभयतांचा झाला. आणी आपणांस आशा आहे कीं राष्ट्रीय सभेच्या मागण्या हळू हळू सर्व दिल्या जातील.

## राष्ट्रीय सभेची लोकमान्यता

राष्ट्रीय सभेचा नवीनपणा कांहीं वर्षांनीं नाहींसा झाल्यावर लोकांस या देशाभिमानी संस्थेचें नवल वाटेना पण लोकांची भक्ती व श्रद्धा या संस्थेविषयीं फार वाढली. समाजांतील अग्रणी लोकांनीं धुरीणत्व पत्करलें आणि सर्व देश देशाभिमानानें वणाणून गेला आणि नेटीव लोकांच्या खानगी मताला वजनदारी येत चालली. गेल्या आगष्ट महिन्यांत दक्षिण हिंदुस्थानांतल्या स्वागत-मंडळीच्या कार्यास प्रारंभ झाला. कांग्रेस-सरक्युलर्स [राष्ट्रीय सभेचे हुकूम) गावोगांव कळताच सर्व दक्षिण प्रांत देशाभिमानी लोकांनीं फुलून गेला व देशसेवेंत जो तो यथाशक्ति झटूं लागला. सर्वत्र चळवळ सुरूं झाली आणि एक दिलानें सर्व कामाची उभारणी होऊं लागली. राष्ट्रीय सभेच्या वीरश्रीनें लोकांचीं मनें सर्वत्र उल्लसित झालीं, सभावर सभा भरूं लागल्या, जुन्या संस्था उर्जित झाल्या, आळसानें मान खालीं घातली, खानगी बेबनाव लोक विसरले, द्वेषभाव लयास गेले, आणि प्रत्येक लहान स्थळांतल्या समाजांतही अत्यंत प्रशंसनीय स्पर्धा व ईर्षा सुरूं झाली. आणि प्रथम आपल्या आदरातिथ्याचें काम मोठ्या भगिरथ प्रयत्नाचें वाटत होतें तें अगदीं आनंदवृत्तीनें घडून आलें. हा उल्हास सार्वजनिक कार्यांत पाहून कोणाचे डोळे निऊन अंग वीरश्रीनें स्फुरण पावणार नाहीं! सर्वांत विलक्षण गोष्ट अशी कीं राष्ट्रीय सभेचा फंड गोळा करण्यासाठीं घरोघर व दारोदार वर्गण्या मागण्यांत आल्या. एकंदर ४०,००० रुपये फंड जमला पण यापैकीं निम्मी रक्कम अगदीं स्वल्प स्वल्प आंकड्यांच्या गोळा बेरजेनें जमलेली आहे. ईश्वरानें श्रीमंतींत व उच्चस्थानीं ठेविलेले लोक आपला थोरपणा विसरून देशकार्या साठीं निरभिमानानें व उत्साहानें घरोघर रस्त्यांतून वर्गणी मागत फिरत होते हें सांगितलें ह्मणजे खऱ्या देशाभिमानाची चांगली खूण पटेल. वरील मागणीला राजा पासून रंका पर्यंत प्रत्येकानें मोठ्या आदरबुद्धीनें आपली वर्गणी यथाशक्ती हजर केली. स्वार्थत्यागाचा हा धडा लोक चांगले शिकत चालले आहेत. अशिक्षित लोकांनीं देखील या कामांत पुष्कळ पुढारीपणा घेतला. या संस्थेच्या मागण्या बाजूस ठेविल्या तरी लोकांस एका प्रकारें उत्तम राजकीय शिक्षण मिळत आहे. आणि या शिक्षणानें सर्व लोक समजूतदार, दूरदृष्टी व देशाभिमानी बनोत अशी आमची देवापाशीं प्रार्थना आहे.

## आमचे मुसलमान भाई

आह्मी ही गोष्ट विसरत नाहीं कीं मुसलमान लोकां पैकीं कांहीं मंडळी आमच्या संस्थे पासून अगदीं अलग व अलिप्त राहते. त्यांचा गैर समज असा झाला आहे कीं राज्यकर्ते आमच्या संस्थेच्या उलट आहेत. आणि या संस्थेपासून वेगळें राहून शिवाय तिला प्रतिरोध करणें ह्मणजे सरकारची व अधिकाऱ्यांची मर्जी संपादण्याचा मार्ग आहे परंतु ही वेळ निघून गेली. हांजी हांजी करून सरकारी चाकरींत पैगम चालत नाहीं किंवा थोरवी मिळत नाहीं असें झालें आहे. हा भ्रम जसा दूर झाला तसा लोकांनीं राजकीय व शिक्षणाच्या मंडळ्या स्थापण्याचा मार्ग धरला आणि राष्ट्रीय सभेला मुसलमान भाई येऊन मिळाले नाहींत तथापि तिच्या पद्धतीनेंच त्यांना आपला इष्ट हेतु साधला पाहिजे. त्यांनीं खुशाल तसें करावें आणि आह्मी त्यास आनंदानें मदत करूं सारांश, तात्विक दृष्ट्या त्यांच्या व राष्ट्रीय सभेच्या मागण्या या मध्यें कांहीं फरक दिसून पडणार नाहीं.

## सुधारणा ही गुरुकिल्ली

आपलें राष्ट्रीय अविकृत व शुद्धसत्वाचें चिरकाल राखण्यासाठीं आणि आपणाला नाशमूलक कीड लागला आहे तो काढून आपलें राष्ट्रीयत्व अविच्छिन्न व जोमांत ठेवण्यासाठीं इंडियांतील प्रत्येक समाजानें—मग तो मुसलमानाचा, हिंदूंचा, पाशांचा किंवा ख्रिस्तो नेटिवांचा असो,- मागील इतिहास व सांप्रतचा इतिहास यांचें तात्पर्य शहाणपणानें ध्यानांत घ्यावें. ज्या राष्ट्राला देशकालमान समजतो आणि राष्ट्रीय ऐक्यभावानें व वैभवानें वीरश्री येते त्या राष्ट्रांतील संस्था व इतर साधनबाहुल्यें नव्या कार्यमालेच्या पात्रतेस पोचतात. आणि अशा राष्ट्रांमध्यें नशिबावर हवाला ठेऊन, आपलें पूर्व वैभव विसरून निश्चिंतता जे लोक पतकरतात, जे स्वकीय धनसंचया पुढें सार्वजनिक कल्याणाच्या व सन्मानाच्या गोष्टी तृणवत् मानतात व प्राप्त कालाच्या गरजा लक्षांत न घेतां देशाभिमानाचें एकीभवन लोकांमध्यें जे होऊं देत नाहींत ते लोक देशाचे शत्रू समजले जाऊन शेवटी लयास पोंचतात.

मद्रास कारपोरेशनचे चेअरमन कर्नल मूर सी. आय. इ. यांच्या उदार साह्यते बद्दल नामदार नायडू यांनीं फार आभार मानले आणि पुन्हां सर्वांचें स्वागत करून आभार मानीत वेळीं ते बोलले कीं, गृहस्थ हो जें स्वप्न अन्य कालान्तरांत व अन्य राज्यकर्ते व मुत्सद्दी यांच्या कारकिर्दीत मिथ्या ठरलें असतें तें स्वप्न म्हणजे सर्व इंडियन वाल्यांचें एक राष्ट्र बनविण्याचें स्वप्न खरें होण्याचा काल सांनत अभ्युदित झाला आहे. अशा या क्षणीं आपल्या अंतःकरणाला उज्वल कल्पना, व शुद्ध महत्वाकांक्षा यांनीं पूर्ण भरती आली आहे आणि सर्वांचिमनें बंधुत्वाच्या सख्य भावानें व कळकळीच्या प्रेमभरानें उचंबळू लागलीं आहेत. राष्ट्रीय सभेच्या उत्पादकांच्या वतीनें व दक्षिण हिंदुस्थानच्या वतीनें मी पुन्हा आपले प्रेमोद्गारानें स्वागत करितो आणि आमच्या निमंत्रणाला बहु मान देऊन आमच्या कार्याच्या उभारणीस शोभा आपण आणिली या विषयीं मी मोठ्या अभिमानानें बंधुत्वाच्या नात्यानें माझा सख्य हस्त आपल्या वंदनार्थ पुढें करितों.

---

म्हैसूर संस्थानचे श्रीमंत महाराज चमुराजेंद्र उदियर यांचें कलकत्ता मुक्कामीं आकस्मिक कंठरोगानें देहावसान झालें ही शोककारक बातमी विद्युताता प्रमाणें सर्वत्र पसरतांच सर्व राष्ट्र हळहळू लागलें! म्हैसूर संस्थानचा दैदिप्यमान सूर्य काळानें ग्रासून टाकला हा आपल्या देशावर ईश्वरी क्षोभच होय! म्हैसूर संस्थानच्या राजघराण्यावर व प्रजाजनावर हा दुःखाचा कहर कोसळला हें पाहून आमचे प्रांतस्थ लोक फार दुःख करितात. सुशील धुरंधर, हितकर्त्या व दयाळू महाराजाला वयाचे ३१ वे वर्षी मृत्यूनें गांठावें हें प्रजाजनांचें मोठें दुर्भाग्य होय. म्हैसूरकरांचे दुःख हृदयच्छेदी व अविभाज्य आहे तथापि या प्रांतांच्या लोकांच्या वतीनें म्हैसूरकरांस दुःखवत्याचा निरोप मोठ्या कष्टानें कळविल्या वाचून आमच्यानें राहवत नाहीं. ईश्वर महाराजाचे आत्म्यास उत्तम गती देवो!

श्रीमंत महाराज चमुराजेंद्र कैलासवासी झाल्यानें त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव यास गादीचे वारसदार ठरविण्यांत आलें आणि रिजन्सीचें कौंसिल स्थापून राज्यकारभार चालविण्याचें ठरलें. तरुण महाराज वयांत येऊन सिंहासनारूढ होई पर्यंत ईश्वर कृपेनें राज्य सुयंत्र चालो आणि श्रीमंत दीर्घायुषी व स्वपित्या समान कीर्तिमान निघोत!

---

राष्ट्रीय सभेचा दहावा समारंभ सर्वोत्कृष्ट तऱ्हेनें शेवटास गेला आणि त्याच प्रमाणें गेल्या ३० वे तारखेस राष्ट्रीय सामाजिक सभेची बैठकही चांगली आनंदकारक झाली. राजकीय व सामाजिक गोष्टींत आपल्या राष्ट्राची कितपत उन्नती झाली तो श्रेयस्कर सांप्रतच्या चळवळी वरून कल्पना येईल. राष्ट्रोदय ब्रिटिश राज्य आंग्लो इंडियन पत्र होणार आहे या निःसृष्टींत पाहिजे त्या कुत 'पायोनिअर' यात पण त्यांच्या अपकृतीनें कर्ते आपल्या म न होतां आमच्यावर उपकृतीस स्थान दिलें. शत्रू जोरदार निघाल्यानें आपचें नुकसानाक व मानसिक शक्तीचा अकारच होत आत्मकीय व सामाजिक उन्न आमच्या शारी लोकदृष्टीस पडत आहे. मद्राद्भुत प्रभाव ज्यांनीं पाहिला नसल त्यांनीं तीच्या द्वारा डोळ हकीकती वर्तमानपत्रांतून सचा समारंभणजे त्यांचे कर्ण व नेत्र यांची निदान तिकडील. देशाभिमानाचें शिक्षण, वाचाळ्या व आत्मसंयमनाची आवश्यक सार्थकता होजधर्माचा उपदेश, प्रयत्नाच्या स्वार्थत्यागाविषयीं यशस्वाद इत्यादि योगेता, नवान येत बिंबतील आणि त्या योगें सातत्या पहिल्या आर्यमातेचे सुपुत्र कसे व्हावे सहजो मनली समजेल.

आपण आ सभेनें एकंदर बावीस ठराव पसायाची गुरु इतक्या विविध विषयावर आहेत राष्ट्री योग्य परिशीलन केलें ह्मणजे सर केले ते वादांत असलेले प्रश्न आपल्या कीं त्यांरकदम येतील. वरील ठरावांत निर्दिष्ट ध्यांचे वाटा राजकीय प्रगतीच्या आहेत.

नजरेस

केळकर

आपल्या देशाच्या राज्यकारभारांत आपला प्रवेश व्हावा, देशाच्या अवाढव्य खर्चास आळा घालून विलयकारक आपदा टाळाव्या, लोकांची स्थिती व सामर्थ्य पाहून कराचा बोजा आकारला जावा, न्यायखातें सुधारून त्याचें काम प्रजेस अधिक सुखावह व्हावें, शेतकरी लोकांवर बसलेला कराचा बोजा भारी आहे तो कमी व्हावा, हे व असेच अनेक महत्वाचे विषय जो काल पावेतों निकालास लागून आपल्या देशाचें कल्याण व ब्रिटिश राज्याचें वैभव यांच्या अभिवृद्धीस कारणीभूत होत नाहींत तो पर्यंत राष्ट्रीय सभेची चळवळ आपणास अव्याहत उद्योगानें एक सारखी चालूं ठेविलीच पाहिजे.

सन १८९५ सालचा राष्ट्रीय सभेचा ११ वा समारंभ पुणें शहरीं करावा असें सर्वानुमतें ठरलें आहे.

---

सुरत— नंदूरबार यांच्या दरम्यान रेलवेचा फांटा काढण्याचें सरकारांत घाटत आहे तेव्हां त्या वेळीं धुळे शहराशी जी. आय. पी. रेलवेचा संबंध जोडला जाण्या विषयीं सरकारानें विचार करावा ह्मणून धुळ्याकडील रेलवेचा फांटा रेलवेवाल्यास चांगल्या किफायतीचा होऊन दळणवळण झपाट्यानें सुरू होईल.

---

# The Berar Samachar

MONDAY JANUARY, 7, 1895

## AN INFECTED EARDRUM.

It is a matter of deep regret and crushing misfortune that the State correspondence of the Indian Government and the false coloured records exported by the official class in this land, should have infected the ears of a celebrated personage like Sir W. Hunter. It seems to [illegible] of wonderful [illegible] man— his acumen, his integrity of purpose, his high sense of judiciousness and his impartiality of voice. This illustrious person has long since established a connection with this Aryan country by his able writings in which he has handled the most important Indian topics with marvellous candour and uprightness. We have been reckoning upon him as an influential body on one side. But it is now infections and aweful to behold that he has fallen a victim to a malicious and misleading impetus. Otherwise he would never have been so ruthless as to shed a prejudicial slander upon the Sirdars and Brahmins of the Deccan. Relying upon the counterfeit notes sent out by some ill-disposed Anglo-Indians here, he holds these unlucky Sirdars —some of them being created by his fecund fancy—and these unfortunate Brahmins as the cardinal aggressors and instigators of the late religious bickering in the Deccan. We strongly believe that Sir W. Hunter has heard only the one side. It would have been better if he had listened to the other side also. We recommend unto him the late decisions of the Poona Sessions Court for close inspection and consideration and thus request him to get himself thoroughly acquainted with every line thereof which so vividly discloses the evil acrimony that was evinced, the malignant fabrication of false evidence, that was constructed, hurtful chicane that was committed and the wanton mischiefs that were played by the Police authorities to

ESTABLISHED IN 1880.

HEALTH REGAINED AND STRENGTH MAINTAINED.

जी. बी. नाईक कंपनीच्या

जग प्रसिद्ध गुणावह.

विजेच्या आंगठ्या, पुतळया, कडीं, लेखण्या व गळपट्टे वगैरे

प्रत्येक वस्तुवर G. B. N. मार्क पाहून घेत जा. खोटा माल घेऊन फसू नका

११०००० वर विकल्या, रोज पुष्कळ खपत आहेत.



गुण आल्याने हजारो दाखले मिळाले आहेत व नित्य मिळतात

रक्त हें मनुष्याचें जीवित आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे




रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग, अशक्तपणा, संधिवायु, शिरागतवायु, पोटांत वायु धरणें, कंपरें, हातपाय गळून जाणें, स्त्रियांचे बाळंतरोग वगैरे काळजाचे दर्द, सर्व पकारचे ज्वर, अर्धशिशि, मस्तकशूळ, मलावरोध, छातींत जळणें व दुखणें गळा सुजणें, सर्व प्रकारच्या मुळव्याधी. पाठींतील अशक्तपणा निद्रा न लागणें, मूत्राशयांतील रोग, खोकला, दमा, गजकर्ण, त्वचेचे विकार, मेह व इतर रोग, हे ह्या वस्तु वापरल्यानें बरे होतात, हें जगत्प्रसिद्ध आहे. गळपट्टा—लहान मुलांचे दंतोत्पत्तिसमयीं होणारे रोग शमन होऊन सुळे निर्विघ्नपणानें निघतात लेखणी—हातास कांपरें व स्मरणशक्ति, अशा ह्या उत्तम, गुणकारी, सर्व रोग शमविणाऱ्या, अंगावर सुशोभित दिसणाऱ्या, औषधी खटपट चुकविणाऱ्या वस्तूंच्या संग्रहावांचून राहूं नका.

सर्व इस्पितळांमध्यें विजेचा प्रयोग रोग्यांवर करितात, व ज्या मनुष्याच्या अंगांत शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यावर विजेचा प्रयोग केलेला पुष्कळांनीं पाहिला असेल. व त्यापासून रोगी बरे झाले आहेत. त्याबद्दल हजारों डाक्टर साक्ष देतील.

विजेच्या वस्तूची किंमत.

| | | |
|---|---|---|
| पितळी आंगठीस किं. रु. १॥ | पि. पुतळीस किं. रु. १। | धातूचे कड्यास किं. रु. १॥ |
| चांदीचे आंगठीस किं. रु. ३ | चां. पुतळीस किं. रु. २ | धातूचे लेखणीस किं. रु. १॥ |
| सोन्याचे आंगठीस किं. रु. २० | सो. पुतळीस किं. रु. २२ | रेशमी गळपट्या किं. रु. ।॥ |

केंबर पट्टा किं. रु. ६

एकदम बारा नग घेणारास एक नग जास्त मिळेल. रोख दाम आल्यास किंवा व्ही. पी. पार्सलनें मागविल्यास पाठवून देऊं. आंगठी करितां बोटाचें माप पाठवीत असावें पत्ता असावा. अनेक रोगांवर गुण आल्याचे डाक्टर, वैद्य, पत्रकर्ते, राजेरजवाडे वगैरे सद्गृहस्थांचे हजारों दाखल्याचे व विशेष माहितीचे, व एजंट व्यापारी दराचे पुस्तकाकरितां अर्धा आणा पाठवा, किंवा तें पुस्तक मालाबरोबर फुकट पाठवूं. १ पासून ६ पर्यंत ट. ह. ६ आणे बंगी करणावळ माफ.

G. B. Naik and Company
Byculla Bombay

जी. बी. नाईक आणि कंपनी

मुंबई, भायखळा जुन्या दावणी समोर; व पुणें, रविवार पेठ नं० ६०

## जाहिर खबर

बाहेर गांवच्या सर्व व्यापारी लोकांस कळविण्यांत येतें कीं; आमची पेढी मुंबईत फार दिवसांपासून चालू असून आह्मी पुष्कळ फायद्यानें माल खरेदी करून पाठवित असतों. ज्या व्यापारी लोकांस मुसारी, कापड, फरनीचरचें जातीचें सामान, लांकूड, लोखंड, किराणा, हार्डवर ( चुका, स्क्रू वगैरे ) स्टेशनरी व ग्लासलेट वगैरे कोणत्याही जातीचा माल मागणें झाल्यास आह्मी पुष्कळ फायद्यानें आणि कमेशीनानें त्वरित पाठवू एक वेळ माल मागविल्यावर खात्री होईल. आमच्या कमिशनचा भावही फारच कमी ह्मणजे शेकडा एक टक्या प्रमाणें आहे. माल मागविणें तो व्ह्याल्यू पेबलनें अगर आगाऊ रुपये पाठवून मागवावा. पण व्ह्याल्यू पेबलनें माल मागविणारांनीं शेंकडा २५ रुपये प्रमाणें रक्कम आगाऊ पाठविली पाहिजे. ज्या लोकांस माल मागविणें असेल यांनीं खालीं त्यावर आपलें नांव, गांव, स्टेशन वगैरे स्पष्ट खुलासेवार लिहून पत्रव्यवहार करावा. पत्रें पोस्टपेड पाठवावीं व उत्तराकरितां टिकीट पाठवावें.

तईयब अली मुलावली भाई.

मच्छी बाजार, अबदुल रहिमान स्ट्रीट.

## जाहिरात

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येत आहे कीं आकोला प्रांत वऱ्हाड ह्या जिल्ह्याचा अबकारी ह्मणजे सिंदी, कथली, आफु, गांजा

चा हरास सन १८९५–९६ साल आहे. या डिपुटी कमिशनर साहेब जिल्हा आकोला यांचे कचेरींत सोमवार तारीख ३ माहे फेब्रुवारी सन १८९५ इसवी रोजीं दिवसा केला जाणार आहे.

ह्या सालच्या चतुर्थांशा इतकी रक्कम अमानत ठेविली पाहिजे व दोन इसम लायक जामीन ज्यांची जगम जिनगी आकोले जिल्ह्यांत आहे असे इसम जामीन दिले पाहिजेत या शिवाय जास्त माहिती हरासाचे पूर्वी ऑफिसांत विचारल्यास दिली जाईल कळावें तारीख १७ डिसेंबर सन १८९४ इसवी.

R. A. Simpson.
for Deputy Commissioner.
Akola District.

## ह्या राजश्रीनें केव्हां तरी पळ काढला असावा

एका गृहस्थास त्याच्या धर्मवेडामुळें एक जुलमी सरकारानें कारागृह दाखविलें. ते ज्यांत कोंडला होता त्याच्या मजबूत दगडी भिंती पाहून त्याच्या मनाची खात्री झाली कीं आतां आपलें राहिलेलें आयुष्य ह्या एकांत व भयाण कारागृहांत घालविलें पाहिजे. जरी त्याला आतां पुढची गत चांगली नाहीं असें भासत होतें तरी दुःखांत सुख इतकेंच वाटत होतें कीं मला जुलमामुळें बळी व्हावें लागलें परंतु सद्वर्तनाचें उल्लंघन केल्यामुळें कांहीं नाहीं. जर त्याच्या स्वाधीनची गोष्ट असती तर ह्या संकटांतून तो सहज पार पडला असता.

असें असून त्या बिचाऱ्यास सतत सोळा वर्षे हाल काढीत रहावें लागलें. हीं वर्षे संपतात तों त्याच्या मनांत आलें कीं ह्या भिंतीवर पुढें आलेल्या दगडाच्या आधारानें वर चढावें व त्यानें खिडकीच्या वरून काय दिसतें ह्मणून वर डोकें केलें, आणि असें केल्यामुळें त्याला वाटलें कीं पुढें लोखंडाचे गज आहेत ते काढून टाकतां येतील व त्या चौकटीची आगळही लावली नव्हती. त्याच्या मनांत येऊं लागलें कीं, काय मी पळ कां न काढावा! त्यानें खिडकी तर उघडली आणि सहा फूट उडी जमिनीवर मारली आणि त्या प्रदेशास शवटचा राम राम ठोकला. जर त्यानें त्याच्या ठाम झालेल्या विचारास एकीकडे ठेवून विचाराचो दोरी जर सैल सोडली असता तर ह्या स्थळीं इतके दिवस कुंथत रहावें लागलें नसतें.

ह्या स्वत्रमार्थ प्राण अर्पण करणाऱ्या या बिचाऱ्याची देवघटित गोष्ट साधक व बाधक आहे. त्याच्या मनाची धांव बंद केल्यामुळें साधक त्याला ज्या कारणास्तव बंदींत टाकण्यांत होतें तें नसल्यामुळें बाधक.

हें गोष्ट पत्र स्त्रानें जो सर्वांस आवडते त्या प्रमाणें खालीं थोडक्यांत व साध्या शब्दांत सांगतों एक लेखक बाई ह्मणते कीं, आज सोळा वर्षे झालीं. पित्त क्षेभ नें व अशक्तपणामुळें फारच गांजून गेलें आहे. नेहमीं थकून लाऊन अगदीं हलक होऊन जाई. माझी अन्नावरची वासना उडाली. पुढें आणलेले ताटास हात लावीन तर शपथ. किंवा च्या दिसेंबरांत माझ्या एका मित्र इंग्रजानें मदर सिजेलचा क्युरेटीव सीरप ( माता शिजेलचा रोगहारक पाक ) बद्दल बरेच गुणानुवाद गाईल्यामुळें मी तें औषध घेण्यास सुरू केलें. मी थोडे थेंब घेतल्या बरोबर मला बरेंच समाधान वाटलें. आणि पुढें पंधरा दिवस औषध घेतलें नाहीं तो मला बरें वाटत होतें. मला असा धीर आला ह्मणून मी अगदीं बरी होई तों पर्यंत ह्या औषधाचा उपयोग केला. आमचे चिरंजीव आरथारास एक वर्ष सतत जेवल्यावर जड झाल्या सारखें व वेदना होत होत्या आणि पोटाची दामटी होऊन खळगा पडल्या सारखें वाटे. त्याला हें औषध घेण्याची मी गळ घातली आणि त्याचा शेवट झणाला तर माझ्या सारखाच झाला. मला पक्कें माहीत आहे कीं ह्या प्रदेशांतल्या अल्पाय मंडळींनें दुसरे नाना उपाय करून थकले न लव्ह. ह्या शिरपाचा ( पाकाचा ) उपयोग केला तेव्हां तात्काळ गुण आला. ह्या औषधाचा ह्मणजे ( माता शिजेलच्या पाकाचा ) मला रामबाण गुण आला तो इतर पिडीतास ह्या मुळें घ्यावा असें आपणास वाटत असेल तर हें पत्र आपण खुशाल छापावें.

मी तुमची

( सही ) ( मिसीस ) एम वार्ड

१५४ इकसटन रोड

शाडफर्ड नॉटिंग हाम.

ता. १ ली माहे एप्रील सन १८९२

मिसीस वार्ड बाई साहेब ह्या त्रासदायक व भयंकर रोगापासून बऱ्या झाल्या ह्मणून आह्मी तीस अभिनंदन करितों. आपल्या आयुष्यांत सोळा वर्षांचा वाटा सतत शारीरिक व मानसिक वेदनेंत घालवावा ह्मणजे फारच खराब समजावयाचें. कुबेराचे सोनही होणें फारच थोडयांच्या कपाळीं लिहिलेलें असतें. परंतु सुदृढता ही सूर्य प्रकाशासारखी सर्व जगभर जिकडे तिकडे सारखी पसरत तद्वत ही पसरली पाहिजे. ही कमी राखावी हें त्याला अवगत आहे. तर तो त्याची काळजी घेईल व ती दूर झाल्यास आपल्या स्वाधीन करून घेईल.

ह्या बाईचा रोग पचनीय पिंडाचा ह्मणजे अग्निमांद्य व अजीर्णाचा होता. जो रोग फारच धोक्याचा व दुःख देणारा आहे कारण कीं ह्या रोगाचा पगडा इतका बसतो कीं शरीरांतलीं सर्व अंगें ह्याच्या नळी पडतात व रक्ताभिसरणा मुळें ह्या रोगाचें विष सर्व शरीरांत पसरलें ह्या रोगाचें मुख्य कारण निरनिराळ्या नांवानें होणारे परिणाम व चिन्हें हीं होत. ती जें औषध सांगते त्याच्या गुणाची ज्यास चांगली माहिती झाली आहे त्यास नवल वाटण्यास नको. मोठमोठाले असाध्य रोग ह्या औषधास शरण येतात.

आमचे वीर जे आपल्या गुहेंत कसा तरी काळ काढीत होते त्यास बाहेर निघून जा...

र असल्या ... चालूं अ... हिनत. ... चा क्लब ... आहे. या

लें नाहीं तर सदहूं मालो बद्दल रुपये २८१ चो फिर्याद ह्या नोटिशीच्या खर्चासह तुह्मांवर करून ह्याचा अखेर निकाल होई पर्यंत सर्व नुकसान वगैरे भरून घेतलें जाईल. याप्रमाणें तुह्मी बेबंदशाई जुलूम वगैरे केला याजबद्दल फौजदारीत फिर्याद करून सर्व खर्चासह नुकसान भरून घेतलें जाईल ह्मणून दिली ही नोटीस सही तारीख ५

...शीचा खर्च तुह्माला द्यावा लागेल. कळावें तारीख ४ माहे जानेवारी सन १८९५

( सही )

नवाब दाउदखा व युनसखा वलद तालेमनखा शहर एलिचपूर

दस्तुर खुद्द.

## वर्तमानसार.

maltreat the innocent public—conniving at the true criminals and thus to impale them on the stake. A careful and unbiased perusal of these decisions, is the only medicinal drop, we can prescribe, for the suffering ears of this great man. We hope a speedy cure for the sore ears. We further hope that Sir W. Hunter will not allow the membrance of his ear-drum to be perforated by being beaten with the unconjinial hammer which the Anglo—Indians are using.

---

The tenth annual sessions of the National Congress concluded on 29th ultimo. The public activity and the national spirit were at their highest pitch and the whole population is undergoing a transition of national patriotism and political education. The Bombay-Presidency Association was the first to circulate the text of Mr. Alfred Web's presidential address. The Proceedings of the Congress are a sample of Indian eloquence and statesmanship of the highest watermark. The President's speech is however plain, logical and convincing. We make no apology to quote below his views about the English administration and its *summum bonum* with respect to the Indian Empire:—

"Parliament is paralysed with work. It has undertaken functions it cannot perform. Three separate Parliaments had enough to do to manage the affairs of England, Scotland, and Ireland. They were merged into one when the population of the United Kingdom was only fifteen millions. That population has now risen to thirty-eight millions. Parliament has, moreover, undertaken to care for your two hundred and eighty millions. The sphere of law is becoming both wider and more minute. Surely Parliament ought to be more of an Imperial, less of a local, assembly. For generations to come, England, the heart of the Empire, must have the preponderating influence in Imperial councils. That we grant. You, who are Indian, and I, who am Irish, trust that our Imperial rights will not suffer from that preponderating English influence. But at present the Imperial Parliament is occupied largely with the affairs of under five millions of people, and ministeries rise and fall on the question of Ireland rather than great Imperial interest. The entire Empire is concerned in the speedy settlement of the Irish question. We hold to Imperial unity undisputed and in tact.

"There is no possibility of turning back. Once imbue nations with aspirations for p[illegible]ss and enlightenment, and they [illegible] go forward towards liberty. For fifty years the Anglo—Indian Government has been urging you to educate yourselves, to imbibe principles of constitutional liberty, to obliterate old divisions, to break down caste prejudices, to rise to the level of British citizenship, and unite for the good of a common country. Taking up Sir William Hunter's *History of the Indian Peoples*, the first sentence that rivetted my attention was one in which it is desired that the Anglo—Indian school should "become the nurseries of a self-respecting nation." The towers of a university were the first object that met my gaze the morning after my arrival in India. Nationality has well been defined in your debates as "The aggregate of those who are citizens of one country" (one definite geographical unit) "subordinate to one power, subject to one supreme legislature, taxed by one authority, influenced for weal or woe by one system of administration, urged by like impulses to secure like rights and to be relieved of like burdens. It has for its central stock, like the trunk of a tree, the people who have for ages and generations settled and domiciled in a country with more or less ethnic identity at the bottom, and more or less unified by being continually subjected to identical environments and to the inevitable process of assimilation." Those who accept any such definitions circle in grooves of thought if they believe that such nationality is inimical to Imperial strength and unity. It may in truth be its outcome and its crown."

Let us however commit to memory the ever memorable advice of the father of the Congress (Mr. A. O. Hume) and we should do our most to act up to it. Towards the close of the message to the Indian Congresswallas he proceeds to observe:—

"Let it be your task now to see that your ship be well found, well provided with all those facts and figures and arguments essential to justify your several demands, alike to the British democracy and the civilised world; create special committees to compile and marshall all these separately in regard to each main grievance, so that when the time comes to take up and press these here, one by one, as will be done, we may have authoritative and exhaustive handbooks prepared by yourselves, to enable all to grasp the essential truths and qualify the people of Great Britain and Ireland to do justice—even though tardily—to the people of India. See, too, that the ship be well manned, manned by all the culture and intelligence of your vast empire, by all the best and noblest of every race and every province. Lastly, go bravely on your course, defying alike the waves of official opposition and the howling blasts of an unprincipled Anglo—Indian press, content to know that though wrong may triumph for a time, right ever prevails; that good is ever stronger in the long run than evil; and full of faith in the ultimate power which ever makes for righteousness, to meet and despise like true-hearted mariners the trials and labours that beset your course, knowing that if you do your duty and quit yourselves like men, your beloved ship shall yet attain safely the coveted haven of peace, prosperity, and freedom. Go on, be strong, be brave, be unremitting in your exertions. You cannot fail, for your cause is righteous. You have the sympathy of all the best and noblest men of all nations who know the facts of your cause, and behind you, making that cause his own comes, silently but irresistbly, the Spirit of the Age."

---

## वऱ्हाड.

कर्नल मेकंझी साहेब सी. आय. इ. रजेवरून परत आपल्या कामीं रुजूं झाले. साहेब बहादूर लवकरच पेनशनदार होतील तेव्हां त्यांच्या मागून कर्नल स्पान्सकी किंवा मि. बुलक यांस अथवा कमिशनरचे रेसिडेंट होण्या सारखे लायक पोलिटकल खात्यांतील अधिकारी यांस कमिशनर नेमावें अशा विषयीं सल्ला करण्या साठीं मि. फ्रेडन हे कलकत्यास गेल्या विषयीं बातमी आहे.

अखिशांन रेसिडेंट मि. फ्रेडन हे वऱ्हाडांत येत्या १२ वे तारखेला येणार असल्या वरून त्यांच्या स्वागताची तयारी चालूं असल्या बद्दल 'प्रमोदसिंधु' कर्ते लिहितात.

अकोल्यास एक आट्यापाट्याचा क्लब आहे तसा उमरावतीस ही एक आहे. या उभय मंडळी मध्यें गेल्या १ तारखेस उमरावतीस म्याच झाली तिजविषयीं 'प्रमोदसिंधु' कर्ते लिहितात कीः—

आट्यापाट्या म्याच—अलीकडे होतकरू व तरुण विद्यार्थ्यांचें मन शारीरिक व्यायामाकडे लागत चाललें आहे हें पाहून आह्मांस संतोष वाटतो. ह्या आठवड्यांत अकोला आट्यापाट्या क्लबची मंडळी येथें आली होती त्यांची व येथील आट्यापाट्या क्लबच्या मंडळीची म्याच झाली. उमरावती क्लबनें थोड्या मार्कांनीं जय मिळाला. अकोल्याच्या मंडळींपैकी दोघे तिघे चांगले खेळणारे होते.

मे. हेअर साहेब हे आज रोजीं खामगांव मुक्कामाला आहेत.

उमरावतीस लेडी डफरीन फंडानें बांधलेल्या भव्य दवाखान्याचा प्रवेश समारंभ येत्या १९ वे तारखेस मि० फ्रेडन यांच्या अध्यक्षते खालीं होणार आहे.

---

### नोटीस.

रा. रा. भगवान वल्लद वाघोजी पाटील राहणार बोरीअडगाव ता० खामगांव जिल्हे अकोलें यास नोटीस देणार राघोजी वल्लद आवजी ठोंबळे राहणार गोवणपुर ता० मलकापुर नोटीसीनें असें कळवितो कीं अम्हीं सोनाजी वल्लद राघोजी राहणार आठळी ता० खामगांव. याचे शेत उभे पीकाचे सर्व्हे नंबर १३८ सरकारदेणें रुपये (२०) अकोतीचे यातांचा निमे हीसा खरेदी घेतला वे त्याजबद्दल रिती प्रमाणें कागद वगैरे करून घेतला व आमचे ताब्यांत घेउन शेतांतील निमे हिशाच्या पिकाचा बंदोबस्त व राखण करून पीक आमचे हिशाचे आह्मांस मिळणे करितां तजविज केली व तजविजी प्रमाणें कडबा सांगला. असें असता तुह्मीं आह्मास व आमच्या राखणदार माणसास धमकी देऊन व आह्मांवर जुलूम व मारहाण करून सदरहू शेतातील आमचे निमे हिशाचा माल झोटींगशाई करून घेऊन गेला तो माल येणे प्रमाणें:— जवारी निमे आमच्या हिशाची खामगांव माप खंडी पांच (५) दर खंडीस रुपये ४० चाळीस प्रमाणें रुपये जवारीचे २००; कडबी तीन हजार (३०००) दर हजारी रुपये २० प्रमाणें कडबीचे रुपये ६० व उडीद मण पांच ५ खामगांव मापी, व मुग मण दोन २ खामगांव मापी. दर मणी भाव रुपये ३ प्रमाणें रुपये २१. असे मिळून एकंदर माल रुपये २८१ दोनशें एक्यांशी रुपयांचा जुलूम करून लुटून घेऊन गेला. तर असें तुह्मी करण्याचें कारण ही नोटीस पावल्या पासुन आठ ८ दिवसांत समाधान कारक सांगावें व आमचे समाधान रितशीर करावें. असें झाले नाहीं तर तुह्मांवर आह्मी फौजदारींत काम चालविणार आहो. व सदरील लिहिलेले प्रमाणें तपशीलवार मालाचे रुपये २८१. नोटीस पावल्या पासून आठ दिवसांत आणून निकाल करून पावती घ्यावी व पुन्हा आमचे बरोबर अशा कोणते ही प्रकारची झोटिंगशाई करणार नाहीं अशा बद्दल आमची पक्की खात्री करावी. असें केलें नाहीं तर सदरहू माला बद्दल रुपये २८१ ची फिर्याद ह्या नोटिशीच्या खर्चासह तुह्मांवर करून ह्याचा अखेर निकाल होई पर्यंत सर्व नुकसान वगैरे भरून घेतलें जाईल. याप्रमाणें तुह्मी बेबंदशाई जुलूम वगैरे केला याजबद्दल फौजदारीत फिर्याद करून सर्व खर्चासह नुकसान भरून घेतली जाईल ह्मणून दिली ही नोटीस सही तारीख ५ माहे जानेवारी सन १८९५ इसवी.

(सही)

राघोजी वल्लद आवजी ठोंबळे रहाणार गोघणापूर दस्तुर खुद

---

### नोटीस

नोटीस बेशमी फत्तेराम शालिग्राम साहु राहणार एलिचपूर पैकीं देवढा. यांस खालीं सही करणार यांजकडुन नोटीस देण्यांत येते कीं आमचे इलाख्यापैकीं देवढी वरील सन्यावतगंज व फत्तेगंज येथील मडग्या ९ नऊ तुमचे कडेस किरायानीं आहेत. त्या नऊ मडग्यांचे किरायाचा पैसा तुह्मी तारीख १ माहे अक्टोबर सन १८९२ इसवी पासून तारीख ३१ माहे दिसेंबर सन १८९४ इसवी पर्यंत दिला नाहीं. ह्या नऊ मडग्याचा किराया दरमहा दोन रुपये तीन आहे प्रमाणें आहे. तरी दोन रुपये तीन आणे प्रमाणें तारीख ३१ दिसेंबर सन १८९४ इसवी पर्यंत २७ महिन्याचे भाडे ५९।८।१ एकुण साठ रुपये एक आणा नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत आणून द्यावें. आणि पुढें तारीख १ माहे जानेवारी सन १८९५ पासून जर मडगीस दोन रुपये प्रमाणें किराया कबूल असेल तर आमचे कडेस येऊन वरील मुदतीत भाडे चिठ्ठी करून द्यावी. असे कबूल नसल्यास मडग्या खालीं करून द्याव्यात. जर खाली करून देणार नाहीं तर दर मडगीस दोन रुपये किराया तुह्मास कबूल आहे असे समजले जाईल व सदरहू प्रमाणें किराया घेतला जाईल आणि नोटिसीचा खर्च ही तुह्मास द्यावा लागेल. कळावे ता. ४ माहे जानेवारी सन १८९५ इसवी.

(सही)

नबाब दाऊदखां व युनसखां वल्लद ताजेमनखां शहर एलिचपूर दस्तुर खुद.

---

### नोटीस

नोटीस बेशमी जोतालाल घासीराम मारवाडी राहणार एलिचपूर पैकीं देवढी यास— खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं आमचे इलाख्या पैकीं बहलोलगंज येथील मडग्या ३ तुमचे कडेस किरायानें आहेत त्या पैकीं दोन मडगीचा किराया दरमहा १।०।१२ प्रमाणें व एक मडगीचा दरमहा ०।६ आणे प्रमाणें एकूण २।०।२ दरमहा किराया तुमचे कडेस आहे. आतां तारीख १ माहे जानेवारी सन १८९५ इसवी पासून तीन मडग्यांचा किराया दरमहा ३।०।१२ प्रमाणें द्यावेत. व त्या प्रमाणें भाडेचिठ्ठी करून द्यावी. सदरहू किराया तुह्मांस कबूल नसल्यास ही नोटीस पावल्या तारखे पासून आठ दिवसांचे आंत मडग्या खाली करून द्याव्या. वरील मुदतींत या नोटिशी प्रमाणें अमलबारी न केल्यास तुह्मास वर लिहिलेला किराया कबूल आहे असें समजलें जाऊन ३।०।१२ प्रमाणें किराया तुमचे जवळून घेतला जाईल व या नोटिशीचा खर्च तुह्माला द्यावा लागेल. कळावें तारीख ४ माहे जानेवारी सन १८९५

(सही)

नबाब दाउदखा व युनसखा वल्लद ताजेमनखा शहर एलिचपूर दस्तुर खुद.

---

## वर्तमानसार.

सर विलियम लॉकहार्ट यांनीं कांहीं फौजेनिशीं वझीरी लोकांवर चाल केली आहे असें कळतें. परिणामाकडे नजर नाहिं. वझीरी लोकांची संख्या २७ हजार आहे. त्यांच्यावर कर्नल मेसनहे, शिवीकोटहुन फौजेनिशीं गेले आहेत, परंतु वझीरी लोकांचा ठिकाणा विशेषसा लागला नाहीं. वझीरी लोकही साम, दाम, दंड, भेद इत्यादि युक्त्यांत वस्ताद आहेत असें दिसतें. कारण, त्यांचें कोणतेंही एक प्रकारचें बोलणें किंवा आचरण कायम राहत नाहीं. "जशास तसा भेटे व मनीचा संशय फिटे" हें खरें आहे. इंग्रजांनीं एका डोंगरी किल्यावर हल्ला केला, पण वझीरी लोकांनीं बरीच टक्कर दिली, शिवाय इंग्रजांचे कांहीं उंटही पळवून नेल्याचें कळतें. सगळ्या वझीरी तांड्यावर मल्ला पोविंदा मुख्य असून, तो मोठ्या तयारींत आहे.

विजापूरचे जज्ज मि. त्र्यंकटराव रुकमांगत इनामदार हे रेल्वेच्या सेकंड क्लासांत बसून मुंबईहून पुण्यास जात होते, ३६व्या बाटाचे ९ सोल्जीर त्यांच्या डब्यांत आले त्यामुळें मि. इनामदार त्याच डब्याच्या दुसऱ्या अर्ध्या भागात गेले व सामान पहिल्यातच राहिलें, त्यांच्या सामानांत १०००० रुपये किंमतीच्या जवाहिरानें भरलेली एक पेटी होती. पेटी फोडण्याचा आवाज तळेगांवास त्यांच्या कानीं आला. त्यावरून दोन भागांच्या मधला दरवाजा उघडला तों पेटी फोडलेली आढळली. खडकीस आल्यावर फिर्याद केली व त्या सोल्जरांस दाखविलें. त्यांतील चौघे रेल्वेच्या खिडक्यांतून उड्या मारून जाण्याचा यत्न करीत होते. व त्यामुळें एकास इस्पितळांत नेण्या सारखी इजाही झाली. बाकीच्यांस कैद केलें. त्यांच्या जवळ कांहीं मुद्देमाल सांपडला नाहीं, पण एक सोल्जीर मुतरींत लपला होता तेथें एक रेशमी रुमाल मिळाला. पुढें खडकी व तळेगांव यांच्या दरम्यान रेलवेच्या रस्त्यावर ४,००० रुपयांचा माल सांपडला व ता. २६ रोजीं आणखी १९०० चा सांपडला. तपास चालूं आहे.

भुतान डोंगरपायथ्यापाशीं मि. गेकब नांवाचा एक साहेब मासे मारीत असतां एक हत्ती बाहेर आला व त्यानें त्या साहेबांस बराच घायाळ केला.

ग्वाल्हेरच्या महाराजांचे ३॥ कोटी रुपये जे इंग्लज सरकारच्या खजिन्यांत आहेत ते नवीन नियमा प्रमाणें ३॥ टक्यांच्या व्याजाच्या दरानें ठेवण्याचें नव्या शिंदे महाराजांनीं कबूल केलें.

मुंबईसरकारचे लॉ वार्नर साहेब हल्लीं रजेवर विलायतेस असून इतक्यांत परत येऊन आपल्या जागीं रुजूं होणार आहेत. असें सांगतात कीं, आज तीन गव्हर्नरांच्या आगमनाच्या वेळीं हे साहेब रजा घेऊन विलायतेस जाऊन राहतात व नवा गव्हरनर येण्याच्या सुमारास तेही रजेवरून येऊन रुजूं होतात. हा असा प्रकार कसा जमून येतो कोण जाणें, पण जमून येतो हें खरें; मग तो मुद्दाम जमून आणण्यांत येत असेल तर मोठ्या गमतीचा व शहाणपणाचा आहे. खंडेराव गायकवाडांच्या वेळीं तेथें एक रेसिडेंट असत व मुंबईसरकारांत एक कौंसलदार असत व ते दोघेही एक वेळ रजेवर गेले असें कधींच झालें नाहीं. असें त्या वेळींहि एका पत्रांत प्रसिद्ध झालें होत.

मुंबईच्या हल्लींच्या गव्हरनरांनीं या इलाख्यांतील लोकांस खिलाडु करून टाकलें व येणारे गव्हरनर लोकांना तालीमबाज करून टाकतील असें त्यांच्या बाहेर अलेल्या हातिहासावरून दिसतें.

मुंबईचे नवे गव्हरनर लार्ड सांडर्स्ट हे मुंबईस येण्या करितां २१ फेब्रवारी रोजीं विलायतेहून न निघतां ता. ३ रोजीं निघतील व ते मुंबईस दाखल होतांच हरीस बोबा त्याच दिवशीं आगबोटींत बसून चालते होतील असें सांगतात.

कोल्हापूरच्या तुरुंगांत एक सबरजिस्टर शिक्षा भोगीत असतां एका शिपायानें त्याच्या बायकोस नवऱ्यानें भेटण्यास बलावलें आहे असें सांगून तुरुंगाकडे नेलें व तिच्या आंगावरचे दागीने घेण्याचा वगैरे इलाज केला अशी एक गोष्ट तेथील पत्रांत प्रसिद्ध झाली आहे.

चित्रळ व हुंजा हीं ठिकाणें इंग्रजसरकारानें आपल्या ताब्यांत घेतल्यानें सरहद्दीवरचें भय कमी होण्यास कारण आहे; त्याचप्रमाणें तें भय जास्त कमी करण्याकरतां पेशावर व चित्रळ यांच्या दरम्यान सरळ रेलवे करणेंही जरूर आहे; आणि रशिया, चीन व इंग्लंड हे तिघेही एकमेकांच्या संबंधानें सरहद्दीबद्दलच्या विचारांत आहेत असें क्यापटण यंगहसबंड यांचे ह्मणणें आहे.

अर्मेनियन प्रकरणाचा तपास करण्यास जाणाऱ्या कमिशनाबरोबर अमेरिकेच्या वकीलास जाण्याची टर्कीच्या सुलतानानें मनाई केली.

लॉबक प्रांतांत डच लोकांचें वर्चस्व स्थापन होऊन सर्व शांतता झाली. आतां तेथें फक्त २ पलटणी मात्र ठेवण्यांत येणार, तेथील प्रधान कारन मेसन येथें पळून गेला असल्यामुळें त्याच्यावर एक फौज पाठविण्याची तयारी चालली आहे.

अर्मेनियांतील बंदोबस्ताकरतां टर्की सरकाराकडून नवी फौज जात आहे.

सौथ इंडियन रेलवेच्या गंटाकल धर्मवर्म फांट्या पासून १८२ मैलांवर रेलवे कंपनीची एक दगडाची खाण आहे व त्यांतील दगड रेलवे कंपनी रिकाम्या जाणाऱ्या गाड्यात बालस्ट भरण्याच्या कामीं लावीत असे, त्या खाणींतल्या दगडांत सोनें आहे असें अलीकडे आढळलें व त्यावरून त्या भागाच्या कलेक्टरानें त्या खाणींतील दगड वापरण्याची रेलवे कंपनीस मनाई केली आहे असें ह्मणतात.

फ्रेंच आफीसर मादागास्कर येथें जाऊन दाखल झाले व त्या प्रांतावर त्यांणी आपला पाहारा सुरू केला. एक लहानशी लढाई झाली व त्यांत होवा फौज मागें हटली फ्रेंच फौजेनें होवा किल्ला सर केला व होवा लोकांनीं एक ठिकाण जाळलें.

युरोप व एशिया यांच्या दरम्यान चालणारी रशियनसरकार जी एक सैबेरियन रेलवे करीत आहे ती जगांत शांतता करण्याकरतां व सुधारणा करण्याकरतांच आह्मी करीत आहों असें रशियन बादशहाचें ह्मणणें आहे.

अरुणो॰

हिऱ्यांचा पाऊस—भागलपुराजवळ सबाऊर येथें पावसाची एक सर पडली, त्यांत निरनिराळ्या आकाराच्या व पैलूच्या हिऱ्यांसारखी वृष्टि झाली, त्यांतील वस्तु भागलपूरच्या कलेक्टरांकडे आल्या आहेत असें समजतें.

माजिस्ट्रेटची लीला—ढाका येथील डेपु॰ माजिस्ट्रेट मि॰ फोर्डिस यांच्या अगाध कायदे पांडित्याचें व सरळपणाचें एक उदाहरण ढाका ग्याझेटांत प्रसिद्ध झालें आहे; तें असें:- मनोहरदास नांवाच्या एका मनुष्याकडे एक दागिना विकावयास आला होता. पण तो आणणारा अनोळखी असल्यामुळें त्यानें पोलिस चौकीवर दोन मनुष्य पाठवून तो दागिना विकत घेण्यास कांहीं हरकत आहे कीं काय! असें विचारिलें; पोलिसानें कांहींच जबाब दिला नाहीं यामुळें त्यानें तो डागिना ही घेतला नाहीं. दुसऱ्या एकानें घेतला अशी हकीगत बाहेर होती एवढ्या वरून सदरहु माजि॰ नीं त्याला कोर्टांत साक्षीस बलावून आणून त्यावर मदतीचा चार्ज ठेविला. मनोहरानें आपल्या रक्षणास एक वकील बलाऊन आणिला. त्या वकिलानें माजि॰ स सुचविलें कीं, १९१ कलमाच्या सी. रकमे प्रमाणें आपणांस अधिकार नाहीं त्यावर कोर्टानें सांगितलें कीं, माझा अधिकार पाहण्याचा तुह्मांस अधिकार नाहीं. मीं ह्या आरोपीवर मदतीचा च्यार्ज ठेवितों. वकिलांनीं साहेबास पुन्हा सविनय सुचविलें कीं, आपणा करतां हें अगदीं गैर कायदा आहे. त्यावर कोर्ट ह्मणालें कीं, मी तुमचें ऐकत नाहीं, जास्त बोलाल तर तुह्मांस दंड करीन" वकिलांनीं पुनः सांगितलें कीं, मला तुह्मी दंड करूं शकाल; परंतु मी पुनः सुचवितों कीं तुमचा हुकूम गैरकायदा आहे. कोर्टानें वकिलास बाहेर चालते व्हा ह्मणून सांगितलें. पुनः वकील ह्मणाले "मी बाहेर जातोंच परंतु मी पुनः ह्मणतों कीं तुमचा हुकूम अगदीं गैरकायदा आहे" इतकें भाषण होऊन माजि॰ नीं मनोहरावर चार्ज ठेऊन त्याचा ३०० रु. चा जामीन घेण्याचा हुकूम केला ! !

गोव्यांतील सोडावाटर करणारांनीं करंज्याचें पाणी वापरावें; दुसरें पाणी वापरल्यास दंड होईल. असा गोवें सरकारानें ठराव केला आहे. तसेंच पंजी येथील खाणावळ वाल्यांनीं ता॰ १ जानेवारी पासून सरकारातून पास घ्यावे; तसे घेणार नाहीं त्यास दंड होऊन शिवाय त्यांच्या खाणावळी बंद केल्या जातील, असाही एक ठराव करण्यांत आल्याचें समजतें.

काबूलचे अमीर मि॰ पेन साहेबांसह वर्तमान विलायतेस जाण्यासाठीं येत्या मार्चांत काबुलांतून निघणार.

भेद पाडण्याचा हुकूम—म्युनिसिपालिटींत जे हिंदु लोक मेंबर होऊं इच्छित असतील, त्यांस फक्त हिंदु लोकांनींच मतें द्यावीं, आणि ह्या प्रमाणेंच मुसलमानांस मुसलमानांनीं मतें द्यावीं असा हिंदु मुसलमानांत भेद पाडणारा हुकूम बायव्य प्रांताचे सरकारानें केल्यामुळें त्या विरुद्ध अमृतसर येथील लोकांनीं पुष्कळ अर्ज केले आहेत असें कळतें.

स॰ शो॰

सुरत, भरूच, नवसारी वगैरे प्रदेशांत दारू व ताडीचा प्रतिबंध जारीनें चालविला आहे. परंतु कदाचित् एकदम हा प्रतिबंध होण्यास कठीण जाईल. या पेक्षां प्रथम दारूचा प्रतिबंध करून, ताडीचा प्रतिबंध मागाहून करण्याची तजवीज केल्यास हें काम सहजेंसहजीं वाढणार आहे. पुढारी लोकांनीं याबद्दल अवश्य विचार करावा.


## जाहिरात,

हे पाक पौष्टीक पहा, व त्वरित गुण—पण—तो मजेबाज—किंमत थोडी, व फायदा जास्त— हे सेवन करून अनुभव घ्या. ह्या पासून धातुवृद्धि होऊन मर्दुमी वाढते, व शक्ति स्फूर्ति व स्मरणशक्ति फार मिळेल. आणि श्रम पडून मेंदु बिघडतो तो मस्तक मेंदु तरावट होईल. हात पाय व कंबर व सर्व सांधे दुखतात तो वायु व बाळंत वायु व सर्दी हे सर्व दूर होतील. सर्व स्त्रियांस व हटकून बाळंतिणीस व तिचे रोगावर खाण्यास गुण देणार योग्य—सौभाग्यसुंठ. हे सर्व आमचे दवाखान्यांत विक्रीस तयार आहेत. ज्यांना लागेल त्यांनीं रोख पैसे पाठवून अगर व्ह्याल्यु पेबल पार्सलानें मागवावें. खाण्याचे रीतीचा खर्डा या सोबत देऊं. दर खालीं लिहिले प्रमाणें.

त्वरा करा! पोटास खा!! गेला हिंवाळा येणार नाहीं!!! वाचा पहा— साळंमिश्री पाक दर १ शेरास किंमत रु॰ ३; बदाम पाक दर शेरास २॰८; गोखरू पाक शेरास रु॰ ५ पांच; कंहळे पाक शेरास रु॰ ४; सौभाग्य सुंठ उत्तम शेरास रु॰ २. प्रत दुसरी—साळंमिश्री व बदाम पाक दर शेरास रुपये २.

पत्ता व सही.

शिवचरणगीर रामगीर वैद्य कुणखेडकर
दवाखाना अंकोला वऱ्हाड.

## घड्याळ.

किं. रुपये ६ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेकेव रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ ज्युएलचें (ह्मणजे चक्रांचे खालीं वर हिरे बसविलेले आहेत) चावी देण्यास मोगरा. कांटे रासकोप प्रमाणें, आंकडे ठळक बिलोरी काचेचे मुद्दाम युरोप मध्यें करविलेलें. या वर आमचें नांव आहे. हें खिशांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।११ वर्षें दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. जास्त काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें वाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकलें नाहीं. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता—
गोविंद महादेव पोळ
वाच मेकर
नाशिक


☞ हें पत्र आकोलें येथें के॰ वा॰ खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

Annual in arrears 7 „ Rs. 8 as
Six monthly ......... 3 „ 8 as
Single copy ............................ 4 as

सालअखेर " ७ " १८
किरकोळ अंकास ................ ०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.... ०।०६
दुसरे खेपेस ........ ०३

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

- Advertisement
Below 10 lines... 2 Rs
per line over 10... 4 as
Repetition per line 3 as

VOL XXIX AKOLA MONDAY 14 JANUARY 1895 NO. 2

वर्ष २९ आकोला सोमवार तारीख १४ माहे जानेवारी सन १८९५ इ० अंक २

ESTABLISHED IN 1880.

HEALTH REGAINED AND STRENGTH MAINTAINED.

जी. बी. नाईक कंपनीच्या

जग प्रसिद्ध गुणावह.

विजेच्या आंगठ्या, पुतळया, कडीं, लेखण्या व गळपट्टे वगैरे

प्रत्येक वस्तुवर G. B. N. मार्क पाहून घेत जा. खोटा माल घेऊन फसू नका.

११०००० वर विकल्या, रोज पुष्कळ खपत आहेत.



गुण आल्याचे हजारों दाखले मिळाले आहेत व नित्य मिळतात.

रक्त हें मनुष्याचें जीवित आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे




रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग अशक्तपणा, संधिवायु, शिरागतवायु, पोटांत वायु धरणें, कंपरें, हातपाय गळून जाणें, स्त्रियांचे बाळंतरोग वगैरे काळजाचे दर्द, सर्व पकारचे ज्वर, अर्धशिशि, मस्तकशूल, मलावरोध, छातींत जळणें व दुखणें गळा सुजणें, सर्व प्रकारच्या मुळव्याधी. पाठींतील अशक्तपणा निद्रा न लागणें, मूत्राशयांतील रोग, खोकला, दमा, गजकर्ण, त्वचेचे विकार, मेह व इतर रोग, हे ह्या वस्तु वापरल्यानें बरे होतात, हें जगत्प्रसिद्ध आहे. गळपट्टा—लहान मुलांचे दंतोत्पत्तिसमयीं होणारे रोग शमन होऊन सुळे निर्विघ्नपणानें निघतात लेखणी—हातास कांपरें व स्मरणशक्ति, अशा ह्या उत्तम, गुणकारी, सर्व रोग शमविणाऱ्या, अंगावर सुशोभित दिसणाऱ्या, औषधी खटपट चुकविणाऱ्या वस्तूंच्या संग्रहावांचून राहूं नका.

सर्व इस्पितळांमध्यें विजेचा प्रयोग रोग्यांवर करितात, व ज्या मनुष्याच्या अंगांत शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यावर विजेचा प्रयोग केलेला पुष्कळांनीं पाहिला असेल. व त्यापासून रोगी बरे झाले आहेत. त्याबद्दल हजारों डाक्टर साक्ष देतील.

विजेच्या वस्तूंची किंमत.

| | | |
|---|---|---|
| पितळी आंगठीस किं. रु. १॥ | पि. पुतळीस किं. रु. १। | धातूचे कड्यास किं. रु. १॥ |
| चांदीचे आंगठीस किं. रु. ३ | धा. पुतळीस किं. रु. २ | धातूचे लेखणीस किं. रु. १॥ |
| सोन्याचे आंगठीस किं. रु. २० | सो. पुतळीस किं. रु. २२ | रेशमी गळपट्टा किं. रु. १॥ |

केबर पट्टा किं. रु. ६

एकदम बारा नग घेणारास एक नग जास्त मिळेल. रोख दाम आल्यास किंवा व्ही. पी. पार्सलनें मागविल्यास पाठवून देऊं. आंगठी करितां बोटाचें माप पाठवीत असावें पत्ता असावा. अनेक रोगांवर गुण आल्याचे डाक्टर, वैद्य, पत्रकर्ते, राजेरजवाडे वगैरे सद्गृहस्थांचे हजारों दाखल्याचे व विशेष माहितीचे, व एजंट व्यापारी दराचे पुस्तकाकरितां अर्धा आणा पाठवा, किंवा तें पुस्तक माला बरोबर फुकट पाठवूं. १ पासून ६ पर्यंत ट. ह. ६ आणे बंगी करणावळ माफ.

G. B. Naik and Company
Byculla Bombay

जी. बी. नाईक आणि कंपनी.

मुंबई, भायखळा जुन्या दुकाणी समोर; व पुणें, रविवार पेठ नं० ६०

## जाहिर खबर

बाहेर गांवच्या सर्व व्यापारी लोकांस कळविण्यांत येतें कीं; आमची पेढी मुंबईत फार दिवसांपासून चालूं असून आह्मी पुष्कळ फायद्यानें माल खरेदी करून पाठवित असतों. ज्या व्यापारी लोकास भुसारी, कापड, फरनीचरचें जातीचें सामान, लांकुड, लोखंड, किराणा, हार्डवेर ( चुका, स्कू वगैरे ) स्टेशनरी व ग्यासलेट वगैरे कोणत्याही जातीचा माल मागणें झाल्यास आह्मी पुष्कळ फायद्यानें आणि कमेशीनें व त्वरित पाठवू एक वेळ माल मागविल्यावर खात्री होईल. आमच्या कमिशनचा भावही फारच कमी ह्मणजे शेंकडा एक टक्या प्रमाणें आहे. माल मागविणें तो व्हाल्यू पेवलनें अगर आगाऊ रुपये पाठवून मागवावा. पण व्हाल्यू पेवलनें माल मागविणारांनीं शेंकडा २५ रुपये प्रमाणें रक्कम आगाऊ पाठविली पाहिजे. ज्या लोकांस माल मागविणें असेल त्यांनीं खालील पत्त्यावर आपलें नांव, गांव, स्टेशन वगैरे स्पष्ट खुलासेवार लिहून पत्रव्यवहार करावा. पत्रें पोस्टपेड पाठवावीं व उत्तराकरितां टिकीट पाठवावें.

तईयब अली मुलावली भाई.

मच्छी बाजार, अबदुल रहिमान स्ट्रीट, मुंबई.

अकोला म्युनिसिपाल कमिटीचे सेक्रटरी मे. महमद हुसेन यांच्या हुकुमा अन्वयें प्रसिद्ध करण्यांत येतें कीं खालील जाहिरात तारीख ३१-१२-९४ चे पत्रांत दिली आहे परंतु मराठि तर्जुम्यांत चूक आहे असा आढळ झाला सबब ती जाहिरांत सेक्रेटरी साहेबां कडून दुरुस्त होऊन आल्या प्रमाणें समग्र खालीं दाखल करण्यांत येत आहे: —

## जाहिरात.

या नोटिसीनें सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं आकोला म्युनिसिपाल कमिटीनें मेहेरबान डेप्युटी कमिशनर साहेब यांचे मंजुरातीनें म्युनिसिपल हद्दींत मुर्दे पुरण्याच्या व जाळण्याच्या जागा खालीं दाखविल्या प्रमाणें नमूद केल्या आहेत.

अक्कलकोट सर्व्हे नंबर ४ यातील ९ एकर १३ गुंठें इतकी जमीन मुसलमान लोकांस पुरण्या करितां राखली आहे.

शावनवासपूर सर्व्हे शेत नंबर २१ यांतील ५ गुंठे जमीन व नदीच्या सरहद्दीतली २९ गुंठे जमीन हिंदुना जाळण्या करितां.

सुकापूर सर्व्हे शेत नंबर १० व शावनवासपूर सर्व्हे शेत नंबर २१ या दोन नंबरातून प्रत्येकी ४ एकर जागा हिंदुना पुरण्या करितां.

ताजनापूर सर्व्हे शेत नंबर १२ हें सर्व शेत मुसलमान लोकांना पुरण्या करितां

ताजनापूर सर्व्हे शेत नंबर १३ यांतील ५ एकर २४ गुंठे जमीन हिंदुलोकांना पुरण्या करितां नदीच्या हद्दीतील ३ एकर २९ गुंठे इतकी जमीन हिंदुना जाळण्या करितां.

Md. Husain.
सेक्रेटरी
म्युनिसिपल कमिटी
आकोला.

### NOTICE

It is hereby published for information that the Municipal Committee at Akola have with the sanction of the Deputy Commissioner set apart the following plots as burial and burning grounds within Municipal area.— Akalkote Survey field No. 4 acres 9 gunthas 13 have been set apart as burial ground for Mohamedans.

Shavanwaspur Survey field No. 21 5 gunthas with 29 gunthas from the river limit set apart as burning ground for Hindus

Sukapür S. field No. 10 } 4 acres from each of the fields as burial ground for Hindus.
Shavanawaspur S. field No. 21 }

Tajnapur S. field No. 12—whole of the field as burial ground for Mohamedans.

Tajnapur S. field No 13—5 acres 24 gunthas as burial grounds for Hindus and 3 acres 29 gunthas from river limit as burning ground for Hindus.

Md. Husain
Secretary
Municipal Committee
Akola

## मुलांचा शिक्षणक्रम

( "भुंगा" यांजकडून लि. आ. मजकूर. )

प्रत्येक मानवी प्राण्याला संसाररूपी नाटकांत आपल्या कडेस असलेल्या भूमिकेचें काम केलें पाहिजे; आणि त्या भूमिकेचा अभिनय करित असतांना आयुष्यक्रमात जीं कृत्यें अवश्य घडून येतात, त्या पैकीं कांहीं विवक्षित कर्त्यें त्यानें केलीं पाहिजेत. हीं कृत्य जशीं बरीं अथवा वाईट केलीं जातील त्या मानानें प्रत्येक पात्राच्या गुणावगुणाचा विचार केला जाईल ह्मणून प्रत्येक मनुष्यानें आपल्या वरील जबाबदारी ओळखून, ती काळजीपूर्वक योग्य रीतीनें बजाविली पाहिजे. असें करण्यात त्याच्या स्वतःच्याच हिताहिताचा संबंध नसून सर्व मानव जातीच्या हिताहिताशीं संबंध आहे. इतरा संबंधानें आपलीं कर्तव्यें कोणतीं आहेत, हें ज्यांस लवकरच कळून तसें वागण्याचा वळ मिळाला आहे, अशींच मनुष्यें आपल्या आयुष्यभर स्वतःचें, दुसऱ्याचें हित जेणें करून होईल, अशीं कृत्यें करूं शकतील, एका मार्मिक कवीनें ह्मटलें आहे कीं, " बाळपणीं बाळांची कोमळ तरुतुल्य बुद्धि वांकेल। घेईल ज्या गुणाला तो गुण मतिदिष्टनीहि फांकेल " ॥ मनुष्याचा स्वभाव पूर्णपणें बनण्यापूर्वीं लहानपणा पासूनच आपलें कर्तव्य काय आहे, हें समजण्याची किती अवशक्यता आहे, हें वरील वचना वरून दिसून येतें आजपर्यंतचा अनुभवही असाच असल्यामुळें वरील वचनास महत्व व बळकटी आली आहे. इतिहासप्रसिद्ध होऊन गेलेल्या थोर पुरुषांचें ह्मणणें आहे कीं, आपल्या मनांत लहानपणींच जो सद्बोध ठसला गेला, त्या मुळेंच आपणांस थोरवी व वैभव प्राप्त झालें.

ह्मणुन, मानवी जातीची सुधारणा होण्याचें महत्कृत्य शिक्षणावर अवलंबून आहे. कोंवळीं मनें संस्कृत करून त्यांना वाढवून पूर्णतेस आणण्याची व वळण लावून देण्याची जबाबदारी त्यांच्या माथी आहे. त्यांनीं असें समजलें पाहिजे कीं, ईश्वरानें मनुष्याच्या वाट्यास जीं कामें ठेविलीं आहेत त्या पैकीं अत्यंत महत्वाचें हें एक काम आहे. ह्या कामाची जबाबदारी ओळखल्या शिवाय अथवा तें तडीस नेण्याची काळजी घेतल्या शिवाय, तें सहज रीत्या हातीं घेण्या सारखें नाहीं. हें काम किती महत्वाचें आहे हें जि-

तकें लिहावें तितकें थोडेंच. मुलाचा शास्ता आणि पालनकर्ता या नात्यानें असलेल्या आईबापांच्या कर्तव्याचा परिणाम मानवी कृतीवर दीर्घ काळपर्यंत राहतो. लहान मुलांच्या कोंवळ्या मनास याचे पालक ज्या दिशेनें वळण देतील त्या दिशेस तें वळेल. ह्मणून मुलांची भावी कर्मदशा कांहीं अंशीं त्यांच्या पालकांच्या हातीं आहे. तान्ह्या मुलासह एका आईची प्रतिमा, आनंद देणाऱ्या कल्पनासृष्टीनें उत्पन्न करून आपल्या मनोभूमीवर तिला आणूं या. मातेच्या उत्तुंग हृदयावर विराजित झालेलें हें कोमल अर्भक पाहिलें कां? किती गोंडस! आणि किती सुंदर! याच्या निर्मळ अंतःकरणांत, ईश्वरानें निर्माण केलेल्या शक्तीपैकीं एक प्रचंड शक्ति—मानसशक्ति—वास करीत आहे. हिच पासून जगांत जीं बरीं वाईट कार्यें घडून येतात अथवा हिजपासून कल्पनेचीं, विचाराचीं आणि बुद्धीचीं जीं निरनिराळीं अनंत कार्यें घडून येतात, तीं सर्व कार्यें करणारी मानसशक्ति या ठिकाणीं अवरोधित झालेला आहे; परंतु तिच्या अंगीं अजून जाणीवपणा आला नाहीं. ती हल्लीं अज्ञानरूपी तमांत पहुडलेली आहे. ज्ञानाचीं, प्रतीतीचीं, आणि सत्याचीं प्रतिक्षणीं वर्धमान होणारीं किरणें तिचें सभोंवतालीं असलेला अल्प प्रकाश वाढवीत आहेत. सदरहू प्रकाश किरणें मातेच्या प्रित्यतिरक्तते पासून आणि आपल्या अर्भकाकडील सप्रेम दृष्टीपासून उद्भवतात. विश्वांतील बाह्य कारणांचा वनस्पती वर्गावर जसा परिणाम घडतो तसा मातेचा परिणाम अर्भकावर घडतो. बालवेळाला जसें आकाशांतून मंदमंद पडणारें दहिंवर, प्रसन्न करणारी जलवृष्टी, दर्शनीं प्रतिकूल व कठोर असा वायु आणि प्राणिमात्रांना आनंददायक असलेला सूर्यप्रकाश, होत. तसेंच अर्भकाला मातेच प्रकृति मधुर हास्य, उत्तेजक शब्द, सप्रेम लालन, साम्य उपालंभन आणि भयदर्शन होत. थोडासा विचार करितां आपल्याला आढळून येईल कीं ज्या बुद्धीनें लाखो माणसांवर आपलें स्वामित्व गाजवून त्यांस आश्चर्यचकित करून सोडलें व जी कल्पनाशक्ति आजपर्यंत अद्वितीयच राहिली ती एकदां अशाच विमुक्तल्या आणि परावलंबी हृदयावर आविष्टत झाली होती! उलट पक्षा आपल्याला दुसरी अशीही कल्पना करितां येईल व ती वरील कल्पनेपेक्षां कोणत्याही रीतीनें कमी सत्य नाहीं. मानवी स्वभावांत जें अत्यंत दुष्टत्व वास करीत आहे असा दुष्टतेचा पुतळा, जो सर्व दोषांचें अधिष्ठान, जो मूर्तिमंत दुर्दैव आणि ज्याला सर्व लोकांनीं सोडलें आहे असा पापपुरुष एकदां त्याच प्रमाणें आपल्या मातेच्या अंकावर बालदशेंत वाढला आणि त्या वेळीं त्याचें अंतःकरण एखाद्या साधु पुरुषा प्रमाणें अत्यंत निर्मळ होतें.

पु० बा०

वऱ्हाडसमाचार

मिती पौष शुद्ध ४ शके १८१६

म्यांचेस्टरच्या कापडवाल्यांनीं व गिरणीवाल्यांनीं विलायतेस सभांची व तद्द्वारा अर्जांची गर्दी उडवून दिली आहे. त्यांच्या तळमळीचा भावार्थ इतकाच कीं विलायतच्या कापडावर हिंदुस्थान सरकारानें जकात बसवूं नये. अप्रतिबंध व्यापाराच्या तत्वाला या जकातीनें मोठा धक्का बसतो आणि विलायतचा कापडाचा व्यापार याजमुळें विलयास जाईल असा मोठा धोका दिसतो. त्यांचा असा आग्रह आहे कीं हिंदुस्थानच्या खजिन्याची तूट भरून काढण्यासाठीं इंग्लंडच्या खजिन्यांतून एक ठोकळ रकम पोंचविली तथापि हरकत नाहीं पण म्यांचेस्टरचा माल जकातीच्या कचाट्यांतून निघाला पाहिजे. आपल्या स्वार्थासाठीं सगळ्या देशाच्या खजिन्याला टांच लागली तरी हरकत नाहीं असें ह्मणणारे आपमतलबी म्यांचेस्टरवाले इंडियाचें हिताहित कितपत लक्ष्यांत घेतील हें स्पष्टच दिसत आहे.

नामदार स्टेट सेक्रेटरी यांच्या सल्ल्यानेंच जकातीचा कायदा कायदे कौन्सिलाच्या यंत्रांतून बाहेर पडला आहे तेव्हां म्यांचेस्टरवाल्याचा तूर्त वरील पैगम चालणार नाहीं हें उघड आहे. परंतु या जकातीच्या बाबतींनें इंडियांत तयार होणाऱ्या वीस नंबरावरील कापडावर निराळा कर बसविण्यांत आला हें देशी व्यापारवृद्धीस मोठें विघ्न प्राप्त झालें आहे. देशी वीस नंबरी सुतावर जी जकात बसविली आहे ती बसवितेवेळीं नामदार फजुलभाई विश्राम यांनीं वीस नंबराच्या ठिकाणीं चोवीस नंबर करावा अशी सूचना केली होती पण ती फुकट गेली. नामदार फेरोजशहा मेथा, इव्हान्स, प्लेफेअर, चिटणीस इत्यादि सभासदांनीं स्वमतनिर्देश करिते वेळीं व्हाईसरायच्या आफिशिअल एक्झीक्युटिव्ह कौंसिलदारांनीं आपलें मत स्टेट सेक्रेटरीच्या ह्मणण्यासाठीं गुप्त ठेऊं नये असा निक्षुन उपदेश केला. या वादविवादाच्या प्रसंगीं कायदे कौन्सिलांत लोकमताचे प्रकाशक असे लोकनियुक्त सभासद सरकारी सभासदांपेक्षां कमी असतां कामा नये असें पक्कें कळून आलें. सरकारी कौंसिलदारांचें बहुमत एकदेशीय असल्या कारणानें इतर कौन्सिलदारांच्या मताला वजन नाहीं व स्टेट सेक्रेटरीच्या आज्ञा व अभिप्राय हेच खरे अंतस्थ कायदे असतात. सर मिल्लर तर असें ह्मणाले कीं विलायतच्या कापडावर जकात बसवूं दिली तेव्हां ती गोष्ट स्टेट सेक्रेटरी यांनीं इंडियांतील २० नंबरावरील सुताच्या कपड्यावर जकात बसविण्याच्या अटीवरच कबूल केली होती. त्या अर्थी २० नंबरच्या स्थळीं २४ नंबरा विषयींची उपसूचना पसार केल्यानें जवळ जवळ बेमानीचे नाहीं तथापि करार मोडल्या सारखें वर्तन होत आहे. यावर नामदार मेथा यांनीं जबाब दिला कीं स्टेट सेक्रेटरीनीं पाहिजे तर जकातीचा कायदा व ही उपसूचना हीं दोन्ही एकदम नामंजूर करावींत व आपली जबाबदारी संभाळावी. स्वकीय मताच्या प्रकाशनाचा बेमानी सारखा दोष लावावयाचा असेल तर कायदे कौंसिलांत मतें नमूद करण्याचा फार्स व लोकमत विटंबना तरी कशास पाहिजे! जी गोष्ट सेक्रेटरीला प्रत्यक्ष करितां येत नाहीं ती या कौंसिलांतील होयबा होय ह्मणणाऱ्या सरकारी कौंसिलदाराच्या मुखानें करितां येते असें निदर्शनास आलें आहे. व्हाइसराय लार्ड एल्जिन हे अध्यक्ष या नात्यानें असेंही ह्मणाले कीं पार्लमेंटकडे मुख्य राज्याधिकार आहे व पार्लमेंटाच्या मताची कुलूपकिल्ली स्टेट सेक्रेटरीच्या हातांत आहे तेव्हां स्टेट सेक्रेटरी यांची आज्ञा अप्रत्यक्ष मोडण्याचा अधिकार कायदे कौंसिलदारांस पोंचत असला तथापि तो अधिकार बजावतां येणार नाहीं. सारांश हाच कीं स्टेट सेक्रेटरीच्या ह्मणण्या विरुद्ध उपसूचना आली आहे ती सरकारी कौंसिलदारांनीं बहुमतानें रद्द करणें आवश्यक आहे असें सांगण्यांत आलें.

---

लार्ड हारीस हे लोकांच्या आदरास कितपत पात्र आहेत या नाजूक प्रश्नाचा विचार मुंबई इलाख्यांतील लोकांच्या मनांत घोळत आहे. त्यांचे मित्र व स्तुतिपाठक भाट दास त्यांच्या संस्मरणार्थ त्यांचा पुतळा उभारावा असें वाटतें. कारण कीं लार्ड हारिस हे आनंदी, रंगेल, व शिवाय चांगले खेळाडू आहेत, हे जवळच्या माणसांवर पुष्कळ लोभ करितात, स्वभावानें अगदीं सरळ व भक्कम पुरुष असून आपल्या मंत्रिमंडळाचा सल्ला चांगला गिरवितात, शारीरिक शिक्षणाला यांची मदत दांडगी मिळाली आणि साधारण पणें हे चांगले हुद्देदार होऊन गेले. उलटपक्षीं लोकमत असें सांगतें कीं लार्ड हारिस यांच्या पंच संवत्सरांत सार्वजनिक कल्याणाची एकही गोष्ट घडली नाहीं, स्वभावानें शांत, विचारशील, व निष्पक्षपाती असे नसल्यामुळें त्यांचा लोकांवर विश्वास नाहीं, नेटिवांच्या हिताचा फिकीर न करितां युरापियन लोकांची पुष्कळ काळजी वाहिली, दंग्याच्या वेळीं हे हिंदू लोकांवर न भुतो न भविष्यति अशा नानाविध अपशब्दांनीं तुटून पडले, आणि प्रजाजनांमध्यें फाटाफूट व दुही यांनी पुष्कळ माजविली. अशा भाट साहेबांचा पुतळा जे बनवितील ते बनवोत!

लार्ड हारिस गव्हरनर या नात्यानें मुंबई युनिव्हरासटीचे चान्सेलर आहेत. त्यांच्या प्रयाणाच्या नंतर वार्षिक पदवीदानाची तारीख येते. ती लार्ड हारिस यांच्या अखेरच्या सन्मानार्थ एक आठवडा पूर्वीं ह्मणजे फेब्रुवारी तारखेला पदवीदानाचा समारंभ करण्याचा विचार चालूं आहे. चान्सेलरच्या स्थानाचा बहुमान लार्ड हारिस यांच्या उपभोगांत आहे तेव्हां ते तशी आपली इच्छा प्रगट करी पर्यंत पदवीदानाचा समारंभ एक आठवडाभर कां मागें घ्यावी. हें कळत नाहीं.

---

व्यवहारांत मनुष्यास स्वतांची बरी वाईट वर्तणूक नानाविध प्रकारांनीं साधक बाधक होत असते, आणि मुख्यत्वें करून दुष्कर्म कोणत्या वेळीं कसें दत्त म्हणून आडवें येईल याचा नेम नसतो. राष्ट्रीय सभेच्या मंडपांत मि. अर्डले नार्टन यांच्या संबंधानें मोठा अपवाद निघाला कीं व्याभिचारी गृहस्थास राष्ट्रीय सभेच्या कामांत निदान वक्त्याच्या नात्यानें पुढारीपण घेऊं देऊं नये. मि. नार्टन हे सार्वजनिक कार्यांत अग्रणी असतात आणि राष्ट्रीय सभेला यांचा फायदा बहुत झाला आहे. त्यांचें खानगी वर्तन वाईट होतें आणि त्या बद्दल त्यांस प्रायश्चित्तही मनमुराद मिळालें आहे. आतां हें खरें कीं वाईट मनुष्य लोकांच्या सत्कारास पात्र नसतो परंतु आंगचे दुर्गुण इतर सद्गुणांनीं लोपण्यांत आले व त्यांच्या पुनरावृत्तीची भिती बिल्कुल उरली नाहीं तर क्रमाक्रमानें लोकांनीं पूर्व वृत्तान्ताला विसरून नव्या सुधरलेल्या वर्तनावर भिस्त कां न ठेवावी हें आम्हास समजत नाहीं. मि. नार्टन यांच्या विषयीं अपवाद निघाल्या बरोबर सर्व सभेंत एकच गोंधळ झाला तेव्हां अध्यक्ष नामदार वेब यांनीं मोठ्या युक्तीनें, दूरदृष्टीनें, व प्रारब्ध कार्याचें महत्व पाहून मि. नार्टन यांस राष्ट्रीय सभेंत बोलूं दिलें आणि आक्षेपकांस स्वस्थ बसण्यास आज्ञा केली.

त्या आक्षेपका पैकीं एका मद्रासी गृहस्थानें मि. वेब यांस नम्रपणानें पत्रांत विचारलें कीं, मि. नार्टन सारख्या व्यभिचारी व दुर्व्यसनी मनुष्याच्या खानगी वर्तना विषयीं राष्ट्रीय सभेंत विचार हाणें कितपत योग्य व शिष्टाचाराला अनुसरून आहे. मि. वेब यांनीं इटाली मुक्कामाहून जबाब दिला आहे तो फार पोक्त विचाराचा असून सदा सर्वदा व्यवहारांत ध्यानांत धरण्या सारखा आहे.

दुर्गुणी मनुष्य आपल्या किंमतीनेंच नेहमी विकला जातो. ह्मणून प्रत्येक कार्यांत दुर्गुण आडवे आणून त्या मनुष्याला हरकती आणण्याचा प्रयत्न केला तर तो निर्फल होय. लोकांचा बरावाईटपणा कांहीं धोरणानें मर्यादित केला पाहिजे. पार्लमेंटचे सभासद पार्नेल हे व्यभिचारी ठरले ह्मणून त्यांस पार्लमेंटांत वादविवाद करण्याची मनाई नव्हती. लोकांनीं आपला पुढारीपणा नार्टन सारख्या मनुष्या कडे पाहिजे तर देऊं नये. पण प्रस्तुत कार्याचें महत्व व महत्प्रयासानें भरलेली राष्ट्रपरिषद् या उभय गोष्टाशी खानगी अपवादांचा अर्थी अर्थीं संबंध नाहीं हें लक्षांत घेतल्या नंतर वस्तुवस्तूचा तारतम्य भावानें व सापेक्ष संबंधानें विचार केला पाहिजे हें लक्ष्यांत येईल. वाईट मनुष्याचें अनुकरण करूं नये किंवा त्याला आपल्यावर नियामक अधिकार देऊं नये परंतु जर कोणी वाईट मनुष्य सत्कार्यांत आपल्या समागमें थोडी बहुत चांगली मदत करित आहे तर निःसंशय आपण त्याचा फायदा घेऊन सत्कार्य सिद्धीस न्यावें आणि चांगल्या कार्यामध्यें वाईट म्हणून नाणवलेल्या मनुष्याचें मनोरंजन व कालक्रमणा होऊं लागली ह्मणजे त्याच मनुष्याच्या अंगीं सुसंस्कारांनीं देवपण येईल. कोणताच मनुष्य सर्वथैव ग्राह्य किंवा त्याज्य नसतो इतकें नाहीं तर दुर्गुणी मनुष्य देखील दुर्गुणांला सद्गुणा खालीं लपवूं पाहतो आणि सद्गुणी लोकांत गणना होण्यासाठीं झटत असतो त्या अर्थीं प्रत्येकाचें कर्तव्य आहे कीं दुसऱ्याचे चांगले गुण दुर्गुणाच्या संगतीनें मातीमोल होऊं न देतां त्यांचें प्रोत्साहनच करीत गेलें पाहिजे. अशी निवडानिवड व्यवहारांत तड जोडीच्या मार्गानें करण्यास प्रत्येकानें शिकलें पाहिजे.

---

आह्मांस लिहिण्यास आनंद वाटतो कीं वऱ्हाड सार्वजनिक सभा थोड्या वर्षांची असून सरकारांत तिच्या अभिप्रायाला चांगलें वजन आहे. अलिशान रेसिडेंट हे हल्लीं उमरावतीस आले आहेत म्हणून सार्वजनिक सभे मार्फत कांहीं मंडळी कांहीं महत्वाचे विषय

त्यांच्या नजरे समोर आणून लोकमत त्यांना कळविण्याच्या विचारांत आहेत. गेल्या दिवाळीच्या सुमारास आकोल्यास जी जंगी जाहिरसभा भरली होती तिची हकीकत साहेब बहादूरास कळवुन नंतर जमिनीचा धारा न वाढविण्या संबंधानें सकारण व सप्रमाण विनंती करणार आहेत त्याच वेळीं वऱ्हाडांत नवीन वयाच्या सरक्युलरा मुळें हायस्कूलांतील शिक्षणाचा लाभ पुष्कळांस मिळणार नाहीं तेव्हां तें सरक्युलर रद्द करण्या विषयीं अलिशान बहादुरांस विनंतीनें कळविणार आहेत. तसेंच एल. एल. बी झालेले वऱ्हाडचे विद्यार्थ्यांस या प्रांतांत वकिली करण्यास परवानगी देतां येईल अशी हल्लीच्या कायद्यांत सुधारणा करण्या विषयीं प्रश्न मि० प्लौडन यांच्या पुढें ठेवण्यांत येणार आहे. आम्ही उमेद बाळगतो कीं वरील तिन्ही प्रकरणांचा योग्य विचार होऊन लोकमतास चांगला मान देण्यांत येईल.

## The Berar Samachar

**MONDAY JANUARY, 14, 1895**

We are happy to return with renewed strengh and vigor to a topic which has been handled in all its bearings and aspects not only by us but by our brother journalists with no less energy and earnestness than those of ourselves. The topic is of the utmost importance to the public and will, if allowed to remain in its present situation, be an irreparable grievance. Berar has figured well this year in all the University examinations, including the last one of the law curriculum. It has therefore well founded claims to be numbered along those provinces and presidencies which pride themselves upon holding a foremost place in point of education. No body requires to be convinced and least the Government, that it is the spread of education alone that gives a tone to the morals and prosperity of the country, conduces to the welfare and improves the social and political ideas of the public.

British Government wherever it has made its pace and in whatever form has always professed itself to be the most ardent and sympathetic friends of the cause of education and has pledged its word more than once not to deviate from a policy chalked out and initiated about half a century ago. It behoves the Government ill to give a blow and in our opinion the most fatal one to the primary and higher education in a province which is to all intents and purposes classed among the *non—regulated* and backword ones. The circular which prevents boys above a certain age from being admitted in the High Schools, is notorious for its impropriety and inexpediency. It has had its force and to the detriment of many a promising young student.

In the matter of higher education the Government have not been more generous. In framing and issuing the regulations in regard to the vakils and attorneys of the Chartered High Courts, debarring them from being permanent practitioners in the province unless they produce a certificate of their having practised in the said courts, we believe, the Government of India was misled or misinformed and thus overlooked the interests of those who if they had been properly advised would have been fit objects of being excepted from the prohibition. We had expected our able, energetic and learned Resident Mr. Plowden to be the first person to recommend the ommission or at least the variation, in favour of bona fide Berarees, of the clause in question. But it is always the unexpected that happens. It is not even now too late to rectify the error, for as yet few have suffered from the restriction. This year there have not been less than five candidates who have come out successful through the examination ordeal and would it not be a gross injustice and a real hardship to force them to leave their homes and seek practice in places for which they have little sympathy or regard! Is it not a cruel punishment for no offence but their having sought after distinction and honors which are higher in themselves and command no light esteem elsewhere. If competency and merit are to be measured and judged from the examination one passes through and this is the only standard in these days to go by, we cannot persuade ourselves to regard the University law examination as less easy or testing than the one held in the province every year. We are disposed to think it more trying in so far as the candidates are required to study the old law and general principles of Jurisprudence in addition to the acts and commentaries prescribed for the local test and some more.

We commend the anxiety of the Government (if that be the sole cause in framing the regulations in hand) to keep away outsiders and save the bona fide Berarees from being harrassed by competition; but their solicitude in this respect has over—reached the mark and has unwittingly covered a larger ground than that in the intention of the legislature. The effect of the rule is obvious upon students who have matriculated from Berar High Schools, pursued the college course and qualified themselves as High Court Pleaders, and in some cases with the expense of the Government that is by being maintained out of scholarships specially provided. These persons find at the end of their University curriculum that the degrees which they have been so much at pains to secure and which they were encouraged by the Government itself to obtain are mere letters added to their names, with no credit and weight with the Government. The inconsistency is glaring enough and needs no further exposure. The regulation as it stands is due to oversight; the interests of bona fide Berarees are not at all consulted or helped. Besides the Government will by their own policy be losing the fruits of the education which they have been imparting by running into heavy expenditure. We, therefore propose a change by way of exception in the rule in favour of bona fide Beraree candidates who having matriculated from Berar High Schools have qualified themselves as High Court Vakils, attorneys or advocates. We conclude with a fervent hope that the Local Government and the Government of India will soon give due cousideration to the question and by doing an act of nothing but pure justice, will earn the gratitude of the concerned and thanks from the welwishers of the province.

## वऱ्हाड.

उमरावतीस जो स्त्रियांसाठीं भव्य दवाखाना बांधला आहे त्याचा प्रवेशसमारंभ मोठ्या थाटमाटानें उद्यां सायंकाळीं आलिशान रेसिडेन्ट मि. प्लौडन यांच्या अध्यक्षतें खालीं होणार आहे. युरोपियन व नेटीव स्त्रीपुरुषांस निमत्रण चिठ्या गेल्या आहेत.

आमचे डेपुटी कमिशनर हेअर साहेब हे दवऱ्यांतून परत येथें आले आणि त्यांचा पुढील मुक्काम सात आठ दिवस उमरावतीस होणार आहे.

मे. बुलक जुडिशिअल कमिशनर यांची स्वारी अकोल्याहून वाशिमास तपासणी साठीं गेली होती. तेथून परत आल्या नंतर येथील कचेऱ्यांची तपासणी करून साहेब गेल्या गुरुवारीं उमरावतीस रवाना झाले.

नागपूरकर मि. अबदुल कादर यांनीं आपल्या घोड्याच्या सरकसचे दोन खेळ येथें केले. खेळाचा भपका नव्हता तथापि कांहीं काळानें सरकस चांगलें तयार होईल अशी आशा आहे.

राव साहेब देवराव विनायक यांच्या फ्याक्टरींत गेल्या १० तारखेस रा. रा. लक्ष्मण कृष्ण चिपळूनकर बी. ए. यांच्या हातून धंदेशिक्षणाचा वर्ग सुरू करण्यांत आला. रावसाहेब सार्वजनिक कार्यांत नेहमी पुढारी असतात आणि लोकशिक्षणासाठीं त्यांनीं एवढा महत्प्रयत्न केला हें त्यांच्या लौकिकाला अनुरूपच आहे. ईश्वर त्यांस यश देवो!

अलिशान रेसिडेंट मि. प्लौडन हे काल प्रातःकाळीं उमरावतीस आले. बहुतेक मुख्य मुख्य अधिकारी मंडळी तेथें जमली आहे.

कर्नल स्पानस्की यांनीं कमिशनरच्या कामाचा चार्ज दिल्या नंतर एक महिना बारा दिवसांचा रजा घेतली.

रा. रा. त्रिंबक गणेश परांजपे एक्स्ट्रा आसि० कमिशनर यांच्या कोर्टाला स्माल कॉज कोर्टाचे १०० रुपया पर्यंत दावे चालविण्याचा अधिकार मिळाला.

## जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं कमेटीनें पुडेट खत तयार केलें आहे. ज्या लोकांस बगीच्यांत घालण्या करितां पाहिजे असेल त्यांनीं कमेटींत अर्ज करून घ्यावें. प्रत्येक गाडीस आठ आणें किंमत द्यावी लागेल. यापेक्षा कमी घतली जाणार नाहीं. सद्रहु खताचा उपयोग जे करतील त्यांस चांगल फायदा होणार आहे. कळावें तारीख ९ १८९५ इ०

Md. Husain
Secretary
Municipal Committee
Akola

### NOTICE

It is hereby published for the information of the public of Akola that the lists of voters prepared by the Secretary for the year 1895 96 under rule 6 of the Municipal election rules are posted as required by rule 7 at the following places.

The persons entitled to vote under rule 3 are requested to see their names included in the lists posted and make complaints it there are under rule 8 and also to choose Ward in which they wish to vote in case they are entitled to vote in two wards under section 5 before the 23rd. of January 1895.

Names of places where lists are posted.

1 The Deputy Commissioner's office
2 Small Cause Court
3 Tahsili
4 Chawaries
5 Police Station
6 Cotton Market
7 Weekly Market
8 Near the Morna Bridge
9 Town Hall

Dated Akola 8th. January 1895 — D. G. Patvardhan, Secretary, M. C. Akola

### नोटीस.

नोटीस बेशर्मा विश्वंभर नोळकंठ, (२) नारायण कृष्ण मुनशी, (३) गंगाधर विष्णु, (४) त्र्यंबक विश्वंभर सर्व राहाणार दर्यापुर यांस.

खाली सही करणार याज कडून नोटीस देण्यांत येते कीं. तुम्हास त्रिंबक गणपतराव अ० पा० मा० सारजाबाई व चंद्रभागा बाई देशपांडे दर्यापुर या दोघींचे सहीनें तुम्हास कुलमुखत्यारपत्र दिले होतें परंतु त्रिंबक गणपतराव अ० पा० मा० चंद्रभागा बाई जवजे गणपतराव देशपांडे ईणें तुमचे चार इसमाचे कुलमुखत्यार पत्र तारीख १।१।९५ इसवी पासुन रद्द केले आहे तर तुम्ही तिचे नांवानें साहु सावकार व कोर्टांत सही करू नये. जर केल्यास त्याची जबाबदारी तुमचेवर आहे. या पैकीं विश्वंभर निळकंट यांच्या कडे असलेल्या जमाखर्चाचा हतला आम्हास मिळणे आहे तर कबूल केल्या प्रमाणे तारीख ३०।१।९५ रोजीं हिशोब देईपर्यंत फक्त त्या तारीख पर्यंतचे जरुरियात काम मात्र त्यांनीं करावें जाका निराळें काम करण्याची या लेखानें मनाई केली आहे.

दर्यापुर येथील साहु लोकाचे नांव.

१ बालकीसन मोहनशींग २ पुरुषोत्तम सखाराम ३ रामकृष्ण सखाराम येणे प्रमाणे साहू लोकास कळावे कीं सदर्हु वर लिहिले इसम हे चंद्रभागा बाई ईचे नांवानें पैसा वगैरे मागतील तर तुम्ही तिचे सहीशिवाय देऊं नये दिल्यास त्याची जबाबदारी तुमचेवर आहे.

सदाशीव लक्ष्मण देशपांडे यांस कळावें कीं तुम्हास कुळकर्णीपणाचें मुखत्यारपत्र आहे तर तुम्ही चंद्रभागा बाई ईचे सांगणे शिवाय तहशीलीचा पैसा वसूल करू नये. केल्यास त्याची जबाबदारी तुमचे वर आहे— कारण कीं वर लिहीले इसमाचे मुख्त्यार पत्र चंद्रभागाबाई ईणें रद्द केलें आहे— कळावें तारिख १२।१।९५ इ.

(सही)

त्रींबक गणपतराव अ० पा० मा०
चंद्रभागा बाई जवजे गणपतराव
देशपांडे. दर्यापुर तालुके मु०
बामन खंडेराव राहणार
आकोला दस्तुर खुद.

### नोटीस.

ह्या नोटिसीनें आकोले एथिल सर्व लोकांस कळविण्यात येतें कीं म्युनिसिपल सेक्रेटरीनीं निवडणुकीचे ६ नियमा प्रमाणें मत देणाऱ्या लोकांची यादी सन १८९५–९६ साला करितां तयार करवून नियम ७ प्रमाणें खाली लिहिलेल्या ठिकाणीं त्याच्या नकला लाविल्या आहेत. नियम ३ प्रमाणें ज्यांना मत देण्याचा अधिकार आहे अशा लोकांना विनंती करण्यांत येते कीं त्यांनीं आपलीं नांवें सदर्हू याद्यांत दाखल केलीं आहेत किंवा नाहींत हें पहावें आणि नियम ८ प्रमाणें त्यांची एखादी तक्रार असल्यास ती व ज्याना दोन वार्डांत मत देण्याचा अधिकार असेल त्यांना आपण कोणत्या वार्डांत मत देणार हें तारीख २३ माहे ज्यानेवारी सन १८९५ चे आंत कळवावें कळावें ता० ८–१–९५ इ.

१ मे. दिपुटी कमिशनर साहेब यांचे कचेरींत
२ स्माल काज कोर्ट
३ तहसील कचेरी
४ कॉटन मार्केट
५ धान्य आठवडे बाजार
६ चावड्या
७ पोलीस स्टेशन
८ लोखंडी पूल
९ टाऊन हॉल

D. G. Patvardhan,
सक्रटरी.
म्युनिसिपल कमिटी
आकोला.

## वर्तमानसार.

चीन व जपानची लढाई. या आठवड्यांत मंदावली आहे. चीनचें तहाचें बोलणें जपान थोडें थोडें कबूल करूं लागला असावा असें दिसतें.

पामीरकडे रशियाच्या चळवळीचें कारण दुसरें कांहीं नसून, फक्त अफगाणास गडबड करूं देऊं नये हेंच होतें असें तुर्कस्थान ग्याझेट ह्मणतें.

कुर्डुवाडीपासून बार्शीपर्यंत वाफेची ट्राम्वे करण्याचें रहीत होऊन लहान आकाराची रेल्वेच करण्याचें ठरलें आहे. ही चालूं वर्षी अखेर तयार होईल.

तरच मैत्री होईल.—'नोवोएवरमया' नांवाचें रशियांतील एक नामांकित पत्र ह्मणतें कीं, "एशिया व टर्कीच्या मधील गाली-पोली बंदर रशियास मिळवून देण्याची इंग्लंडनें मदत करावी, व मीराच्या जवळील लोमतोस अथवा मायदोलीनो बंदर रशियास द्यावें; ह्मणजे हिंदुस्थानच्या सुरक्षितपणा बद्दल रशिया संतोषकारक खात्री देईल." आतां शीं थोडें बाहेर आलेलें दिसतें.

ख्रिस्ती धर्मांत गेलेल्या हिंदुचा, स्वतः-च्या मुलावर अधिकार पोंचत नाहीं असा म्हैसूर कोर्टानें निवाडा दिला.

यंदाचें कान्होकेशन फब्रुआरीच्या तिसऱ्या मंगळवारीं भरविण्याचें घाटत आहे.

पंजाब सरकारनें असा हुकूम काढला आहे कीं, मुन्सिपालिटीच्या निवडीच्यावेळीं हिंदूंनीं हिंदु उमेदवारांस व मुसलमानांनीं मुसलमान उमेदवारांसच मतें द्यावीं एक पक्षीं हेंही बरें.

लार्ड सभेविरुद्ध चाललेल्या इंग्लंडांतील चळवळीस मोठें स्वरूप येत चाललें आहे.

एका शहरांत चाळीस लाख माणसें नुसतीं लढाईंत मरतात असा अंदाज निघाला आहे.

आयुष्य रक्षणाचा मोठा भार शरीरावयवांच्या मजबूतपणावर अवलंबून आहे. ह्मणून तीक्ष्ण दारू व तशींच दुसरीं व्यसनें सोडलीं पाहिजेत, तरच आयुष्यरक्षण होईल असें ब्रिटिश मेडिकल जर्नलमध्यें मोठ्या वादविवादानीं सिद्ध झालें आहे.

एकट्या स्वतंत्र केशावर दीडशें ग्रेन इतकें वजन तोललें जातें.

तोंडावर येणाऱ्या फुटकुळ्यास कोणी मुरमाच्या फुटकुळ्या ह्मणतात. ज्या मनुष्यास मलमूत्र साफ होत असून, पचन शक्तीही चांगली असते त्यास अशा फुटकुळ्या होत नाहींत असें एक शोधक ह्मणतो.

पुरुषापेक्षां स्त्रियांची दृष्टि जास्त चांगली असते असें ह्मणतात.

कोरियाच्या राजकुटुंबांत जर कोणी मनुष्य मृत्यु पावलें तर तीन वर्षेपर्यंत तेथील सर्व लोकास पांढऱ्या टोप्या घालाव्या लागतात.

फार मेहनत करून अशक्त झालेल्या घोड्यास, भाजलेली दळलेली काफी व मध एकत्र करून खाण्यास दिली तर पुन्हा त्यास शक्ति येते असा जर्मनींत अनुभव घेण्यांत आला आहे. स. वि.

असे युरोपियन थोडे—सिलहट्ट प्रांतांत मि. ली ह्मणून युरोपियन सिव्हिल सर्व्हंट आहेत. त्यांला "कांपनसेशन अलावन्स" ची सिरापत इतर युरोपियन अम्मलदारा प्रमाणें सरकार देत असतां त्यांणीं तें घेतलें नाहीं. ह्याचें कारण दुसरें कांहीं नसून हें अलावन्स आपण घेणें ह्मणजे हिंदुस्थानांतील गरीब कर भरणाऱ्या लोकांच्या पैशाची लुट आहे, अशी त्यांची समजूत असून ती त्यांचे मनास खात असल्यामुळेंच उदार सरकार देत असलेले जास्त पैसे त्यांणीं घेतले नाहीं!! परदुःखेन दुखिता विरला" ह्या ह्मणीं प्रमाणें जों विरळ माणसें आहेत. त्यां पैकींच मि. ली हे सीव्हिलियन आहेत. वी.. वं.

गायकवाडच्या नवसरीच्या भटींत तयार होणारी २९ अंडर प्रुफची दारू इंग्रजी हद्दींतून गायकवाडी हद्दींत जाईल त्यास गायकवाडी कामदारांचा पास असला ह्मणजे त्यावर जकात घेऊं असें सरकारानें, ठरविलें आहे.

ता० २९ इंग्रजी फौजेच्या टोळ्या आतां परत छावणींत येत आहेत. दंगखोर वजिरी लोकांच्या मालकीचीं पुष्कळ गुरें, बकरी व मेंढरें धरून आणलीं आहेत. त्यांच्या पुष्कळ गढ्या तोफा लावून उडवून देण्यांत आल्या.

महसुद वजिरी लोक गडबड करण्यास असमर्थ होत पर्यंत सर लोकटची फौज त्यांच्या देशांत राहणार.

वजिरी लोकांस तोडलेली तार दुरुस्त करण्यांत आली व बातमी जाण्या येण्याची सुरुवात झाली.

आमच्या स्वारीमुळें वजिरी लोक जिकडे तिकडे पळत आहेत.

मोठी लढाई होऊन जपानानें हेचिंग हें ठिकाण घेतलें. ही लढाई फार मोठी झाली यांत चीनचे ३००लोक जाया झाले व जपानचे मेले व जखमी मिळून ४१२ झाले.

मोकडनवर चाल करून जाण्याची जपानची तयारी थंड पडली आहे.

चीनच्या बादशहानें आपल्या सर्व फौजेच्या कमांडरच्या जागीं नांकिनचा गव्हर्नर प्रिन्स लिकान्यी यास नेमलें आहे.

इंग्लंड व जपान या सरकारांच्या दरम्यान पुरवणी तह करण्यास आणखी सहा महिन्यांची मुदत वाढविण्यांत आली.

बालाकोट येथें कुन्हार नदीवर ३१,००० रुपये खर्च करून पूल बांधण्याचें ठरलें.

पुण्याचें नार्मल स्कूल येत्या एप्रिलपासून बंद करण्याचा सरकारानें ठराव केला.

चित्रळ येथील इंग्रजी फौज परत आणण्याचा विचार चालूं होता, पण तसें करण्यास स्टेट सेक्रटरीनें मंजुरी दिली नाहीं व लार्ड एलजिन यांचें मतही तसें करण्यास विरुद्धच होतें असें विलायतचा एक पत्रकर्ता सांगतो.

सिसिली बेटांत नुकतांच जो एक धरणीकंप झाला त्याच्या योगानें तेथील मोठा टी परतंम कोसळून पडला.

रशियाचा नवा बादशहा या वर्षीं आपल्या राज्यांत फिरावयास निघणार आहे. अ० द०

राणी सरकारच्या तैनातीस एकंदर एक हजार नोकर चाकर माणसें आहेत.

दुग्ध प्राशनानें अजीर्ण झाल्यास मट्ठा व लसूण खाल्यानें तो विकार नाहींसा होतो.

जपानांत एक वृक्ष आहे त्या वृक्षाचें शाखांतून सूर्यास्त झाल्या नंतर धूर निघत असतो.

दक्षिण अमेरिकेंत विजेच्या यंत्रानें गहूं सुकविण्याची युक्ति निघाली आहे. अमेरिकन काय काय करणार न कळे!!

एका शोधक शास्त्राचें असें मत आहे कीं आणखी शंभर वर्षांनीं जगांतून सिंहांचें अगदीं निर्बीज होईल.

कालपुळकीच्या आजारावर प्रारंभीं चहापत्रीचें सेवन सर्वोत्कृष्ठ गुणावह आहे असें ल्यान्सेट नामक वैद्यक पत्रांत एकानें प्रसिद्ध केलें आहे

जान बर्क नांवाचा एक बडा मल्ल विद्यापटू ऐरिश पहिलवान लौकरच हिंदुस्थानांत येणार आहे.

जर्मनी देशाच्या एका विद्वान गणित्याचें असें मत आहे कीं आणखी ३००० वर्षांनी प्रत्येक २२० स्त्रियांचे मागें एक पुरुष याजप्रमाणें जगांतील स्त्री पुरुष प्रमाण बसेल. शु. मु.

वांईच्या प्रकरणांतील हकीकतीचा गुप्त रिपोर्ट सातारचें कलेक्टरांनीं केला आहे; त्यांत पोलिसच्या गैरशिस्त कृतीमुळें सर्व प्रकार विकोपास गेला, असें लिहिलें असल्याची भुमका निघाली आहे.

युरोपियन सतीचा प्रकार— एका फ्रेंच गृहस्थाची बायको नवऱ्याच्या झिंगेपणास त्रासली ह्मणून तिणें एक चिता रचून प्रज्वलित केली, व तींत उडी घालून नुकतांच देहत्याग केला, असें प्रसिद्ध झालें आहे.

पोष्टाचे क्लार्क रंगारी बनले!—लखोट्यांच्या पेट्यांवर लावावयाच्या वेळापत्रकाच्या फळ्या रंगविण्यास पोष्टखात्यास फार खर्च येतो; सबब तें काम पोष्टांतील क्लार्कांनींच करावें, असा चमत्कारिक हुकूम पंजाबचे पोष्ट मास्तर जनरलांनीं केला आहे!

पोलिसावर चोरीचा खटला—कुंभकोणम (मद्रास) येथील म्युनिसिपालिटीनें रस्त्याच्या बाजूचीं कांहीं झाडें तोडून लिलांवासाठीं रचून ठेविलीं होतीं; त्यापैकीं लांकडें पोलिस लोकांनीं चोरून नेलीं त्याच्या घरात सांपडलीं; ह्मणून त्यांजवर म्यु. चे चेअरमेनांनीं खटला केला ह्या खटल्यांत पोलिसाची अब्रू जाऊन तोंडास काळें लागणारें असल्यामुळें तेथील सर्व पोलीस फिर्यादी विरुद्ध हरईस पडले; व पोलिसा विरुद्ध साक्ष देणाऱ्या लोकांवर व फिर्यादीच्या वकिलावर त्यांणीं खूब गहजब उडविला! ह्या खटल्याचे निकालाकडे सर्व लोकांची दृष्टि लागून राहिली आहे असें कळतें.

ध्रांगध्रा संस्थानांत लुटारू बारवटी लोकांची धुंडाई इतकी माजत आहे कीं शहरांतील लोकांनीं रात्री ८ वाजतां दारें झांकावीं व पहांटेस ६ वाजेपर्यंत उघडूं नये असा हुकूम राजे साहेबांनीं केला आहे. व शहर रक्षणासाठीं एक लष्करी युरोपियन हपिसर नेमिला आहे,

एक आणा पट्टी— हिंदुस्थानांत आरोग्य वृद्धीचे उपाय योजणें अवश्य आहे; पण सरकारापाशीं तर पैसे नाहींत या साठीं दर माणशीं एक आणा पट्टी बसवावी, ह्मणजे साली ना सु० १ कोटी ४० लक्ष रुपये जमून त्यांतून खर्च करण्यास सांपडेल अशी एक युक्ति कलकत्ता येथें गेल्या आठवड्यांत भरलेल्या मेडिकल कांग्रेसचे अध्यक्ष डाक्टर हार्वे यांणीं सुचविल्याचें कळतें.

लक्ष कीर्तनाचा संकल्प केलेले वांईचे हरिदास गोविंद बुवा पटवर्धन हे हल्लीं इंदुरास गेले आहेत. गेल्या ४१९ वर्षांत ३९ हजार पर्यंत कीर्तनें झालीं. स. शां.


## जाहिरात,

हे पाक पौष्टीक पहा, व त्वरित गुणपण—तो मजेदार—किंमत थोडी, व फायदा ज्यास्त— हे सेवन करून अनुभव घ्या. ह्या पासून धातुवृद्धि होऊन मर्दुमी वाढते, व शक्ति स्फूर्ति व स्मरणशक्ति फार मिळेल. आणि श्रम पडून मेंदु बिघडतो तो मस्तक मेंदु तरावट होईल. हात पाय व कंबर व सर्व सांधे दुखतात तो वायु व बाळंत वायु व सर्दी हे सर्व दूर होतील. सर्व स्त्रियांस व हटकून बाळांतिणीस व तिचे रोगावर खाण्यास गुण देणार योग्य—सौभाग्यसुंट. हे सर्व आमचे दवाखान्यांत विक्रीस तयार आहेत. ज्यांना लागेल त्यानीं रोख पैसे पाठवून अगर व्हाल्युपेबल पार्सलनें मागवावें. खाण्याचे रीतीचा खर्डा या सोबत देऊं. दर खालीं लिहिले प्रमाणें.

त्वरा करा! घाईस या!! गेला दिवाळा येणार नाहीं!!! वाचा पहा— साळमिश्री पाक दर १ शेरास किंमत रु० ३; बदाम पाक दर शेरास २०८; गोखरू पाक शेरास रु० ९ पांच; कंहळे पाक शेरास रु० ४; सौभाग्य सुंट उत्तम शेरास रु० २. प्रत दुसरी—साळमिश्री व बदाम पाक दर शेरास रुपये २.

पत्ता व सही.

शिवचरणगीर रामगीर वैद्य कुरणखेडकर

दवाखाना अकोला वऱ्हाड.

## घड्याळ.

कि. रुपये ६ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ ज्युएलचे (ह्मणजे चक्रांचे खालीं वर हिरे बसविलेले आहेत) चावी देण्यास मोगरा, कांटे रासकोप प्रमाणें, आंकडे ठळक बिलोरी कांचेचे मुद्दाम युरोप मध्यें करविलेलें. या वर आमचें नांव आहे. हें खिशांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।११ वर्षे दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. ज्यास्त काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें बाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकलें नाहीं. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता—

गोविंद महादेव पोळ

वाच मेकर

नाशीक


☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साळअखेर ७ १०८
किरकोळ अंकास ........... ८

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.... ८।०६
दुसरे खेपेस ........ ८।

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Advertisement
Below 10 lines... 2 Rs
per line over 10... 4 as
Repetition per line 3 as

VOL XXIX AKOLA MONDAY 21 JANUARY 1895 NO. 3

वर्ष २९ आकोला सोमवार तारिख २१ माहे जानेवारी सन १८९५ इ० अंक ३

ESTABLISHED IN 1880.

HEALTH REGAINED AND STRENGTH MAINTAINED.

जी. बी. नाईक कंपनीच्या

जग प्रसिद्ध गुणावह.

विजेच्या आंगठ्या, पुतळया, कर्डी, लेखण्या व गळपट्टे वगैरे

प्रत्येक वस्तुवर G. B. N. मार्क पाहून घेत जा. खोटा माल वेऊन फसू नका.

११०००० वर विकल्या, रोज पुष्कळ खपत आहेत.



गुण आल्याचे हजारों दाखले मिळाले आहेत व नित्य मिळतात.

रक्त हें मनुष्याचें जीवित आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे




रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग अशक्तपणा, संधिवायु, शिरागतवायु, पोटांत वायु धरणें, फेंपरें, हातपाय गळून जाणें, स्त्रियांचे बाळंतरोग वगैरे काळजाचे दर्द, सर्व प्रकारचे ज्वर, अर्धशिशि, मस्तकशूल, मलावरोध, छातींत जळणें व दुखणें गळा सुजणें, सर्व प्रकारच्या मुळव्याधी. पाठींतील अशक्तपणा निद्रा न लागणें, मूत्राशयांतील रोग, खोकला, दमा, मनकर्ण, त्वचेचे विकार, मेह व इतर रोग, हे ह्या वस्तु वापरल्यानें बरे होतात, हें जगत्प्रसिद्ध आहे. गळपट्टा—लहान मुलांचे दंतोत्पत्तिसमयीं होणारे रोग शमन होऊन सुळे निर्विघ्नपणानें निघतात लेखणी—हातास कांपरें व स्मरणशक्ति, अशा ह्या उत्तम, गुणकारी, सर्व रोग शमविणाऱ्या, अंगावर सुशोभित दिसणाऱ्या, औषधी खटपट चुकविणाऱ्या वस्तूंच्या संग्रहावांचून राहूं नका.

सर्व इस्पितळांमध्यें विजेचा प्रयोग रोग्यांवर करितात, व ज्या मनुष्याच्या अंगांत शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यावर विजेचा प्रयोग केलेला पुष्कळांनीं पाहिला असेल. व त्या पासून रोगी बरे झाले आहेत. त्याबद्दल हजारों डाक्टर साक्ष देतील.

विजेच्या वस्तूची किंमत.

| | | |
|---|---|---|
| पितळी आंगठीस किं. रु. १॥ | पि. पुतळीस किं. रु. १। | धातूचे कड्यास किं. रु. १॥ |
| चांदीचे आंगठीस किं. रु. ३ | चां. पुतळीस किं. रु. २ | धातूचे लेखणीस किं. रु. १॥ |
| सोन्याचे आंगठीस किं. रु. २० | सो. पुतळीस किं. रु. २२ | रेशमी गळपटा किं. रु. १॥ |

केंबर पट्टा किं. रु. ६

एकदम बारा नग घेणारास एक नग जास्त मिळेल. रोख दाम आल्यास किंवा व्हीं. पी. पार्सलनें मागविल्यास पाठवून देऊं. आंगठी करितां बोटाचें माप पाठवीत असावें पत्ता असावा. अनेक रोगांवर गुण आल्याचे डाक्टर, वैद्य, पत्रकर्ते, राजेरजवाडे वगैरे सद्गृहस्थांचे हजारों दाखल्यांचे व विशेष माहितीचे, व एजंट व्यापारी दराचे पुस्तकाकरितां अर्धा आणा पाठवा, किंवा तें पुस्तक माला बरोबर फुकट पाठवूं. १ पासून ६ पर्यंत ट. ह. ६ आणे बंगी करणावळ माफ.

G. B. Naik and Company
Byculla Bombay

**जी. बी. नाईक आणि कंपनी.**

मुंबई, भायखळा जुन्या दवणी समोर; व पुणें, रविवार पेठ नं० ६०

## जाहिर खबर

बाहेर गांवच्या सर्व व्यापारी लोकांस कळविण्यांत येतें कीं; आमची पेढी मुंबईत फार दिवसांपासून चालू असून आह्मी पुष्कळ फायद्यानें माल खरेदी करून पाठवित असतों. ज्या व्यापारी लोकांस मुसारी, कापड, फरनीचरचें जातीचें सामान, लांकूड, लोखंड, किराणा, हार्डवेर ( चुका, स्क्रू वगैरे ) स्टेशनरी व ग्यासलेट वगैरे कोणत्याही जातीचा माल मागणें झाल्यास आह्मी पुष्कळ फायद्यानें आणि कसोशीनें व त्वरित पाठवूं. एक वेळ माल मागविल्यावर खात्री होईल. आमच्या कमिशनचा भावही फारच कमी ह्मणजे शेंकडा एक टक्या प्रमाणें आहे. माल मागविणें तो व्हाल्यू पेबलनें अगर आगाऊ रुपये पाठवुन मागवावा. पण व्हाल्यू पेबलनें माल मागविणारांनीं शेंकडा २५ रुपये प्रमाणें रक्कम आगाऊ पाठविली पाहिजे. ज्या लोकांस माल मागविणें असेल त्यांनीं खालील पत्यावर आपलें नांव, गांव, स्टेशन वगैरे स्पष्ट खुलासेवार लिहून पत्रव्यवहार करावा. पत्रें पोस्टपड पाठवावीं व उत्तराकरितां टिकीट पाठवावें.

**तईयब अली मुलावली भाई.**

मच्छी बाजार, अबदुल रहिमान स्ट्रीट, मुंबई.

## जाहिरात

सर्वत्र लोकांस गुल महमद वल्द शेख टिपू राहणार मौजे अठाळी तालुके खामगांव याजकडुन असें जाहीर केलें जातें कीं भोनाजी वल्द गुलु बेलदार व महादू वल्द गुलू बेलदार राहणार अठाळी यांचेपासून सर्वेनंबर ९२ चे शेत मौजें अटाळी येथील मी रुपये [ ९५ ] यास खरेदीकरून घतलें आहे त्यास अजमासें तेरा चौदा वर्षे होत आलीं अलीकडे माझ्या ऐकण्यांत असें आलें आहे कीं मी जें खरेदी घेतलें शेत आहे. तेंच शेत सदरहु भोनाजी व महादु व महादूचा मुलगा चाहादु हे मिळून दुसऱ्यास खरेदी करून देत आहेत वगैरे. त्यास मी सर्वांस असें जाहीर करितों कीं सदरहू सर्वे नंबर ९२ चें शेत मज शिवाय कोणी खरेदी, गहाण. अगर तारण वगैरे घेईल तर त्याबद्दल जबाबदार नफानुकसानीवगैरे बद्दल सदरहु शेत अगर मी कोणतेही प्रकारचा नाहीं ज्याचा तो जबाबदार आहे ह्मणून दिली जाहिरात सही. तारिख १७ माहे जानेवारी सन १०८४ इ०

सही

सहीचा निशाणी वखर गुलमहमद वल्द शेख टिपू राहणार मौजें अठाळी याच्या हातची असे.

### नोटीस

रा. रा भोनाजी वा गुलू बेलदार व महादु वा गुलू बेलदार राहणार मौजे आटळी तालुके खामगांव जिल्हे अकोले. या उभयतास नोटीस देणारे गुल महमद वा सेखटिपु राहणार मौजे अटाळी तलुके खामगांव जिल्हे अकोले नोटिशीने असें कळवितो कीं तुम्हा उभयता पासून मौजे मजकूर येथील येथील शेत खरेदी रुपये ९५ पासून मी घेतलें त्यास आज सुमारे चवदा वर्षे होत आली खरेदी घेतलेले शेत माझे ताब्यांत आहे व ते मी वाहून त्याजबद्दल सरकार चावडीचे रु. मी देत आहे. खरेदी शेताचें खाते माझे नांवानी खरेदी घेतले त्या वेळीं करून देणेंच. परंतु आज पावेतो तुह्मी खाते माझे नांवानीं करून दिले नाहीं तर खाते माझे नावानीं नोटीस पावल्या पासून १५ दिवसांत करून द्यावें. असे न केल्यास तर खाते माझे नावानें करून दिले नाहीं याजकरितां जी जी मजला दाखल मिळेल. व माझी नुकसानी होईल ती सर्व तुमचे पासुन ह्या नोटिशीचे खर्चा समेत भरून घेतलें जाईल.

मजपासून खरेदीचे रुपये ९५ घेऊन माझे नांवाचे खाते करून दिलें नाहीं इतकेंच नाहींतर जे शेत मजला खरेदी दिले आहे. तेच शेत तुह्मी उभयतांनी आज सुमारें १५ दिवस झाले भाझा भाऊ नोने शेखजी वा सेखटिपु यांस खरेदी देत आहे. याजवरून तुह्मा उभयताचा इरादा मजला सर्व परीने डुबविण्याचा उघड दिसतो. तर तुमच्या अशा करण्यानें मजला जी जी नुकसान व दखल होईल त्याज बद्दलचे सर्व प्रकारचे जबाबदार तुह्मास धरून मज सर्व नुकसान भरून घेतलें जाईल. ह्मणून दिली नोटीस सही तारीख १७ माहे, ज्यानेवारी सन १८९५ इसवी.

( सही )

सहीची निशाणी वखर गुलमहमद वा. सेखटीपु राहणार मौजे अटाळी तलुके खामगांव यांच्या हातची असे

### नोटीस

रा. रा. अम्पाराम वल्द मगणीराम मारवाडी रहणार मळसूर तालुके बाळापूर जिल्हे अकोलें यांस नोटीस देणार बनआपा वल्द महादापा वाणी राहणार चानी चतारी तालुके बाळापूर जिल्हे अकोलें नोटिशीनें असें कळवितों कीं, तुमचे कडे आमचे वडिलांनीं येणें ( ५६१ ) पांचशे एकसष्ट त्याज पैकीं तुम्ही आज पावेतों रुपये ५१ एकावन आदा केलें. बाकीं रुपये राहिलेले ५१० पाचशें दहा व यांस दर शेकडा दरमहा आणे ०८ प्रमाणे आज पावेतों व्याज अदमासे रुपये ९० नव्वद असे मिळून रुपये ( ६०० ) सहाशे तुह्माकडे येणें. तर हे रुपये तुह्मी नोटीस पावल्या पासून १५ पंधरा दिवसांत आणून देऊन निकाल करावा असें न केल्यास नाहीं तर सदरहु ६०० सहाशे रुपये दर महा दर शेकडा १ एक रुपया व्याज सर्व रुपये आदा होणें पर्यंत घेतले जातील. नोटिशींत लिहिले प्रमाणें रुपयाचा निकाल झाला नाहीं तर कोर्टांत फिर्याद करून ह्या नोटिशीच्या खर्चासह व अखेर निकाल होई पर्यंत जो खर्च वगैरे होईल तो व नुकसान असें सर्व फिर्याद करून भरून घेतलें जाईल. ह्मणून दिली नोटीस सही तारीख १४ माहे जानेवारी सन १८९५ इसवी.

( सही )

सही बनापा वल्द माहादापा वाणी राहणार चानी तालुके बाळापूर जिल्हे अकोला दस्तूर खुद्द.

## मुलांचा शिक्षणक्रम.

( मागील अंकावरून पुढें चालू )

मोठेपणीं आपणास मानसन्मान प्राप्त झाला असतां बाळदशेंत घालविलेल्या रमणीय दिवसांशी आठवण करणें किती आनंददायक आहे! मातेचें आपल्याकडेस तें प्रेमभरित नेत्रांनीं पहाणें! पित्यानें पुरविलेले कोडकवतुक व त्याची आपल्या वरील माया! आपल्या अस्खलित चालण्यानें आणि अस्पष्ट बोबडें बोलण्यानें माता पितरांस झालेला आनंद! आपल्याला ज्ञान प्राप्ती करून देण्याकरितां उभयतांनीं केलेले परिश्रम! अमृता

प्रमाणें मधुर सदुपदेश करून आपल्या मनांत ठसविलेल्या उत्तम गोष्टी! आणि आपल्या अंगीं जो काहीं चांगुलपणा व अल्प स्वल्प गुण आहेत त्या बद्दल ईश्वराच्या खालोखाल आपण आपल्या माता पित्यांचे ऋणी आहोंत असा मनांत येणारा विचारः हे व अशाच इतर लहानपणच्या आठवणी पासून आपणास किती समाधान आणि आनंद प्राप्त होतो!

मुलाला आईसारखा उत्तम शिक्षक दुसरा कोणी नाहीं. मृत्युमुळें मनाच्या विकृतीमुळें अथवा काहीं आकस्मिक कारणामुळें जीं मुलें पितृसुखास अंतरतात त्यांची स्थिति फार दुःखद असून त्यांचा पुढील आयुष्यक्रम दुःखावह होण्याची भीति असते. तसेंच शैशव दशेंत असतांना जीं मुलें मातृवात्सल्यास मुकतात त्यांचीही स्थिति कष्टदायक असून धोक्याची असते; परंतु मातापितरांच्या दोषानें आणि दुर्वर्तनानें, फाजील कडकपणानें आणि फाजील लाडानें ज्या मुलांची विचार शक्ति दूषित होऊन त्यांचें अंतःकरण भ्रष्ट होतें अशांची स्थिति अधिक भयंकर व अधिक शोचनीय होय!

आपल्या भावंडावर प्रीतिकरणें आणि वडिलांची आज्ञा पाळणें इत्यादि जे मुलांचे धर्म आहेत ते केल्यापासून त्यांच्या अंगीं असलेलें प्रेम वाढीस लागून अनेक प्रकारचे सुविकार त्यांच्या मनांत वाढतात. हें प्रेम आणि सुविकार शेवटपर्यंत कायम राहतात. याकरितां मुलाला शिक्षण देण्याचें उत्तम ठिकाण त्याचें घर हें होय. मुलाला चांगल्या संवयी लागून त्याचें मन संस्कृत होण्याकरितां गृहशिक्षणाची विशेष आवश्यकता आहे हें कोणीही कबूल करील.

कुटुंब हें ममतेचें आदिस्थान होय. मुलाला चांगल्या सवई लागून त्याचें मन संस्कृत होण्या करितां जसें गृहशिक्षण अवश्य आहे तसेंच त्याची बुद्धि प्रगल्भ होण्या करितां गुरुशिक्षण पाहिजे. आतां हें खरें आहे कीं, मुलांना अभ्यासघरापेक्षा शाळेंत चांगला होईल आणि म्हणून त्यांनां शाळेंत पाठविलें पाहिजे.

( पु० चा० )

## वऱ्हाडसमाचार

मिती पौष वद्य ११ शके १८१६

पुण्याच्या सार्वजनिक सभेवर मुंबईसरकारचा कोप झाला आहे. गेल्या दंग्याच्या संबंधानें सार्वजनिक सभेनें सरकारास एक अर्ज केला होता आणि त्यांत हिंदुमुसलमानामध्यें दंगे न होण्यासाठीं सरकारांतून काय काय तजविजी झाल्या पाहिजेत याविषयीं फार उत्तम सूचना केल्या होत्या. परंतु लार्ड हारिस यांस हा हितबोध आवडला नाहीं आणि त्यांनीं सार्वजनिक सभेस प्रश्न केला कीं म्यानेजिंग कमिटी ही काय आहे तिला अधिकार कोठून मिळाला व वरील अर्जाला अनुकूल व प्रतिकूल जे लोक होते त्यांचीं नांवें काय काय आहेत. सार्वजनिक सभेचे आनररी सेक्रेटरी रा. रा. गोखले व साठे यांनीं जबाब देते वेळीं पहिली माहिती दिली परतु नांवें सांगण्याचें नाकारलें. अर्जांत जो विषय आहे त्याच्या विचारासाठीं सभासदांची नामावळी कळविणें अगत्याचें नाहीं. नांवें विचारण्याची वेळ गेल्या पंचवीस वर्षांत आली नाहीं, बहुत विषयांवर पूर्वीं अर्ज केले असून सार्वजनिक कार्यांत सभेच्या अधिकाराविषयीं शंका घेतली नव्हती, नांवाची यादी देण्याची सभेला गरज व जबाबदारी कळत नाहीं. जबाब फार नामी व यथायोग्य आहे. पुण्याच्या सार्वजनिक सभेच्या अर्जाला सरकारनें असे फाटे फोडावें हें गव्हरनरांस असभ्यपणाचें व पातशाहीपणाचें लांछन होय!

---

"शाळा करितां कवाईतीचें पुस्तक" ह्याची एक प्रत रा० रा० गोविंद भास्कर ओक, सेक्रेटरी डि० बोर्ड वाशीम यांजकडून आली आहे. तिचा आम्ही सादर स्वीकार करितों. शाळेंतील शारीरिक शिक्षणाकडे अधिकाऱ्यांचें लक्ष जाऊन ते कोणते रीतीनें चांगले प्रकारें देतां येईल ह्याबद्दल विचार सुरू आहे आणि दररोज शाळा सोडण्यापूर्वीं थोडी कवाईत करून घ्यावी असा अपले शाळाखात्यांत हुकुम ही झाल्याचें समजतें. तरी कवाईत शिकविण्यास व शिकण्यास काहीं एक साधन नव्हतें; ती उणीव रा० ओक यांचे बुकानें नाहींशी झाली. ह्या पुस्तकांत हुकूमाचे शब्द मराठींत देऊन त्याचे खालीं इंग्रजींत शब्द व इंग्रजी शब्दांचा मराठीं लिपींत उच्चार दिला आहे ह्यामुळें हें पुस्तक मराठी व इंग्रजी अशा दोन्ही शाळांत उपयोगी पडेल. जाग जागीं सुरेख चित्रें घातलीं आहेत त्यामुळें पुस्तकाची उपयुक्तता वाढून हा नवीन विषय फारच सुलभ झालेला आहे. छपाई व बांधणी चांगली आहे. पुस्तकाची किंमत ८।० आहे. अशा प्रकारचीं जिकीरीचीं पुस्तकें छापण्यास खर्च फार येतो त्यामुळें ही किंमत जास्त पडते त्यास पुस्तककर्त्याचा काहीं इलाज नाहीं. ज्या शिक्षकांस आपले शाळेंत कवाईत शिकविणें असेल त्यांनीं त्यांचे पुस्तकावरून शिकवावी अशी आम्ही शिफारस करितों.

---

गेल्या मंगळवारीं उमरावतीस एक टोलेजंग महोत्सव झाला. हा समारंभ उमरावतीस स्त्रिया करितां पृथक दवाखाना सुरूं करण्या संबंधानें झाला. 'लेडी डफरीन फंड' नांवाची एक जाहिर संस्था आहे. तिचा हेतु एतद्देशीय स्त्रियांस औषधोपचाराच्या सोयी करून देण्याचा आहे. या संस्थेची एक शाखा या प्रांतीं १८८६ साला पासून चालूं आहे. या वऱ्हाड शाखेनें हा पहिला दवाखाना उमरावतीस घातला. या संस्थेला सरकारी अधिकाऱ्यांची मदत जंगी आहे. ही संस्था निवळ लोकांच्या वर्गणीवर चालते. पण अधिकारवर्गानें ही धर्मादायाची संस्था इतक्या नांवलौकिकास चढली आहे हें निराळें लिहिण्याचें प्रयोजन नाहीं.

उमरावतीचा हा समारंभ फार चांगला झाला. सभेचा मंडप भव्य असून गांवोगांवचे प्रमुख लोक जमले होते. या सभेला थोर व कुलीन अशा स्त्रिया हो शंभर दोडशे वर जमल्या होत्या. दवाखाना स्त्रियाच करितां असल्या मुळें त्यांच्या आगमनानें विशेष शोभा आली होती. इंग्लिश व पारशी बायका पुरुषाच्या शेजारी बसल्या होत्या पण हिंदुस्त्रिया चिकाच्या पड्द्या आड एका बाजूला बसल्या होत्या. अलिशान रेसिडेंट आदि करून मंडळी स्वस्थानीं विराजमान झाल्यावर कर्नल मेकंझी यांनीं आपलें छापील भाषण वाचून दाखविलें. त्याचा भावार्थ रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे यांनीं मराठींत सांगितला. नंतर उमरावतीच्या शाळामास्तरीण व 'स्त्री पुरुषतुलना' या ग्रंथाची कर्त्री ताराबाई शिंदे यांनीं एक दवाखान्या संबंधानें आभारप्रदर्शक लेख वाचला आणि कांहीं मुलींनीं सुस्वर पद्यें गायलीं. शेवटीं मि. फ्लैडन यांनीं जमलेल्या लोकांचे आभार मानले. आणि दवाखाना सुरू केल्या बद्दलचे सोन्या सारखे शद्ब त्यांच्या मुखांतून पडतांच सर्वत्र टाळ्यांचा गजर झाला व हारतुरे, पान सुपारी, अत्तर गुलाब वगैरे वाटल्या नंतर दरबार बरखास्त झाला.

उमरावतीच्या या नव्या दवाखान्या संबंधानें कर्नल मेकंझी यांनीं इतिहास सांगितला त्याचा सारांश येणें प्रमाणें:—

सन १८८६ सालीं लेडी डफरीन फंडाची वऱ्हाडशाखा स्थापन झाली. आरंभीं कनिष्ठ वर्गांतील नेटीव स्त्रियांस सुईणकाम शिकवून ठिकठिकाणीं त्यांस पाठविलें. प्रत्येक दवाखान्याला एक स्त्रियांचा भाग जोडून एकेक बाई हास्पिटल आसिस्टंट ठेवण्याचा प्रथम विचार होता परंतु फार खर्चाची ही योजना वाटल्या वरून उमरावतीस स्वतंत्र दवाखाना बांधण्याचा बेत ठरला. रा. रा. पांडुरंग गोविंद, देवराव विनायक, इत्यादिकां सारखे थोर थोर गृहस्थ जुन्या समजुती टाकून देवदूता सारखे आह्मास साह्यकर्ते झाले आणि २९०१९ रुपये वर्गणी जमली तिचा जिल्ह्याच्या वर्गवारीनें तपशील असाः—

| जिल्हा | वर्गणी रुपये |
|---|---|
| इलिचपूर | १२०१६ |
| उमरावती | ८७२८ |
| अकोला | २७४८ |
| वाशिम | १२३९ |
| बुलढाणा | २८८ |
| वणी | ० |
| एकूण | २९०१९ |

या शिवाय वऱ्हाड शाखेनें ६२०० रु० व सेंट्रल कमिटीनें १००० रु० दिले आणि बहुतेक ही सर्व रकम ह्मणजे ३२४८८ रुपये दवाखान्याची इमारत, औषधें व शास्त्रें, आणि इतर सामान सुमान यांजकडे खर्च झालें आहेत. हा दवाखाना चालूं ठेवण्यास सालिना ५७७२ रुपये खर्च येईल त्याची विल्हेवार येणें प्रमाणें होणार आहेः—

| | रुपये |
|---|---|
| वऱ्हाड शाखा | १९९९ |
| उमरावती म्युनिसिपालिटी | १२० |
| सेंट्रल कमिटी | ६०० |
| प्रांतिक जमाबंदी | ३३१० |
| | रुपये ५७७२ |

अखेरच्या दोन रकमा फक्त तीन वर्षांपर्यंतच मिळणार आहेत तेव्हां ३९१७ रुपये सालिना व्याज उत्पन्न होईल इतका फंड लोकांच्या वर्गणीनें जमा व्हावयाचा असून त्या पैकीं एक हजार रुपये जमले आहेत.

वऱ्हाडांत एकंदर स्त्रिया १४,०९,६६९ आहेत आणि ही संख्या सालिना प्रत्येक हजारी ८.११ या प्रमाणानें वाढत आहे, इतक्या बायका सामान्य औषधोपचारावर प्राण धारण करित आहेत हें पाहून कर्नल मेकंझी यांचे काळीज थरारून गेलें. आणि निदान उमरावतीच्या आसपासच्या बायका स्त्री डाक्टर मिस ड्रेवी यांच्या हवाली केल्यानें त्यांच्या विषयीं काळजी कमी झाली. ही कष्टमय स्थिती सर्व प्रांताची आहे तेव्हां ठिक ठिकाणीं दवाखाने सुरूं होणें इष्ट आहे आणि ही उणीव ठिकठिकाणचे श्रीमान व उदार लोक दूर करितील अशी कर्नल मेकंझी यांस मोठी उमेद आहे.

या दवाखान्याच्या व्हिजिटिंग कमिटी मध्यें श्रीमती बुलक, रो, फाबेंम विनाय, काणे व जोशी या बाया आहेत ही आनंदाची गोष्ट आहे. ईश्वर करो आणि हा उमरावतीचा स्त्रियांचा दवाखाना चिरकाल सुयंत्र चालो!

---

अलिशान रेसिडेंट साहेब बहादूर हे उमरावतीहून निघाल्या नंतर कूच मुकामास येई पर्यंत ठिकठिकाणीं त्यांच्या स्वागतार्थ आनंदोत्सव व रमणीय व्यवस्था इत्यादिकांनीं सर्व गांवेच गांव दुमदुमून गेले होते. राजपुरुषाच्या दर्शनार्थ इतके लोक मोठ्या राजनिष्ठेनें लोटत आहेत हें पाहून प्रांतिक अधिकाऱ्यांचें अभिनंदन केल्या वांचून आमच्यानें रहावत नाहीं.

आलिशान रेसिडेंट साहेब यांच्या सयागमें शेंदोडशें लोकांचा लंगर आहे. अशा लवाजम्यानिशी मिस्तर फ्लौडन साहेब पूर्वीं कधीं आले नव्हते. हे गृहस्थ आमचे जिल्ह्यांत आल्या नंतर त्यांचा मान मरातब व सरबराई सर्वोत्कृष्ठ प्रकारची राखण्या विषयीं मेहेरबान हेअर साहेब यांणीं अगाऊच काळजी घेतली आहे.

आम्हांस लिहिण्यास विशेष आनंद वाटतो कीं मेहेरबान हेअर साहेब यांणीं अशा सरबराईच्या प्रसंगाला रयतेचा छळ होऊं नये म्हणून सक्तीचे हुकुम सोडिल्याचें ऐकिवात आहे. रेसिडेंट साहेबा सारिखे सर्वांत श्रेष्ठ अधिकारी प्रत्यक्ष भाताची स्थिति समजून घेतात हा रयतेचा मोठा भाग्यकाल होय. वरिष्ठाच्या स्वाऱ्या आपल्या गांवीं येऊं नयेत असें कोणास वाटत नसेंत पण प्रत्येकाच्या मनाला दहशत बसली असेल ती अशी कीं सरबराई व बेगारी यांच्या चक्रांत आपला व आपल्या संबंधी लोकांचा द्रव्यद्वारा व शरीर द्वारा चुराडा होऊन जाईल; परंतु मिस्तर हेअर सारखे कनवाळू कार्यदक्ष व दूरदृष्टी अधिकारी वरील दहशत नाहींशी करण्यांस प्रयत्न करितात हें लोकांस कळल्या बरोबर लोक मोठ्या आनंदानें माना डोलवीत आहेत.

यद्यपि आह्मी नेत्रांनें ज्या गोष्टी पाहतों त्यावरून हेअर साहेबांच्या मनोरथाचें प्रतिबिंब त्यांचे हाताखालील हुद्देदारांचे मनांत स्पष्ट उमटलें नाहीं असें मोठ्या दुःखानें ह्मणावें लागतें.

Single copy........................ 4

# आकोला वऱ्हाडसमाचार तारीख २१ माहे जानेवारी सन १८९५ इ

Advertisement
Below 10 lines... 2 Rs
per line over 10... 4 as
Repetition per line 3 as.

राजपुरुषास परमेश्वरानें सर्व गोष्टी अनुकूल केल्या असतात आणि त्यांच्या इतमामा प्रमाणें वागण्यास त्यांस धनबळही मुबलक असतें. खरे थोर पुरुष आपल्या निमित्त क्षुद्र जनांचा छळ कधींही करणार नाहींत इतकेंच नव्हे तर लोकांस पीडा होत असल्याची खबर कळतांच सर डेनिसफिट्झ प्याट्रिक सारख्या लोकांनीं उलट मनाईचे हुकूम सोडल्याचें कारनेकरांनां सर्वत्रांस विदित केलेच आहे. अन्याय, लूट, बेगारी, बेबंदशाई वगैरे लाजिरवाण्या गोष्टा सरबराईच्या प्रकणांत होत नसतील असें नाहीं परंतु त्यांचे कर्तृत्व हलक्या दरज्याच्या लोकांकडेस असते. आणि त्या मुळें अपरक्ष काळीमा थोर पुरुषांच्या वर्तनास लागतो याचा खुद्द त्यांचा उपाय नाहीं व लोकांचाही उपाय नाहीं. आमच्या मतें सरबराईचा उपभोग घेणाऱ्यावर ही मोठी जबाबदारी आहे कीं त्यांच्या सरबराईचा खर्च आपल्या थैलींतून खर्च पडून ज्याचा त्यास योग्य मिळाला जावा अशाबद्दल अत्यंत काळजी घतली पाहिजे आणि मिस्तर ग्लाडस्टन सारखे चतुर लोक मिस्तर हेअर सारख्या अधिकाऱ्यामार्फत ही जबाबदारी पूर्ण बजावतील व एका उत्तम गोष्टीचा कित्ता प्रांतस्थ अधिकाऱ्यास घालून देऊन दुवा घेतील अशी आह्मी उमेद बाळगतों.

---

साधारण असा शिष्टाचार आहे कीं रेसिडेंट सारखा बडा पाहुणा जिल्ह्याच्या ठिकाणीं आला असतां त्याच्या मुलाखती साठीं त्या जिल्ह्यांतील गांवच्या ठळक ठळक लोकांस आमंत्रणेंही पाठवून एकत्र जमवितात. आतां हे बाहेरून येणारे लोक सर्वच सारखे वतनदार, धंदाज व श्रीमान असतात असें नाहीं, तथापि जो तो आपल्या ऐपतीप्रमाणें मोठ्या थाटामाटानें दर्शनलाभासाठीं येत असतां परंतु कित्येक वेळां असें घडतें कीं या पाहुण्यास कार्यबाहुल्यामुळें जमलेल्या शिष्ट लोकांची भेट घेण्यास फुरसत नसेत आणि त्यामुळें पुष्कळ दर्शनोत्सुकांची निराशा व मनोभंग होतो तेव्हां व्यवस्थापक अधिकाऱ्यांस आमची अशी विनंती आहे कीं पाहुण्याशीं प्रत्यक्ष सल्ला मसलत केल्याशिवाय येरझारीच्या सांकड्यांत त्यांणीं लोकांस घालूं नये. ही गोष्ट मुद्दाम लिहिण्याचें प्रयोजन वर निर्दिष्ट केलेलीं लोकांचीं आमचेकडेस आलेली गाऱ्हाणीं होत.

---

# The Berar Samachar

MONDAY JANUARY, 21, 1895

## "A problem for the educated."

*(Communicated)*

It is glaring enough and at the same time highly gratifying that many wits and cultured brains are endeavouring for the political aggrandisement and social upheaval of this vast and historical country. We rejoice to note that some magnificent and benign results, however few have been accomplished thereby, although the efforts made towards these stately movements are like periodical hysterical fits instead of being of a more permanent active character. But in these exertions for such beneficial movements and agitations our educated and gifted men are unconsciously ignoring one thing of vital importance. Political exaltation and social elevation form the two plates of the grand battery in the form of our nation. These plates were contracting rust in centuries gone by; but for the noble efforts of our educated men, they have been spared from a destructive fate; at their hands they have received a nice polish and are ready now for brisk action. The whole mass of population forms the huge, vessel of this demon leathery. Sound education is the strong exciting liquid to be poured into this vessel to accelerate the action; and this done, follows the marvellous phenomenon of a useful and effective current which would enable us to achieve our aims and ends. Therefore education must permeate through the masses and classes of our country, if, at all, we all desire to get our political aspirations fully satisfied and our social excellence achieved. All religious animosities and racial distinctions must be annihilated for this noble goal. But here it is that our cultivated heads have made a deplorable departure. It is but a pity that the high functionaries of the Educational Department of this province, are, in the bargain, levying restrictions, which would, to be sure, go to hinder the spread and progress—nay even stunt the growth altogether—of learning which is indispensible. Measures like this should be denounced. Bacon, the great English philosopher, has poignantly noted down as follows. "If you will have a tree bear more fruit than it hath used to, it is not any thing you can do to the boughs, but it is the stirring of the earth and putting new mould about the roots that must work it." So, what we are urging to is that education should be rapidly infused into the depths of masses and the classes; otherwise, all our actions, howsover good and high they may be, would be fruitless. Having pleaded the above absolute and pressing need may we entreat the educated people to set themselves to this dignifying work with energy and sincerity? Would they find this business agreeable to their taste? We ardently trust they would. If so, then, we make ourselves bold enough to suggest a way of our own to accomplish this duteous yet philanthropic purpose. Schemes like the Night Schools &c. had been proposed by some fertile heads, but for one cause or another they have failed to work. We know that some such schools have been established in some parts of this country, by some zealous and patriotic persons but owing to their paucity the outcome has not been tangible enough. Our way would be this. We are of opinion and strongly believe, that, if every educated person condescends to spare a little time which we fervently hope he can to teach his household, servant or servants—as the case may be—whether male or female and also their children, some relations and friends if there be any, a great part of the noble mission will have been executed. Similarly if the officials—of course we are speaking of the Indians would undergo a little trouble to give to drink the celestial liquor —we mean knowledge—to the persons of their offices, they would be rendering a valuable yet at the same time laudable service to this country. The education thus imparted should be free. This, we believe, our educated men can do without incuring any sort of inconvenience to themselves, or without imperiling their purses. They, however, should never fail to do this as their circumstances and means would allow. We assure our educated men that what we are proposing ourselves unto them is not a thing either visionary, or impracticable or Utopian. We ask them to remember that the faint Utopias of today are the brilliant realities of the future. But our educated men are sure to put forth one impediment. They would deem this affair as being below their dignity and position. To confer with a lower—class man is a humiliation to them. Then, to teach him after sparing a little time would certainly be an awful mortification to their hearts. It is a sheer regret that the educated class is so proud of its refinement and culture that it hedges itself round with a wall of exclusiveness, as though the refinement, if it were real, could be scratched off by a little friction with the outer world—we mean the lower class people or the masses. But we would have it otherwise. We supplicate every enlightened person that he should go out, move with alacrity and spread the grace of his presence in the masses by imparting knowledge to them, so that others may see in him the reflection of learning and be stirred by the beauty of the reflection to seek that light which lies, at present, beyond their vision. These words we hope would be sufficient to make him turn to the proposed action. Moreover, we remind him of an old saying— *"labour omnia vincit."*

---

Mrs. Annie Besant is a well-known lecturer on theosophy and her visit to the Congress at Madras was an occasion to persuade her to speak on politics. The subject she dealt with is a general and difficult one; but her way of explaining it is lucid, interesting and as well instructive. She gives her audience in the space of one lecture a definite idea of what politics mean. Her despise of materialism is evident in her speech but at the same time she holds forth India as the germ of sound politics and the saviour of the rest of the world. Her picture about Indian politics is worth a careful study and we quote it without an apology to our readers:—

"Now India was in this remarkable position. Far from her own past she had brought down the ideal of a system that essentially was founded upon duty. India was at present a strange compound of conflicting theories and conflicting ideas, a strange compound of an ancient nation ruled over by a modern people. And two ideas were here face to face, both of which had many to support them; one the old ideal of duty which would make progress of the future pass onwards along the line already familiar, and the other that of those who would take the Western system completely and transport democracy from America and Great Britain on to the Indian soil unused to democratic methods, would claim democratic methods, and employ here all the democratic organization, not quite sure whether the soil would suit what here was exotic. In a country like India where the mass of the people were of different faiths, different traditions from those who ruled them, there should be many amongst the people themselves to translate the popular grievances and speak out the popular desires. (Hear, hear) It was necessary in order that justice might be done, in order that a wise policy might be followed, that those who had the power should also be instructed in the knowledge of the wants of the people, and none could do that save those who belonged to the people (Hear, Hear) and who knew the national desires and understood the methods along which these desires might be met. Therefore, while for her own part she stood for the ideal of the ancie... on that as ... than the mash... had grown in the less she w... that they must ... they had it and were pushed into they must adapt the somewhat so as to conditions, so as to ... new way of thought."

---

NO. 4

अंक ४

## वऱ्हाड.

द्वारांत तुझी बां- ...न तुझी वि-

हवामान—या आठवड्यांत आणा. व तुमपाऊस पडला परंतु अलिकडे चांगलाच मोइया पडूं लागून आभाळ स्वच्छ असतें. वैगेरे आह्मणण्यासारखी विशेष नाहीं.

रेव्हरंड थामस इव्हान्स यांचें आकेल्यास त्याजरूनें गेल्या मंगळवारीं मद्यपाननिषेधावर उत्कृष्ट व्याख्यान झालें आणि अशी निषेधक मंडळीही स्थापण्यांत आली. साहेबांनीं नागपुराप्रमाणें येथें हिंदुधर्मावर तोंड सोडलें नाहींत हे त्यांनीं आपल्यावर उपकार करून घेतले. नाहीं तर, आतां प्रमाणें त्यांची वाहवा व थोरवी झाली नसती.

अलिशान रेसिडेंट मि. फ्लौडन यांची स्वारी २४ वीला कुरणखेड मुक्कामीं येईल. २५ ला बारगांवला येऊन शनिवारीं सकाळीं साहेब बहादूर आकोल्यास येतील.

रा. रा. कृष्णाजी सदाशिव तांबे हेडमास्तर, आकोट यांस सहा महिन्यांची फर्लो रजा मिळाली.

गेल्या मंगळवारीं सायंकाळीं अलिशान रेसिडेंट यांच्या हातून उमरावतीस स्त्रियांच्या दवाखान्याचा प्रारंभसमारंभ झाला. असल्या समारंभाचे बहुमान व यशश्री हीं थोर अधिकाऱ्यांच्या घरीं आपोआप चालून जात असतात.

---

(वाशीम जिल्ह्यांतील हालहवाल)

ता. १६-१-९५

हवामान—थंडी विशेष पडत नाहीं. आकाश दिवसांतून बराच वेळ अभ्राच्छादित असतें. तारीख १४ रोजीं सायंकाळीं थोडा पाऊस पडला. ह्यामुळें रबीचे काहीं पिकास फायदा झाला व कांहींस तोटा झाला. धान्याचे भाव बरे आहेत.

तपासणी—मे. एक्झामिनर पब्लिक वर्क्स अकौंट हैद्राबाद ह्यांची स्वारी जिल्हा बोर्डाचे हिशेबाची तपासणी करून उद्यांक आकोल्यास जाणार आहेत.

नाटक—करूणेश प्रासादिक संगीत नाटक मंडळी येत्या शनिवारीं खेळ करून येथून बाहेर जाण्यास निघणार ह्मणून समजतें. त्यांचा "संताप शमन" नांवाचा प्रयोग फारसा चांगला वटत नाहीं; तरी एकंदरींत नाटक बरें होतें. ही नाटक मंडळी येथील "करूणेश्वर नांवाचे महादेवाच्या प्रसादानें स्थापित झाली आहे असें तिच्या नांवावरून तेव्हांच ध्यानांत येईल. तरी मंडळीच्या उत्पादकांनीं करुणेश्वराचे देवालयास कांहीं ऋणोतराई व्हावें

बाइलर्स इन्स्पेक्टर साहेब हे येथील काप साचे जिनिंग फॅक्टरीच्या बाइलर्सची तपासणी करून पुसदकडे गेल्याचें समजतें.

मे० असिस्टंट कमिशनर, डि० सु० आफ पोलीस ह्यांच्या स्वाऱ्या येथेंच आहेत.

मे० डे० ए० इन्स्पेक्टर साहेब यांची स्वारी रिसोडकडे आहे.

---

## वर्तमानसार.

नोटिशीन १० ओळीचे दर ओळी दुसरे वेळें

अकोला वऱ्हाडसमाचार तारीख २१ माहे जानेवारी सन १८९५ इ०

... व्यापारावर कर ... हिंदुस्थानसरकार व ...रम्यान विचार चालूं ...

... मानलेल्या मोकडन ठि- वरून जाण्याचें जपानानें सांगतात- या मोकडन ठि- [स]रकारचा एक मोठा खजिना अ- ...चीनि नांवें ३,३०,००,००० तिजोरी तेथील देवाच्या दिमतीस आहे आणि त्या देवाची उपासना याचे त्या ठिकाणीं एक सुंदर देवालय आहे व त्याचा पुजारी हा त्या खजिन्याचा संरक्षक आहे. पूर्वी एकदां एक चोर हा खजिना लुटण्याकरतां गेला. पाहरेकरी वगैरे निजले होते. चोर आंत शिरला व संपत्ती काढूं लागला. त्यास एक जोडा सांपडला तो त्यास कांहीं केल्या उचलेना! शेवटीं त्या चोरासुद्धां तेथून हालतां येईनासें झालें. उजाडल्यावर त्यास पकडला तेव्हां त्यानेंच ही सर्व हकीकत सांगितली व ती लोकांस खरी वाटून त्या खजिन्याच्या वाटेस कोणी जात नाहासें झालें हे जोडे सोन्याचे आहेत.

१८९६ सालांत रशियाचा खर्च नमेपेक्षां जास्त होणार असल्यामुळें तितकी रकम रशियाच्या राखून ठेवलेल्या खजिन्यांतून--गंगाजळींतून काढली जाणार आहे. व्यापाऱ्याचा जसा एक रिझर्व फंड असतो तसा रशियाचाही आहे असें यावरून होतें, पण आमच्या हिंदुस्थानसरकारचा तसा कांहीं प्रकार नसून नेहमीं ऊर्ध्वांपे दिशो ब्रह्मणेनमः आहे.

कित्येक इंग्रज मासलेदार न्यायाधीश बनतात! बांडाच्या जज्जानें आरोपी कोडतांत हजर असल्यावांचूनच त्यास फाशीची शिक्षा दिली! अपिलाचा निकाल होणें आहे पण हायकोर्टानें जज्जास फार ठपका दिला.

मुंबई व कलकत्ता यांच्या दरम्यान जबलपुरच्या वाटेनें जाणाऱ्या उतारूंस रेल्वे भाडें कांहीं कमी होणार आहे. रेल्वेच्या चढा ओढीचा हा फायदा आहे.

मि. लीवार्नर हे २० फेब्रुवारी रोजीं होसूरच्या रेसिडेन्टच्या जागीं रुजूं होणार.

चीनचें तहाचें बोलणें बहुतेक व्यर्थ झाल्या सारखें दिसतें. पेकीन शहर काबीज करण्यापूर्वी जपान तहाचें बोलणें करण्यास तयार नाहीं असें सांगतात.

जपानी फौजेनें पोर्ट अर्थर हें ठिकाण आपल्या ताब्यांत घेतल्यावर चार दिवसपर्यंत तेथील बिनहत्यारी चिनीलोकांवर फारच जुलूम केला अशी ८ ची तार सांगते. त्या जपानी फौजेनें अगदीं क्रूरपणाचें कृत्य करून पुष्कळ निनहत्यारी चिन्यांस ठार केलें; लढाईंत कैद झालेल्या चिनी लोकांच्या टोळ्या टोळ्या करून त्यांस एक ठिकाणीं गच्च आवळून बांधल्या व त्या माणसांच्या मोठ्या टोळीस किंवा भाग्यास गोळ्या घालून व तरवारीनें ठार केलें. जपानी फौजेस चिनीलोकांनीं फार छळलें हे खरें, पण विजयी झालेल्या जपानी फौजेनें जें हें अती क्रूरपणाचें कृत्य केलें तें जपनास बट्टा आणणारें आहे असें विलायती पत्रें ह्मणतात.

चार तास कडक लढाई होऊन जपानी फौजेनें केफिन हें ठिकाण घेतलें. चिनी फौजेनें पळ काढला. नुकसान किती झालें तें अजून समजलें नाहीं.

ब्रह्मी चिनी सरहद्दीवर चिनी लोकांनीं कांहीं गडबड केली व त्यांत १९ माणसें ठार झालीं. बाकी तपशील अजून आला नाहीं.

आमच्या फौजेनें वानरी टोळीस बावरविलें व त्याची ३६०० जनावरें लुटून आणलीं. ठा० अ०

गर्भिणीच्या अतिसारादिकांवर— बाळा दशाद्रुळापैकीं टेंडुमुळ, रक्तचंदन, वेखंड कुड्याच्या मुळ्यांची साल, नागरमोथे काळा वाळा, धमासा, पित्तपापडा, अतिविष या जिनसा प्रत्येकीं अर्धी अर्धी तोळा घेऊन, त्यात अर्धी शेर पाणी घालून चतुर्थांश पाणी उरल्यावर गाळून घ्यावें; व त्यांत थोडीसा मध व थोडीशी खडीसाकर घालून द्यावें. याप्रमाणें निकाढा ( त्याच जिनसांत तितकेंच पाणी वगैरे घालून काढा करून ) रात्रीं घेणें. या योगानें अनेक प्रकारचे अतिसार, रक्तस्त्राव ज्वर, स्तनसंबंधी दोष इत्यादि नाहींसे होतात.

कंडू वगैरे त्वचेच्या विकारावर— सरकयाचा मगज, हळद, दारूहळद, कोष्ट, गोरजचिंचेचा मगज, शेपा, मेथ्या, बावचव्यांचें बीज, जव व सैंधव यांचें चूर्ण करून, तें एरंडलांत कालवून त्याचा लेप करावा; ह्मणजे कंडू, दद्रु [ दाद--खाज सुटून, त्वचा जाडी व काळसर रंगाची होते. ], व्रणरोग वगैरे बरे होतात.

डोळ्यांत पडलेलीं फुलें जाण्यास— मोरचूत, कांचभस्म, समुद्रफेंस, मनशोळ, सुवर्णमाक्षिक, लोहचूर्ण, मनुष्याच्या कपाळकराटीचा तुकडा व कोंबडीच्या अंड्यांचीं टरफलें हे सर्व जिन्नस समभाग घेऊन, त्यांचा शेळीच्या मुत्रांत खल करून गोळ्या कराव्या. व जरूरी प्रमाणें ती गोळी पाण्यांत उगळून अंजन करावें.

विंचवाचे दंशावर— तुरटीच्या पाण्याचे थेंब डोळ्यांत घालावे, किंवा दंशावर मध व पांढऱ्या कांद्याचा रस चोळावा. स. वि.

ठाणे येथें एक कुकडा कुणबी, दारूपासून होणाऱ्या अनर्थांचे दर्शक असे पावाडे गात फिरत असतो. त्याच्या गाण्यांत मजुरांच्या घरच्या स्थितीचें चांगलें चित्र उतरलेले असतें. मोठ मोठे क्लब मधून घरादारांत दारूच्या गुंगीत धुंद असतां ह्या गरीबास हा धंदा कसा सुचला.

चमत्कारिक प्रकार—बंड करा, अशा अर्थाचीं कित्येक पत्रें राजा शिवप्रसादच्या सहीचीं जिकडे तिकडे पसरलीं आहेत ह्मणून जो पुकार ऐकण्यांत येतो तीं कित्येक पत्रें पोस्टाच्या 'डेड लेटर' आफिसांतून बनारसच्या पोलिसच्या हातीं आलीं आहेत, त्या पत्रांत खालील प्रमाणें मजकूर आहे:—

"लक्षांत ठेवा कीं, रशियन लोक या देशांत येण्यापूर्वी दोन वर्षे. इंग्रज लोक हा देश सोडून पळून जातील. आणि पळतां पळतां देश लुटून फस्त करतील. तो इतका कीं, लोकांची अगदीं दुर्दशा होईल. सध्यां लोक ब्रिटेश जुलमाखालीं चिरडले गेले आहेत; करितां सर्व स्वदेशाभिमानी लोकांना, एव्हांपासून तयार रहा, वेळ आल्यानंतर आपआपल्या घरादारांचें आणि प्राणाचें संरक्षण करितां येईल अशा व्यवस्था ठेवा."

अशा मजकुराचे कागद लिहिणारा पकडून देणारास बनारसाच्या पोलिसानें इनाम देण्याचें प्रसिद्ध केलें आहे.

शिक्षा झाली— गुन्हेगारांना कबूल करण्याकरतां हाल केल्याबद्दल दोघां पोलिस कान्स्टेबलांना नाशिक येथें सेशन कमिट केलें होतें. ज्याचे हाल केले होते तो पोलिसच्या मारानें मेला, असें शाबीत झाल्यावरून एकास २ वर्षांची व एकास ४ वर्षांची सक्तमजूरीची शिक्षा झाली. पोलिसांनीं सावध व्हावें!

मिठाबद्दल नवी अडचण—मिठाचे व्यापाऱ्यांस एक मणाचे आंतील हिशेब ठेवण्याची आजपर्यंत जरूर नव्हती; परंतु ता० १ जानेवारी १८९५ पासून ५ शेरांहून जास्त होणाऱ्या मीठ विक्रीबद्दल व्यापाऱ्यांनीं हिशेब ठेविला पाहिजे, असा कष्टमचे अधिकाऱ्यांकडून ठराव होऊन आल्याची बातमी आहे. परवानदारांशिवाय इतर दुकानदारांस मीठ विक्री करूं द्यावयाची नाहीं असा क्रम उपर प्रांती अलिकडेस सुरू करण्यांत आलेला आहे, तशीच पद्धत इकडे सुरू करितां येईल कीं काय? याचाही विचार चालल्याचें ऐकण्यांत येतें. मिठाबद्दल अधींच लोकांची ओरड असतां त्यांत आणखी अशा अडचणी कस्टमचे अधिकारी घालू पहात आहेत ह्यातील अर्थ तरी काय?

माणसाच्या हाडाचा दिवा—बव्हेमिया प्रांतांत सेडलिट्झ शहरांतील 'ऑल सेंटस चर्च' ( सर्व साधूंचे मंदीर ) नांवाच्या देवळांत जो दिवा आहे तो सगळा माणसाच्या हाडाचा केलेला आहे. व्यापारी

शेतीचें प्रदर्शन- येत्या फेब्रुवारीच्या ८ व्या तारखेस गोंडाळ येथें शेतकीचीं जनावरें, धान्यें फळें फुलझाडें, तेलाचीं बियें, निरनिराळीं खातें, शेतकीचीं हत्यारें वगैरेंचें प्रदर्शन व्हावयाचें आहे. उत्तम मालास बक्षिसें देण्यांत येणार आहेत. प्रदर्शन चार दिवस सुरू ठेवणार आहेत.

हैद्राबादच्या निजामकालेजच्या विद्यार्थीस इंग्लंड मधील युनिव्हर्सिटीमध्यें अभ्यास करण्याची सवड व्हावी एतदर्थ निजामसरकारानें कांहीं स्कालरशिपा ठेविल्या आहेत. या स्कालरशिपा मधील पहिल्या वर्गाची स्कालरशिप डाक्टर अघोरनाथ यांची कन्या कुमारी सरोजिनी इला देण्यांत आली आहे. कोणा हो हिंदूस अथवा हिंदु स्त्रीस ही स्कालरशिप पहिल्यानेंच देण्यांत आली आहे. कुमारी सरोजिनी बाईचें आह्मी अभिनंदन करितो. आणि या स्कालरशिपाचा योग्य फायदा त्या आपणास आणि आपल्या देशास करून देतील अशी आशा करितों.

बनावट ट्रेडमार्क—येथें दोन टाकीवर मेसर्स एच. ए. रोझ नामक कंपनीचे एक गांधी सामानाचें दुकान आहे त्यांत बाटलीवाल्याच्या "एम्यू मिक्श्चरचे बाटली प्रमाणें बनावट बाटल्या करून त्यावर तशी" तिकिट वगैरे लावून माल विकण्याचा सपाटा चालला होता. ह्या वरून मि० बाटलीवाला यांनीं त्या दुकानचा मालक हसनअली यांजवर दावा मांडला परंतु हसनअलीनें बिनशर्त माफी मागितल्या वरून मुकदमा काढून घेण्यांत आला. तिकिटांची लटपट करून बनावट माल करणारांनीं इकडे लक्ष द्यावें. न्या० सु०

जाहिरात,

हे पाक पौष्टीक पहा, व त्वरित गुण—पण—तो मजेदार—किंमत थोडी, व फायदा जास्त— हे सेवन करून अनुभव घ्या. ह्या पासून धातुवृद्धि होऊन मर्दुमी वाढते, व शक्ति स्फूर्ति व स्मरणशक्ति फार मिळेल. आणि श्रम पडून मेंदु बिघडतो तो मस्तक मेंदु तरावट होईल. हात पाय व कंबर व सर्व सांधे दुखतात तो वायु व बाळंत वायु व सर्दी हे सर्व दूर होतील. सर्व स्त्रियांस व हटकून बाळंतिनीस व तिचे रोगावर खाण्यास गूण देणार योग्य—सौभाग्यसुंट. हे सर्व आमचे दवाखान्यांत विक्रीस तयार आहेत. ज्यांना लागेल त्यांनीं रोख पैसे पाठवून अगर व्ह्याल्युपेबल पार्सलनें मागवावें. खाण्याचे रीतीचा खर्डा या सोबत देऊं. दर खालीं लिहिले प्रमाणें.

त्वरा करा! पौष्टिक खा!! गेला हिंवाळा येणार नाहीं!!! वाचा पहा— सालंमिश्री पाक दर १ शेरास किंमत रु० ३; बदाम पाक दर शेरास २॥८; गोखरू पाक शेरास रु० ५ पांच; केहळे पाक शेरास रु० ४; सौभाग्य सुंट उत्तम शेरास रु० २. प्रत दुसरी—सालंमिश्री व बदाम पाक दर शेरास रुपये २.

पत्ता व सही.

शिवचरणगीर रामगीर वैद्य कुरणखेडकर

दवाखाना अकोला वऱ्हाड.

घड्याळ.

किं. रुपये ६ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ ज्युएलचे ( ह्मणजे चक्रांचे खालीं वर हिरे बसविलेले आहेत ) चावी देण्यास मोगरा, कांटे रासकोप प्रमाणें, आंकडे ठळक विलायती काचेचें मुद्दाम युरोप मध्यें करविलेलें. या वर आमचें नांव आहे. हें खिश्यांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।१२ वर्षे दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. जास्त काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें वाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकलें नाहीं. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता—

गोविंद महादेव पोळ

वाच मेकर

नाशीक

हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साळअखेर ... १४८

किरकोळ अंकास ............ ०४

Single copy.......................... 4

नोटिशीबद्दल.
१० ओळीचेंआंत रु० १
दर ओळीस.... ०।०६
दुसरे खेपेस ....... ०१

# वऱ्हाडसमाचार.

Advertisement
Below 10 lines... 2 Rs
per line over 10... 4 as
Repetition per line 3 as.

THE BERAR SAMACHAR

VOL XXIX AKOLA MONDAY 28 JANUARY 1895 NO. 4

वर्ष २९ आकोला सोमवार तारिख २८ माहे जानेवारी सन १८९५ ई० अंक ४



ESTABLISHED IN 1880.

HEALTH REGAINED AND STRENGTH MAINTAINED.

जी. बी. नाईक कंपनीच्या

जग प्रसिद्ध गुणावह.

विजेच्या आंगठ्या, पुतळया, कर्डी, लेखण्या व गळपट्टे वगैरे

प्रत्येक वस्तुवर G. B. N. मार्क पाहून घेत ना. खोटा माल घेऊन फसू नका.

११०००० वर विकल्या, रोज पुष्कळ खपत आहेत.



गुण आल्याचे हजारों दाखले मिळाले आहेत व नित्य मिळतात.

रक्त हें मनुष्याचें जीवित आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे




रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग अशक्तपणा, संधिवायु, शिरागतवायु, पोटांत वायु धरणें फेंपरें, हातपाय गळून जाणें, स्त्रियांचे बाळंतरोग वगैरे काळजाचे दर्द, सर्व प्रकारचे ज्वर, अर्धशिशि, मस्तक शूळ, मलावरोध, छातींत जळणें व दुखणें गळा सुजणें, सर्व प्रकारच्या मुळव्याधी. पाठींतील अशक्तपणा निद्रा न लागणें, मूत्राशयांतील रोग, खोकला, दमा, गजकर्ण, त्वचेचे विकार, मेह व इतर रोग, हे ह्या वस्तु वापरल्यानें बरे होतात, हें जगत्प्रसिद्ध आहे. गळपट्टा—लहान मुलांचे दंतोत्पत्तिसमयीं होणारे रोग शमन होऊन सुळे निर्विघ्नपणानें निघतात. लेखणी—हातास कांपरें व स्मरणशक्ति, अशा ह्या उत्तम, गुणकारी, सर्व रोग शमविणाऱ्या, अंगावर सुशोभित दिसणाऱ्या, औषधी खटपट चुकविणाऱ्या वस्तूंच्या संग्रहावांचून राहूं नका.

सर्व इस्पितळांमध्यें विजेचा प्रयोग रोग्यांवर करितात, व ज्या मनुष्याच्या अंगांत शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यावर विजेचा प्रयोग केलेला पुष्कळांनीं पाहिला असेल. व त्यापासून रोगी बरें झाले आहत. त्याबद्दल हजारों डाक्टर साक्ष देतील.

विजेच्या वस्तूची किंमत.

| | | |
|---|---|---|
| पितळी आंगठीस किं. रु. १॥ | पि. पुतळीस किं. रु. १। | धातूचे कड्यास किं. रु. १॥ |
| चांदीचे आंगठीस किं. रु. ३ | चां. पुतळीस किं. रु. २ | धातूचे लेखणीस किं. रु. १॥ |
| सोन्याचे आंगठीस किं. रु. २० | सो. पुतळीस किं. रु. २२ | रेशमी गळपटा किं. रु. १॥ |

केंबर पट्टा किं. रु. ६

एकदम बारा नग घेणारास एक नग जास्त मिळेल. रोख दाम आल्यास किंवा व्ही. पी. पार्सलनें मागविल्यास पाठवून देऊं. आंगठी करितां बोटाचें माप पाठवीत असावें पत्ता असावा. अनेक रोगांवर गुण आल्याचे डाक्टर, वैद्य, पत्रकर्ते, राजेरजवाडे वगैरे सद्गृहस्थांचे हजारों दाखल्याचें व विशेष माहितीचें, व एजंट व्यापारी दराचे पुस्तकाकरितां अर्धा आणा पाठवा, किंवा तें पुस्तक माला बरोबर फुकट पाठवूं. १ पासून ६ पर्यंत ट. ह. ६ आणे बंगी करणावळ माफ.

G. B. Naik and Company
Byculla Bombay

जी. बी. नाईक आणि कंपनी.

मुंबई, भायखळा जुन्या दावणी समोर; व पुणें, रविवार पेठ नं० ६०



## जाहिर खबर

बाहेर गांवच्या सर्व व्यापारी लोकांस कळविण्यांत येतें कीं; आमची पेढी मुंबईत फार दिवसांपासून चालू असून आह्मी पुष्कळ फायद्यानें माल खरेदी करून पाठवित असतों. ज्या व्यापारी लोकांस सुतारी, कापड, फरनीचरचें जातीचें सामान, लांकूड, लोखंड, किराणा, हार्डवेर ( चुका, स्क्रू वगैरे ) स्टेशनरी व ग्यासलेट वगैरे कोणत्याही जातीचा माल मागणें झाल्यास आह्मी पुष्कळ फायद्यानें आणि कमेशीनें व त्वरित पाठवूं. एक वेळ माल मागविल्यावर खात्री होईल. आमच्या कमिशनचा भावही फारच कमी ह्मणजे शेंकडा एक टक्या प्रमाणें आहे. माल मागविणें तो व्हाल्यू पेबलनें अगर आगाऊ रुपये पाठवुन मागवावा. पण व्हाल्यू पेबलनें माल मागावेणारांनीं शेंकडा २५ रुपये प्रमाणें रक्कम आगाऊ पाठविली पाहिजे. ज्या लोकांस माल मागविणें असेल त्यांनीं खालील पत्यावर आपलें नांव, गांव, स्टेशन वगैरे स्पष्ट खुलासेवार लिहून पत्रव्यवहार करावा. पत्रें पोस्टपेड पाठवावीं व उत्तराकरितां टिकीट पाठवावें.

तईयब अली मुलावली भाई.

मच्छी बाजार, अबदुल रहिमान स्ट्रीट, मुंबई.


## जाहिरात.

पं० ना० मो० नंबर १/१८९५

विद्यमान एदलजी जमसेटजी संजाना सा.

पं० ना० कोर्टाचे जडज्य इलिचपूर.

सर्वत्रस जाहीर नामा.

नोटिस देण्यांत येतें कीं अर्जदार गोपाळ राघव मोहोगीर राहणार इलिचपूर हा नादार आहे असा आज तारखेस ठराव झाला आहे. आण ता. १६-२-९५ हा दिवस नादाराच्या सावकारानीं जमण्याकरितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा विचार करण्याकरितां नेमिला आहे.

सदर्हू नादाराच्या सुटके विषयीं ज्या सावकाराची तक्रार सांगण्याची इच्छा असेल व कांहीं साक्ष देणें असेल तर सदर्हू तारखेच्या निदान ८ दिवस पूर्वीं समक्ष येऊन दरखास्त करावी व प्रोसेस द्यावी.

या लगतच्या सावकारा शिवाय आणखी कोणाचें घेणें असेल. त्यांनींही अर्ज करावे. तारीख १६-१-९५ इसवी.

३०० मुकुंद बाळकृष्ण बुटी दुकान इलिचपूर,

३०० रामचंद हेद्रान मारवाडी दुकान इलिचपूर.

१२५ महमद अबदुलबारी साहेब पेनशनर त. राहणार इलिचपूर.

१०० गंगाराम वल्लद रामजी माळी राहणार इलिचपूर.

१०० लालसा मोतीसा मालक पासुसा दुकान इलिचपूर.

६० गणेशलाल जोथराज मारवाडी इलिचपूर.

७ श्रीचंद वंकुरदास दुकान इलिचपूर.

२५ कन्हीराम लक्ष्मीनारायण दुकान इलिचपूर.

३० गहनाई जवजे पुंजाजी माळी राहणार माका.

६० सिवालाल व्पाहारीलाल इलिचपूर.

११०७

E. J. Sanjana
जडज्य.

## नोटिसीचें उत्तर

रा. रा. रामजी वा माहादाजी वहिवाटदार नारायण वल्लद रामजी राहणार अडुळ परगणे घहिंहडा तालुके दर्यापूर यांस नोटीस देणार बायजाई मर्द नागोजी भारंबे राहणार अडुळ परगणें घहिंहडा तालुके दर्यापुर—इजकडून नोटीसीनें असें कळविलें जातें कीं तुह्मी प्रमोदसिंधु वर्तमापत्रांतून ता. २८ माहे डिसेंबर सन १८९४ इसवी रोजी नोटीस दिली ती पावली नोटीसींत तुह्मी लिहिलेला सर्व मजकूर अगदीं खोटा आहे. तुमचा आमचा कोणच्याही प्रकारचा कांहीं एक संबंध नाहीं. माझे घरची मी मुखत्यार आहे. माझ्या कोणच्याही कामांत किंवा व्यवहारांत तुह्मी बोलणेचा संबंध नाहींत. असें असून तुह्मी विविनाकारण मजला त्रास देत अहा. व तुमच्या अशा कारण्यानें जर करितां माझ्या कोणच्याही कामास अडथळा वगैरे आल्यास किंवा नुकसान वगैरे झाल्यास त्याजबद्दलचे सर्व प्रकारचे जबाबदार तुह्मांस धरून सर्व जी नुकसान होईल ती तुह्मा पासून ह्या नोटिसीचे खरचासह सर्व भरून घेतलें जाईल. ह्मणून दिली नोटीस. सही ता. २१ माहे ज्यानेवारी सन १८९५ इसवी.

( सही )

सहीची निशाणी बांगडी बायजाई मर्द नागोजी भारंबे राहणार अडूळ इच्या. हातची असे.

## नोटीस

नोटीस बेशमी उल्हाजी वल्लद नारायणजी कोरडे राहणार सैदापूर यास खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं माझा बाप व तुह्मी सखे बंधु असून आपली सर्व शेती वगैरे एके ठिकाणीच आहे तुह्मी वडील असल्यामुळें जमीन तुमचे नांवें आहे परंतु भाईहिशा प्रमाणें निमे जमीन माझी बापाची आहे त्या प्रमाणें निमे हिशाची माझी वहिवाटही आहे परंतु तुमचे व आमचे बनत नसल्यामुळें सर्व जंगम मिळकत व स्थावर मिळकत याची निमे निमे वाटणी करून माझी मिळकत मजला द्यावी ह्मणून आगाऊ नोटीस दिली आहे तर पंधरा दिवसांत निकाल करावा कळावें. ता. १३-१-९५ इ. ह्या नोटिसीचा खर्च द्यावा लागेल. कळावें.

( सही )

मारुती वल्लद खुशालजी कोरडे

दस्तूर खुद्द.

## मुलांचें शिक्षण क्रम

( मागील अंकावरून पुढें चालूं )

परंतु मुलीच्या संबंधानें मात्र खात्री पूर्वक सांगतां येईल कीं तिचें सर्व प्रकारचें शिक्षण आणि अभ्यास, आईच्या आणि कुटुंबांतील मंडळीच्या देखरेखी खालीं झाले पाहिजेत. तिला शाळेंत घातलें असतां तिचें मन बिघडण्याचा विशेष संभव असतो. शाळेंत एखादी जरी मुलगी वाईट वर्तनाची असली तरी संगति जन्य दोषानें अनेक मुली तशा होण्याची फार भीति असते.

कुटुंबांतील माणसांत एकोपा, शांति आणि परस्परांवर विश्वास असला पाहिजे. कुटुंबांतील माणसांचें एकमेकाशीं जमत नसून त्यांच्यांत नेहमीं कटाकटी होत असतील तर त्याचा परिणाम मुलांच्या मनावर खचीत वाईट होईल. मातापितरांत झालेली रुसवारुसवी अथवा कुटुंबांतील माणसांत झालेला तंटा मुलांच्या नजरेस पडणें हें कांहीं चांगलें नाहीं; कारण ह्या योगानें मुलांच्या मनांत

वडिलांविषयीं असलेली पूज्यबुद्धि उडून जाते. मुलांची मातापितरांवरून भक्ती उडूं देणें हें कोणत्याही प्रकारें इष्ट नाहीं. वडिलांच्या अंगीं दुर्गुण असून ते मूर्ख आहेत असें कोणत्याही रीतीनें त्यांस वाटूं देऊं नये. आईवर फार भरंवसा असल्यामुळें अथवा भावंडाच्या अहेतुक प्रेमाविषयीं निस्सीम भक्ति असल्यामुळें, थोडेसें दुःख अथवा भय प्राप्त झालें असतां धांवत येऊन, आपल्या आईच्या अथवा भावंडाच्या कवेंस घट्ट मिठी मारली आहे, असें मूल नजरेस पडलें असतां आपल्याला किती संतोष होतो बरें! मुलें जसजशीं वाढत जाऊन त्यांचे मनोधर्म पूर्णतेस येत जातात तसतसें त्यांना समजून येतें कीं, आपल्याला जन्म देणारीं मातापितरें हींच आपले खरे मित्र होत; व संकटाच्या वेळीं आश्रयाला ठिकाण हेंच आहे असें जाणून तीं आपल्या मातापितरांकडे धांवत येतील; कारण, आपल्या वरील संकट टाळण्यास जरी तीं असमर्थ असलीं तरी आपल्या दुःखाचे वांटेकरी होऊन आपलें शांत्वन करतील, अशी त्यांना खात्री असते.

शिक्षणाचे स्वाभाविक दोन भाग आहेतः एक शारीरिक शिक्षण आणि दुसरा मानसिक शिक्षण. ह्या दोन्ही प्रकारच्या शिक्षणा कडे अगदीं सारखें लक्ष दिलें पाहिजे हें हल्लीं सांगणें अनावश्यक आहे असें वाटतें.

आपण प्रचारांत ज्याला शिक्षण असें म्हणतो त्या विषयीं विवेचन करितांना त्यांत मुलांना शारीरिक शिक्षण कोणत्या प्रकारें दिलें पाहिजे ह्याचे विवेचन करण्या पेक्षां एका स्वतंत्रनिबंधांत त्याचें विवेचन करणें अधिक योग्य होईल तरी त्या संबंधानें येथें थोडेसें लिहिलें असतां तें अप्रासंगिक होईल असें वाटत नाहीं जन्ममरण संबंधी जे सरकारी तक्ते प्रसिद्ध होतात त्यांत लहान मुलांच्या मृत्यूचे दिलेले आंकडे पाहून साधारण मनुष्यास देखील पराकाष्ठेचें वाईट वाटतें. ह्या तक्तांत दिलेल्या मृत्युच्या मानावरून समजून येतें कीं मुलांची जोपासना करण्यांत कांहीं तरी व्यंग्य असून, तींत पुष्कळ सुधारणा झाली पाहिजे.

( पुढें चालूं )

वऱ्हाडसमाचार

मिती माघ शुद्ध ३ शके १८१६

मुंबईचे गव्हरनर लार्ड हारिस यांचें स्मारक उभारण्या विषयीं त्या इलाख्यांत चळवळ सुरूं झाल्या दिवसा पासून लोकांचे विचार स्मारकाविषयक गृहस्थांच्या पंचवार्षिकी कारकीर्दी कडे वळले आहेत. आपण ज्यास बहुमान देतो तो आपल्या पूज्यस्थानाला पात्र असावा असें प्रत्येकास वाटत असतें. सत्पुरुषाला सन्मान सर्वत्र मिळतो आणि त्यांच्या सत्कृत्यांच्या आठवणी करितां त्यांचीं स्मारकेंही गुणग्राही जन उभारीत असतात. परंतु या सत्पुरुषांच्या मालिकेंत कांहीं अपात्र लोकांची गणना चुकीनें कधीं कधीं होते इतकेंच नाहीं तर अलिकडे इंडियांत स्मारकें बहुत करून राज्यकर्त्यां पैकीं मुख्य मुख्य अधिकाऱ्यांच्या नांवानें होत असतात. या अधिकारी वर्गा बाहेरचे लोक स्मारकाच्या मानाला पात्रंच नसतात असें नाहीं. जे स्मारक उभारण्याच्या खटपटींत असतात त्यांच्या पूजेला दुसरे लोक लायक असल्या विषयीं आढळत नाहीं अधिकारी वर्ग हा देवांचा मेळा आणि नेटिवा पैकीं रावबहादूर, राजे, नबाव इत्यादि पदवीवाले श्रीमान, कार्यसाधु हुद्याला चटलेले लोक हे त्यांचे भक्त आहेत. गोऱ्या अधिकाऱ्यांची मनधरणी व करमणूक करण्या साठीं वरील हांजी हांजी करणारे खुषमस्करे रात्रंदिवस तत्पर असतात. हा देवांचा व भक्तांचा समुदाय नेहमी सर्व सरकार दरबारच्या व्यवहारांत पुढें येत असतो. आणि त्यांच्या कार्य मालें मध्यें अधिकारी वर्गाचें महात्म वर्णन करून त्यांच्या कारकिर्दीच्या पुण्यातथी आनंदांत घालविण्याचा परिपाट असतो. व्हाइसराय साहेबा पासून शेवटच्या अधिकाऱ्यां पर्यंत प्रत्येकास जो मान, मेजवान्या, व आतषबाजी हीं प्राप्त होतात तीं लोकमान्यतेनें मिळत नाहींत. खऱ्या उदात्त उदारशील, व लोकमान्य नेटिव अशा कृत्यांत सामील नसतात. त्यांच्या मनानें स्मारकाच्या मानाला पात्र असे लोक निराळेच असतात. हीं स्मारकें बहुधा लोक समूहाच्या हृदय मंदिरांत रचलेलीं असतात. तेव्हां अधिकारी वर्गातील लोकांनीं आपलें एखादें दगडमाल स्मारक उभारण्यांत आलें असेल तर त्याची खरी किंमत ओळखून घ्यावी आणि नेटिव लोकांनीं सत्पात्र पाहून मानदान देण्यास शिकावें व ते तसें न करितील तर परिणामीं त्यांची अवहेलना व अपकर्ष होईल व त्यांस कोणी आदर बुद्धीनें विचारणारही नाहीं.

जी. आ. पी. रेल्वे कंपनी ही मोठी धनाढ्य व जुनी कंपनी आहे. परंतु उतरूंच्या सोयीच्या मानानें या कंपनीचें पाऊल फार मागें आहे. तिसरे वर्गाच्या उतारूं विषयीं या कंपनीच्या अधिकाऱ्याकडून हलगर्जीपणा व बेपरवाई फार होते. वऱ्हाडातील स्टेशनावर तिसऱ्या वर्गाच्या उतारूंचे कसकसे हाल होतात याची कांहीं उदाहरणें आह्मी खालीं देत आहो. बडनेऱ्यास नेहमीं या उतारूंचा कोंडमारा होत असतो. वायकामुळें घेऊन जाणाऱ्यांस अप्रतिष्ठा व धक्का बुक्का हीं सोसल्या वाचून प्लाट फार्मावर रिघाव होत नाहीं. आणि धांव पळ व पडझड झाल्या शिवाय आगगाडीच्या डब्यांत जागा मिळत नाहीं. तिसऱ्या वर्गाच्या उतारूंच्या खोलीला दोन रुंद असे लोखंडी दरवाजे आहेत पण ते दोन्ही बंद ठेऊन, लोकांस कोंडून, व एका फाटकाची चिंचोळी एक चतुर्थांश बाजू उघडून टिकीट कलेक्टर टिकिटें तपासल्या नंतर उतारूंस प्लाटफार्मावर गाडी निघण्याच्या सुमारास सोडतात. आगगाडीच्या तिसऱ्या वर्गाच्या डब्यांतून दिवे तेलाच्या अभावामुळें विझलेले असतात इतकेंच नाहीं तर खामगांव सारख्या स्टेशनावर उतारूंच्या खोलींत देखील उजेड नसतो. उतारूस टिकिट घतल्या नंतर प्लाट फार्मावर सोडण्याची दरवाज्यांतली कोंडी बडनेऱ्या प्रमाणें फार त्रासदायक असते. खामगांवाहून येणारी गाडी उशिरा आली व मलकापुराहून येत असलेली गाडी जलम स्टेशनच्या डिस्टंट सिग्नल जवळ पोचली तथापि खामगावच्या उतारूंचीं टिकिटें तपासतांना एकेकडचा सावकाशपणे दघडण्याचा क्रम कांहीं बदलत नाहीं आणि मग उतारूं पुढा करून तांतडीनें पळतांना पडतात व दुखापतही पावतात. उतारू स्टेशनावर आल्या पासून तों ते गाडींत बसे पर्यंत त्याचे हाल व तमाशा अति कष्टमय असतो. टिकिटें काढण्याच्या तोंडाशीं ओढाताण व गर्दी बहुत असते व त्या खेचाखेचींत कितीजणांचा जीव घुसमटून जातो हें कांहीं सांगतांच येत नाहीं.

या वर निर्दिष्ट केलेल्या अडचणी दूर करणें प्रत्येक स्टेशनावरील अधिकाऱ्यांच्या हातांतल्या असतें. परंतु तिकडे कोणी लक्ष पुरवीत नाहीं. इतकेंच नाहीं तर दिवसानुदिवस त्या अडचणी दुणावण्याचा प्रयत्न होत असतो कंपनीच्या हातून व्हावयाच्या सोयी पुष्कळ आहेत आणि त्या केल्या जातील तेव्हां जातील पण ठिकठिकाणच्या स्टेशनच्या हुद्देदारांच्या आटोक्यांतल्या गैरसोयी व त्रास दूर होऊं नयेत हें कंपनीच्या नोकरांस लांछनास्पद आहे. वरील पीडाकारक प्रकार वऱ्हाडांतील स्टेशनावरच आढळतात असें नाहीं तर त्याचे मासले पुण्यामुंबई कडेही दृष्टीस पडतात.

उतारूंच्या किरकोळ सोयी कशा कराव्यात आणि त्यांचा स्टेशना वरील मुक्काम कसा सुखावह करावा इत्यादि गोष्टी ज्यांस शिकावयाच्या असतील त्यांच्या माहिती करितां आह्मी एक प्रत्यक्ष उदाहरण त्यांना दाखवितों. अकोल्याच्या स्टेशनची बढाई करण्याचा हेतु नाहीं परंतु खरोखर येथील अधिकारी कार्यदक्ष व चतुर आहेत. याची देखरेख व कामाची उठावणी इतर स्टेशन वाल्या लोकांनीं कित्या प्रमाणें वळविण्या सारखी आहे. आगगाडी येण्याच्या सुमाराला प्लाटफार्मावर सर्व उतारूंस अगाउ आणून ठेवतात. टिकिटें योग्य वेळेवर देऊन टाकलेलीं असतात. गर्दी बहुत असते पण सोयी मुबलक असून लोक सुखानें येतात व जातात आणि प्रत्यहीं स्टेशन मास्तरास दुवा देतात. बडनेरा, खामगांव, वगैरे स्टेशनच्या लोकांनीं आपलें कर्तव्य बजावतांना उतारूंस सुख देऊन चांगला लौकिक कां मिळवू नये हें आह्मांस समजत नाहीं.

The Berar Samachar

MONDAY JANUARY, 28, 1895

Now-a-days it is a rampant idea that students are unfit to enter political education. In the view of some gentlemen, politics should be the forbidden fruit to the class of students. In 1894, the Punjab Government made a good deal of the forbidden fruit and issued an interdict in connection with the attendance at the Lahor-Congress. The Hon'ble Mr. Surrendranath Bannerji cleared off the delusion and explained in clear and unambiguious language that politics every student should earnestly pursue as one of his favourite subjects. Let one percieve the cogency of his arguments as quoted below:—

"Students are not precluded or prevented from reading history, and what is history but the politics of the past. If students are not precluded from reading history, if students are not precluded from reading the politics of the past, if it is believed, and rightly believed, that history enlarges the mind, developes the judgment, elevates the character, introduces a new tone and impetus in our moral system, if all that is believed but rightly believed as regards the politics of the past why should you not expect similar results as regards the politics of the present hour. Those therefore who band a prohibition upon the study of politics by students must go a step further in order to be perfectly logical and consistent. They must interdict the history, the past— a history of those great events which are responsible for present state of things but they do not do so. They ask you to read history but the moment that you are to go on beyond the politics of the same past wadder into the domain of the politics of the present they feel a degree of shyness which I am not able to account for; but gentlemen there is also another aspect of the question which I think ought not to be lost sight of. The students of today will be citizens of tomorrow (Hear, hear). As citizens they have duties which they cannot divest themselves of. These are duties which they imbibe from their mother's milk. These are the duties which cling them through life These are the duties which cease only when the darkness of the grave closed over them."

Mr. R. N. Mudholkar, a prominent member of the Berar bar took up at the last Congress the subject of the proposed amendments to the Police Act V of 1861 Every gentleman in the province would hail with delight his speech thereon.

"He said that the amendments and additions proposed to be introduced in Section 15 of the Police Act of 1861 were dangerous to the safety of their property in every sense of the term. It entirely placed them at the mercy of one man in the District. There was a section in the present Police Act of which enacted that if any part of the country was in a disturbed condition, Government had the power of locating a punitive police there, the cost of which would have to be defrayed not from the general revenue of the country but from a tax specially raised for that purpose, a tax levied in the locality where the police had to be quartered. It was suggested to Government that this measure which had been in existence since 1861 was not a just one that it was desirable to make some changes and that only persons who had really committed any disturbance should be called upon to defray the expenses. That was a very proper suggestion. One would have thought therefore that in carrying out this suggestion Government would introduce provision authorising the institution of some sort of enquiry to ascertain who the men were that really committed the offence. It was nothing of that sort. The Government proposed to give the District Mrgistrate the enormous power of deciding for himself as to who was to be held responsible for the disturbance at the locality and therefore

responsible for defraying the expenses of the special punitive police. In these days of social disturbances it was not unlikely that the Magistrate would be influenced in favour of one party or the other. This power would be a great instrument in his hands for oppression of the one party or against the other. It would entirely be subversive of all ideas of justice and fair play. They should therefore protest against that, because it was a flagrant violiation of the very first principles of fair play and justice."

The following para will point out the financial condition of the Local Boards in Berar.

"The year's income which the Boards collected amounted to Rs. 6,52,812 : this with an opening balance of Rs. 8,84,430 formed a total of Rs. 15,37,242, of which Rs. 7,79,268 were expended. The year closed with a balance of Rs. 7,57,974. These figures differ widely from those contained in the preceding year's report, which were defective. Provincial rates Rs. 2,68,166, assessed taxes Rs. 79,367, educational Rs. 53,665, miscellaneous Rs. 1,04,274 and contributions from provincial revenues Rs. 88,922 formed the main heads of receipt. Under expenditure education Rs. 1,96,505 and civil works Rs. 3,65,137 were the main heads. It is noticed that Rs. 60,990 were expended in the year on the purchase of annuities for the Boards' employes."

## जाहिरात.

म्युनिसिपल नियमांतील नियम १२ अन्वयें जाहिर करण्यांत येतें कीं आकोले म्युनिसिपाल कमिटीतील, तारीख ३१ माहे मार्च १८९५ इसवी रोजीं ज्या मेंबरांच्या जागा सदर्हू नियमां पैकीं नियम ३१ प्रमाणें खालीं होतील त्या भरण्या करितां तारिख १९-२० २१ माहे फेब्रुवारी सन १८९५ इसवी रोजीं सकाळचे ७ वाजल्या पासून सायंकाळचे ५ वाजे पावतो निवडणूक होणार आहे. खालीं दिलेल्या तक्त्यांत प्रत्येक वार्डा पैकीं मेंबर निघाले त्यांचीं नांवें, त्या वार्डा करितां होणाऱ्या निवडणुकीची तारीख, जागा, पोलिंग आफिसराचें नाव, व उमेदवारांनीं कोणते तारखे पर्यंत पोलिंग आफिसर कडेस म्युनिसिपल रूल १३ प्रमाणें आपले अर्ज द्यावे ही माहिती दिली आहे.

| वार्ड | मेंबरांचीं नांवें | निवडणुकीची तारीख | निवडणुकीची जागा. | पोलिंग आफिसरचे नांव | कोणते तारखेचे आंत उमेदवाराचे नावचा कागद द्यावयाचा |
|---|---|---|---|---|---|
| वार्ड १ | मि. गणोबा रघोबा<br>,, मिरझा अबासबेग | १९ फेब्रुवारी १८९५ | पटेल चावडी | मि० सिंपसन | १२ फेब्रुआरी ९५ |
| वार्ड २ | ,, जैकृष्ण बगाजी<br>,, पांडुरंग बापुजी<br>,, धोंडजी कोंडजी | २०-,,- | ग्रेनमार्केट आफीस | | १३—,,— |
| वार्ड ३ | ,, गोपाळ हरी सावरकर | २१.,, | टाउनहाल | | १४-—,,— |

मि० रघुनाथ बळवंत वार्ड नंबर १ चे निवडलेले मेंबर यांनीं राजिनामा दिल्यामुळें खालीं झालेली जागा वरील तारखेस वार्ड नंबर १ चे निवडणुकी बरोबर भरली जाईल.

D. G. Patvardhan.

ता० २३ माहे जानेवारी सन १८९५ इ० } सेक्रेटरी म्यु० कमिटी अकोला.

NOTICE

Under rule 12 of the Municipal rules, it is hereby published for general information that elections to fill up vacancies of members in the Akola Municipal Committee who retire on the 31st. March 1895 under the operation of rule 31 of the Municipal rules, shall take place from 7 A. M. to 5 P. M. on the 19th., 20th., and 21st. February 95. The following table gives for each ward, names of retiring members, date and place of election, names of polling officers and the dates before which nomination papers under rule 13 of the Municipal rules should be delivered to the following officers.

| Ward | Name of retiring members | Date of election | Place of election | Name of polling officer | Date before which nomination papers to be submitted. |
|---|---|---|---|---|---|
| Ward No. I | Mr. Ganoba Raghoba,<br>,, Mirza Ababeg | 19th. February 1895 | Patel's Chowri | Mr. B. A. Simpson | 12th. February 95 |
| Ward No. II | Mr. Jaikrishna Bagaji<br>,, Pandurng Bapuji<br>,, Dhondji Kondji | 20th. February 95 | Grain Market Office | | 13th. February 95 |
| Ward No. III | Mr. Gopal Hari Sawarkar | 21st. February 95 | Townhall | | 14th. February 95 |

The place fallen vacant by the resignation of Mr. Raghunath Balvant an elected member for ward no. I will be filled in with the elections for the ward.

Dated Akola } D. G. Patvardhan
23-1-95 } Secretary Municipal Committee Akola

## वऱ्हाड.

खामगांव तालुक्यांत जमिनीचा धारा वाढविल्या विषयीं रयतेस नोटीसा होऊं लागल्या आहेत. सारा शेकडा ३२ नें वढला आहे व कपाशी व आळशी यांचे व्यापार ठार बुडत चालले आहेत. लोकांचा घोर दारिद्र्यांत कडेलाट होत आहे. एका शेतकऱ्यास पूर्वीं ७ रुपये सारा द्यावा लागे तेथें त्यांस नव्या आकारणी प्रमाणें ७० रुपये द्याव लागेल. अशी ही कांहीं तुरळक उदाहरणें आढळतात. सार्वजनिक सभेचे सर्व उपाय हरले असें वाटतें. तथापि परमेश्वरावर हवाला ठेऊन आपण प्रयत्न केला पाहिजे.

बोरगांवास आलिशान रेसिडेंट साहेबांचा तळ होता व सर्व अधिकारी समागमें हजर होत अशा वेळीं त्या गांवीं चोऱ्या व दरवडे पडले हें नवल नव्हे काय! कांहीं सामान एका साहेब बहादुरांचे चोरीस गेल्याचीही खबर आहे.

खामगांवच्या आसपास दोन दरवडे पडल्या विषयीं बातमी लागते.

'वऱ्हाड हायस्कूल—मानी विद्यार्थी समाजाचा यंदाचा वार्षिक समारंभ खामगांवास होण्याचें ठरलें आहे या सालच्या सेक्रेटरीचें काम रा. रा. बाळकृष्ण वामन उदगीरकर व रा. रा. पुरणमल श्यामलाल यांज कडे सोंपविलें आहे. वर्गणी पाठविणें ती उद्गीरकर यांजकडे पाठवावी. समारंभ तारिख ११ १२ मार्चला (सोमवार मंगळवार) होईल. हा समारंभ मागील साला पेक्षां उत्कृष्ट होईल अशी तेथील लोकांच्या उल्हासा वरून आम्ही अटकळ करितों.'

रा. रा. बळवंत बाळकृष्ण सुळे बी. ए. न्यायाधीश, स्माल्कॉज कोर्ट, आकोला यांची बदली रा. रा. शेषाचिलम यांच्या रजेंत दर्यापुरास तहशीलदारीवर झाली आहे. राजश्री सुळे यांनीं कल्या मेहनतीनें पुष्कळ फिर्यादी निकालास लाविल्या आणि त्यांची कारकीर्द लोकांस बरी आवडली. लवकरच अशा हुषार गृहस्थांची एक्स्ट्रा असि. कमिशनरच्या जागीं कायमची बढती होवो असें आम्ही इच्छितों.

रा. रा. गोविंदराज अप्पा मुदलियार एक्स्ट्रा असि. कमिशनर हे तीन महिन्यांची रजा संपून उमरावतीहून येथील स्माल कॉज कोडताच्या न्यायाधीशाचे कामावर येत आहेत.

आलिशान रेसिडेंट मि. क्रोडन हे गेल्या २५ वे तारखेस अकोल्यास येऊन शनिवारीं दिवसाच्या गाडीनें हैद्राबादेस रवाना झाले. येथल्या मुक्कामीं कांहीं लोकांच्या भेटी घेण्यापलिकडे दुसरीं महत्वाचीं कामें घडल्याचें दिसून पडलें नाहीं.

मि. क्रोडन साहेब बहादूर हे येत्या मार्च महिन्याच्या शेवटील आठवड्यांत एका वर्षाच्या रजेवर जाणार आहेत.

आणि त्यांच्या रजेंत कर्नल मेकंझी सी. आय. इ. यांस आफिशिएटिंग रसिडेंट नेमणार असल्या विषयीं पक्का निकाल झाला आहे हें कळविण्यास परम संतोष वाटतो. नशीब बहादर साहेब खरे!

कर्नल मेकंझी साहेब बहादूर हे हैद्राबादेस आपल्या भाग्योदयाच्या शिखरीं चढल्या नंतर बहुत करून कर्नल स्पान्स्की कमिशनर होतील. आणि मि. बुलक पेक्षां स्पान्स्की साहेबच कमिशनर व्हावेत असें लोकमत आहे.

येथील नेटीव जनरल लायब्ररीची काल रोजीं वार्षिक सभा भरून गतवर्षींचा रिपोर्ट वाचण्यांत आला, नव्या सालचें अंदाज पत्रक मंजूर झालें, व अध्यक्ष, उपाध्यक्ष वगैरे कामदार मंडळी निवडण्यांत आली. उत्तरोत्तर या लायब्ररीची चांगली भरभराट होत आहे. हें तिच्या व्यवस्थापक मंडळास अत्यंत भूषणास्पद आहे.

नोटीस

ती० रा० रा० व्यंकटराव शाहाजी देशमुख व सखाराम शाहाजी देशमुख राहणार मौजे कुटासे परगणें दहीहांडा तालुक अकोट जिल्हे अकोले. यांस नोटीस देणार कृष्णराव सखाराम देशमुख रहाणार मौजे कुटासे हल्लीं मुकाम हातें तालुके बाळापूर जि० अकोले. नोटिशीनें असें कळवितो कीं ती० रा० रा० व्यंकटराव आमचे चुलते व सखाराम शाहाजी हे आमचे बाप या उभयतांस असें कळवितों कीं माझे बंधु नारायण व माधवराव, व राजाराम व केशवराव, असे सर्व मिळून आपले पाशीं आहेत व त्यांचें सांगोपन आपण सर्व प्रकारानें उत्तम करीत आहां. परंतु जबरोबर आपली वागणूक माझे वरील चार बंधू यांजबरोबर जशी आहे त्याप्रमाणें कोणच्याही प्रकारानें बरोबर नाहीं. त्याजमुळें माझे कुटुंब व मुलगी माझे सासूच्या घरीं आज बरेच दिवस आहेत. हल्लीं माझी मुलगी लग्नास झाली आहे. त्यांस सुमारें आज दोन वर्षें होतात, परंतु आपण मुलीचे लग्नाबद्दल आज पावेतों कांहीं एक तजवीज वगैरे केली नाहीं माझेपाशीं लग्न वगैरे करण्यास कोणच्याही प्रकारचें साधन नाहीं- ह्या सर्व गोष्टी आपल्यास मी नोटीशीनें कळवितात असें नाहीं. सर्व आतील बाहेरील प्रकार आपल्यास बाळं बाळ माहीत आहे. याजकरितां आपल्यास ह्या नोटीशीनें असें कळवितो कीं माझ्या हिशाचे जें उत्पन्न असेल तें आपण सावकारास लाऊन देऊन माझ्या कन्येचे लग्न करावें. असें झालें नाहीं तर मी माझा हिस्सा जो असेल तो परभारें सावकारास लाऊन देऊन मजला कन्येचे लग्न करणें भाग आहे. ही नोटीस पावल्या पासून नोटीशींत लिहिले प्रमाणें सर्व तजवीज दिवस ८ आठ मध्यें व्हावी. नाहीं झाली तर सदर्हू लिहिल्या प्रमाणें मी कन्येचे लग्न करीत आहे. म्हणून दिली नोटीस सही ता० २६ माहे जानेवारि सन १८९५ इ०

ताजा कलम— माझ्या हिशाचे उत्पन्न कन्येचे लग्नास खर्च करावे असें सदरी लिहिलें आहे त्याचा हेतू हा कीं लग्ना पुरती रकम माझे हिशावर कर्ज काढावी. व लग्न करावे हिस्सा कोणत्याही प्रकारानें विकू नये. कायम ठेवावा. कळावे.

( सही )

कृष्णराव सखाराम देशमुख

दस्तुर खुद्द.

## वर्तमानसार.

मुंबईच्या मेसर्स म्याकिनन मेकेंझी कंपनीचे भागिदार सर डब्ल्यु मेकेंझी हे नुकतेंच मरण पावले. त्यांनीं आपल्या पाठीमागें कलकत्ता व मुंबई येथील कंपनीच्या शाखांतील नेटिव क्लार्क मध्यें वाटण्यासाठीं सुमारे एक लक्ष रुपयांची रकम मागें ठेविली होती त्या प्रमाणें कलकत्याच्या शाखेला ८७६०० रुपये व मुंबईच्या शाखेस १२५०० रुपये वांटण्यास दिले. दहा वर्षें व त्याहून जास्त नोकरी झालेल्या क्लार्कांच्या वांटणीस सुमारें ७०० रुपये आले असें ह्मणतात.

श्रीमंत शिंदे सरकार हे स्वतः राज्यकारभार पाहूं लागले. दरएक खात्याची व्यवस्था पहाण्या साठीं एक एक दिवस नेमण्यांत आला आहे. दररोज ११ वाजल्या पासून ३ वाजे पर्यंत कचेरी भरवितात. चीफ सेक्रेटरीची जागा सर एम. फेलोज यांस दिली असून रा. ब. चिंतामणराव वैद्य एम. ए. एल. एल. बी. आणि उज्जनचे सुभे रामकृष्ण आबाजी यांस अंडर सेक्रेटरी नेमिलें आहे. असें मुं० वै० चा बातमीदार ह्मणतो.

एक तरूण पारशी एम. एँ. मि. पेस्तमजी सोरापजी पाठक या नांवाचा १९ वर्षांच्या वयाचा मुलगा गेल्या सालीं एम. ए. च्या परीक्षेंत पास झाला. कालेजच्या सर्व परीक्षा मध्यें तो पहिल्या वर्गांत पास झालेला आहे. १९ वे वर्षी एम. ए. झाल्याचें हें मुंबई युनिव्हर्सिटींत पहिलेंच उदाहरण आहे.

पेटंट— गंगाधर गणेश आंबेडेकर रहाणार पेठ कसबा व गणपत लक्ष्मण सोमवंशीय आर्य क्षात्रिय राहणार पेठ आदितवार यांनीं विहिरी, तळीं, हौद, कालवे यांतून शेतकी करितां व घरगुती उपयोगा करितां पाणी काढण्याचें किंवा खाणींतून ओझीं किंवा दगड वगैरे उचलण्याचें एक यंत्र तयार केलें असून त्या बदल त्यांनीं पेटंट घेण्याचा अर्ज केला आहे.

ठराव— खुनी खटल्यांत आरोपीची कबुली असून पुरावा बलवत्तर नसेल तर शिक्षा देतां येत नाहीं, असा मद्रास हाय कोर्टाचा ठराव आहे. या ठरावाचे आधारावर आरोपीची कबूली असूनही खटला सोडून दिल्याचें किंलंड येथील उदाहरण दिसून आल्या वरून खालील कोर्टांच्या माहिती साठीं अलिकडेसच असा ठराव झाल्याचें कळतें कीं,— मद्रास हाय कोर्टाचा सदहू ठराव मुंबई हाय कोर्टास संमत नाहीं. सबब त्या ठरावास इकडे वजन देऊं नये.

सर सालारजंग— यांचे इस्टेटीची व्यवस्था पहाण्या करितां मि. दोरावजी ( करोडगिरीकडे पेनशन घेतलेले ) यांना गार्डियन नेमले असून सालरजंगाचे लहान मुलास इंग्रजी शिकविण्या करितां पोलिटिकल फिनान्सकडील एका युरोपियन मदतगाराची नेमणुक झाल्याचें समजतें. शु० सू०

अलीकडे जगांत लोक मऊ अन्न फार खाऊं लागले आहेत, ह्मणून पुढें मनुष्यांनां मुळींच दात यावयाचे नाहींत, असा एका कल्पकानें अजमास केलेला आहे.

पुरुषांच्या जिभेपेक्षां स्त्रियांची जीभ आ... ...ते असें शरीरशास्त्रज्ञाचें मत आहे. ...ानें सर्व शास्त्रें व उद्योग, कला व शोध यांचेवरील एकंदर ग्रंथ वाचण्याचें मनांत आणिलें तर त्यला ३००० वर्षें लागतील एवढें आयुष्यें ज्या वाचनप्रिय आणि जिज्ञासु मनुष्याला असेल त्याचीच वाचनेच्छा आणि अनेक ज्ञानसंपादनेच्छा तृप्त होईल.

हिंदुस्थानची फौज-- एकंदर सैन्य अजमासें तीन लाख होईल असा अजमास आहे.

पृथ्वीच्या पृष्ठ भागापासून तीस मैल खालीं पर्यंत खणलें तर तेथें धातू व खडक अगदीं तापून फुलून गेलेले आहेत, असें दिसेल.

एका जर्मन आंकडेबाजानें असा अजमास काढिला आहे कीं, तीन हजार वर्षांनीं जगांत पुरुषांचें बायकांच्या संख्येशीं प्रमाण २२० बायकांस १ पुरुष असें पडेल.

दिवाणी काम चालविण्याचा कायदा व फौजदारी काम चालविण्याचा कायदा यांत कांहीं दुरुस्ती करण्याचें हिंदुस्थान सरकारचें मत झालें असून त्या बाबतींत इलाखे सरकाराकडून कांहीं माहिती मागविली आहे व ती आल्यावर सिमल्यास त्याबदलचा जास्त विचार होणार आहे.

बेजवाडा पासून कटक पर्यंतची पूर्व किनाऱ्याची रेल्वे करण्यास स्टेट सेक्रेटरीची मंजुरी झाली. या रेल्वेची लांबी ९१९ मैल असून खर्च ९९७ लाख रुपये होईल असा अदमास आहे; ह्मणजे एका मैलास एक लाखापेक्षां जास्त झाले. तसेंच त्या रेल्वेस पुरी येथें जाणारा २६ मैलांचा एक फाटाही होणार. तसेंच वजिराबाद पासून लायल पर्यंत ११६ मैल लांबीची एक रेल्वे करण्याचेंही ठरलें.

कुलू प्रांतांत यंदा पाऊस फार झाल्यानें शेतकीचें नुकसान झालें व आतां बर्फ फार पडत असल्यामुळें त्या प्रांतांतील लोकांवर कांहीं जास्त विपत्ती होण्याचा संभव आहे.

लश्करी लोकांस कांहीं अपराधाबद्दल फटके मारण्याची जी शिक्षा आजपर्यंत देण्यांत येत असे ती यापुढें होतां येईपर्यंत देण्यांत येऊं नये असें ठरलें.

हिंदुस्थानांत रेल्वेची वृद्धी करण्या करितां यंदा ४॥ कोट रुपये खर्च व्हावयाचे आहेत.

वजिरी लोकांवर चाल करून गेलेल्या इंग्रज फौजेचे मुख्य सर लोकर्ट यांणीं वजिरी लोकांच्या सर्व पुढाऱ्यांस, ता० १९ रोजीं कासला लिर्डींत येऊन आपणास भेटा ह्मणजे इंग्रज सरकारच्या अटी तुह्मांस कळवित्या जातील असें कळविलें आहे.

युरोपांत तुफान व बर्फ यांच्या योगांनें पुष्कळ माणसें मेली.

पनामाची सोडत नुकतीच निघाली असून त्यांतील पहिलें २०,००० पौंडांचें इनाम फार्बर्न येथील एका रोटीवाल्याच्या दुकानांतल्या नीडर नांवाच्या एका मजुरास मिळालें त्याचें एकच टिकीट असून त्या रोटीच्या कारखान्याच्या मालकाची १२ टिकिटें होती. अ० द०

लूट.— मागल्या सोमवारीं रात्रीच्या दहा वाजतां बडोद्यांतील डि. ओव्हरसीअर रा. रा. चिंतामण गोविंद चिपळूणकर हे निमिच्याहून बडोद्यास येत असतां त्यांस एका चोरांच्या टोळीनें गांठलें. हे तिवे असामी व चोर तेरा असामी; तेव्हां सर्व चीजवस्त मुकाट्यानें चोरट्यांच्या स्वाधीन करावी लागली. यांत विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं, तेथें जवळच भेटलेल्या पोलिस स्वारांस ही हकीकत कळविली, परंतु ही लूट आमच्या हद्दींत झाली नाहीं तेव्हां तपास करण्याचें कारण नाहीं असे त्यांनीं जबाब दिले. असा जबाब देणें व हद्दीची सबब सांगणें ही पोलिस स्वारांस खरोखर शरमेची गोष्ट आहे. या बद्दल पोलिस अधिकारी चौकशी करतील अशी आशा आहे. बाकी कांहीं निष्पन्न व्हावयाचें नाहीं हे आह्मी जाणून आहों.

शिकवलेल्या कबुतरांच्या गळ्यांत चिठ्या बांधून त्या इच्छित स्थळीं पोंचविण्याची युक्ति युद्ध प्रसंगांमध्यें उपयोगांत आणीत असतात हे सर्वांस माहीत आहेच, परंतु अशा प्रकारें कबूतरें चिठ्या घेऊन चालली असतां ही शत्रुपक्षाकडील लोकांच्या समजुतीस येऊन ते त्यांना गोळ्या घालून ठार करतात. तेव्हां अलीकडे एका कल्पकानें मधमाशांचे पोळ्यांतील एकादी माशी घेऊन तिच्या पाठीला आपल्याला पाठवावयाची ती चिट्टी चिकटवून त्या माशीच्या द्वारें हा प्रकार साधण्याचें योजलें आहे व त्यांत त्याला यश ही आल्याचें कळेंत. जो मजकूर धाडावयाचा त्याचा फोटो अति बारीक घेऊन तो बारीक तुकडा त्या माशीच्या पाठीस डकवितात आणि तिला सोडून दिली ह्मणजे ती बिनचुक आपल्या ठिकाणी जाते. माशीही पुष्कळच लहान असल्यामुळें ती एकतर कोणाच्या समजुतीस यावयाची नाहीं आण आली तरी तिला गोळी घालून मारतां येणें कठीण आहे. ज्ञा० च०

स्काटलंड आणि फ्रान्स येथें थंडीचा मोठा कहर पडल्यानें कित्येक दिवसपर्यंत आगगाड्या चालणें बंद होऊन तारेच्या बातम्याही जाणें येणें बंद झालें होतें कित्येक मनुष्येंही बर्फानें मेलीं व जखमी झालीं.

काश्मीर येथें हिवाळ्याला दरवर्षी पेक्षां यंदा अगोदरच सुरुवात होऊन तिकडे थंडी अतोनात पडूं लागली आहे. कित्येक तर थंडीनें ककडून प्राण सोडीत आहेत!

नुकत्यांच देशी व परदेशी कापडावर बसलेल्या जकातीमुळें हिंदुस्थानच्या तिजोरींत १३० रुपयांची भर पडणार!

एका गोऱ्याची सचोटी—मद्रासेंतील "गन क्यारिएज" कारखान्यांतील एका बडे गोरकायानें सुमारें वर्ष दीड वर्ष हांत आलें सरकारच्या डोळ्यांत धूळ फेंकून शेंकडों रुपये गिळंकृत केल्याचें शुभवतमान हल्लीं बाहेर पडलें आहे! हा प्रकार असा चालला होता कीं, कवडीचें घेणें देणें नसतां दरमहच्या खर्चाच्या यादींत कांहीं तरी जिन्नस खरीद केल्याचे घुसवीत जावे! कामावर मजूर नसतां ही सोमाजी, गोमाजी, नांवाची एक खोटीच यादी दाखल करून त्यांच्या नांवानें मुशाहीरा उपटायाचा!

गेले होते—कुळाचा निरख्यांत झालेल्या जुलमी सर्व्हेसंबधानें कौन्सिलांत प्रश्न विचारून दाद लावणारे नामदार मि. याज्ञिक हे तेथील स्थिति पाहण्या करितां व माहिती मिळविण्याकरितां गेले होते.

एका केसास ३१५० ग्रेनचें ओझें तोलता येते.

इजिप्त मधील कित्येक लोकांची अशी समजूत आहे कीं मुलास तें वर्षाचें झालें नाहीं त्या पूर्वीं न्हाऊं घालणें अत्यंत धोक्याचे आहे. या साठी ते लोक मुलें वर्षांचीं होत पर्यंत त्यांस पाणी कसें तें दाखवीतच नाहींत. व्यापा०


## जाहिरात,

हे पाक पौष्टीक पहा, व त्वरित गुणपण—तो मजेदाज—किंमत थोडी, व फायदा जास्त— हे सेवन करून अनुभव घ्या. ह्या पासून धातुवृद्धि होऊन मर्दुमी वाढते, व शक्ति स्फूर्ति व स्मरणशक्ति फार मिळेल. आणि श्रम पडून मेंदु बिघडतो तो मस्तक मेंदु तरतरीत होईल. हात पाय व कंबर व सर्व सांधे दुखतात तो वायु व बाळंत वायु व सर्दी हे सर्व दूर होतील. सर्व स्त्रियांस व हटकून बाळंतिणीस व तिचे रोगावर खाण्यास गूण देणार योग्य—सौभाग्यसुंट. हे सर्व आमचे दवाखान्यांत विक्रीस तयार आहेत. ज्यांना लागेल त्यांनीं रोख पैसे पाठवून अगर व्ह्याल्युपेबल पार्सलनें मागवावें. खाण्याचे रीतीचा खर्डा या सोबत देऊं. दर खालीं लिहिले बमोजी.

त्वरा करा! पोटास खा!! गेला हिंवाळा येणार नाहीं!!! वाचा पहा— सालंमिश्री पाक दर १ शेरास किंमत रु० ३; बदाम पाक दर शेरास २॥८; गोखरू पाक शेरास रु० ५ पांच; कांहळे पाक शेरास रु० ४; सौभाग्य सुंट उत्तम शेरास रु० २. प्रत दुसरी—सालंमिश्री व बदाम पाक दर शेरास रुपये २.

पत्ता व सही.

शिवचरणगीर रामगीर वैद्य कुरणखेडकर
दवाखाना अकोला वऱ्हाड.



## घड्याळ.

कि. रुपये ६ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ ज्युएलचे ( ह्मणजे चकांचे खालीं वर हिरे बसाविलेले आहेत ) चावी देण्यास मोगरा, कांटे रासकोप प्रमाणें, आंकडे ठळक बिलोरी काचेचे मुद्दाम युरोप मध्यें करविलेलें. या वर आमचें नांव आहे. हें खिश्यांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।११ वर्षे दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. जास्त काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असे वाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकले नाहीं. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता—
गोविंद महादेव पोळ
वाच मेकर
नाशीक


☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.